म. ग्रं. सं./ठाणे

विषय

लेखक

सन

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

## वासुदेव वामन शास्त्री खरे

मिरज हायस्कुलांतील संस्कृत भाषेचे शिक्षक,

व 'समुद्र' या काव्याचे कर्ते,

यांनीं रचिलें.

पुणें येथें

'ज्ञानप्रकाश' छापखान्यांत छापिलें.

शके १८०७—सन १८८५.

किंमत ८ आणे.

( या पुस्तकासंबंधी सर्व हक्क कर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

राजाराम कालेजचे प्रिन्सिपाल यांनीं पसंत
करून बक्षीस दिलेलें

# गुणोत्कर्ष नाटक.

हें पुस्तक


## वासुदेव वामन शास्त्री खरे,

मिरज हायस्कुलांतील संस्कृत भाषेचे शिक्षक,
व 'समुद्र' या काव्याचे कर्ते,

यांनीं रचिलें.

तें


पुणें येथें

'ज्ञानप्रकाश' छापखान्यांत छापिलें.

शके १८०७—सन १८८५.

किंमत ८ आणे.



(या पुस्तकासंबंधी सर्व हक्क कर्त्यानें स्वाधीन
ठेविले आहेत.)

# प्रस्तावना.

या नाटकांतील नायक जिवाजीपंत हा असून मुख्य रस वीर व करुण हे आहेत. या जिवाजीपंतावर बहुत संकटें आलीं असतां शेवटीं त्या संकटांचा परिहार होऊन त्यास सुख व ऐश्वर्य हीं प्राप्त झालीं आहेत. इतकीच कथा नाटकरूपानें मुख्यत्वें वर्णन करण्याची असून त्यांतच शिवाजीची गोष्ट गोंविली आहे.

जिवाजीपंत हें मुख्य पात्र असून त्यापेक्षां शिवाजीकडेच वाचकांचें लक्ष्य विशेष लागेल. परंतु हा उणेपणा, ज्या नाटककारांनीं किंवा काल्पित कथा लिहिणारांनीं प्रसिद्ध ऐतिहासिक व काल्पनिक पुरुषांच्या कथांचें आपल्या ग्रंथांत मिश्रण केलें आहे, तेथें हरहमेशा दृष्टीस पडणारा आहे.

नाटकाचा प्रयोग तीन तासांत झाला पाहिजे अशी या नाटकाबद्दल एक अट असल्यानें व नाटक लिहिण्याचा हा माझा प्रथम प्रयत्न असल्यानें, कथेमधील निरनिराळे भाग दाखविण्यांत नाटककारापेक्षां कादंबरीकाराचीच पद्धति अनुसरणें मला योग्य वाटलें. त्यामुळें जिवाजीपंत हें नाटकांतील प्रधान पात्र असून त्यास प्रथम अंकांत रंगभूमीवर आणण्यास अवसर झाला नाहीं. कृष्णराव व राधाबाई व हीं पात्रेंही बऱ्याच महत्वाचीं असून तीं चवथ्या व पांचव्या अंकांत आणिलीं आहेत त्याचें कारण तरी तेंच आहे.

नाटकांतील भाषेच्या संबंधानेंही येथें थोडें लिहिलें पाहिजे. शिवाजी, संभाजी, हिरोजी फर्जंद व बहिर्जी हीं पात्रें मराठे जातीचीं असून त्यांच्या भाषणांत शुद्ध मराठी भाषेचा उपयोग केला आहे. तेणेंकरून वाचकांस प्रथमदर्शनीं आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. मला वाटतें कीं, असल्या पात्रांच्या भाषणांत शूद्र भाषेचा उपयोग करणें तो सारासारविचार पाहूनच केला पाहिजे. हल्लींही आपण जे मोठमोठे मराठे सरदार पाहतों त्यांची भाषा शुद्ध असते. श्रीमान् मराठे लोकांच्या घरांतून लहान मुलांस चारचौघांत बसून प्रतिष्ठित रीतीनें व शुद्ध भाषण करितां यावें म्हणून शिक्षकांची योजना केलेली असते. ही जर स्थिति सध्यांची आहे, तर ज्या वेळीं हे मराठे लोक छत्रपति व त्यांचे मुख्य सरदार यांसारख्या उच्च पदवीप्रत पावले होते, व ज्यांच्या आसपास रात्रंदिवस ब्राम्हण लोक राहत होते, ते केवळ कुणबटासारखेंच भाषण करीत असतील हें कसें संभवतें ?

ऐतिहासिक काव्यें, नाटकें, कादंबऱ्या वगैरे ग्रंथ आपल्या देशांत जसे व्हावे तसे अजून झाले नाहींत. नुकतें ग्रंथकारांचें तिकडे लक्ष्य जाऊं लागलें आहे. सुदैवानें असे ग्रंथ जर तयार होऊं लागले तर मीं अंगीकारिलेल्या मार्गाची ग्रंथकारांस अवश्यकता दिसेल. शूद्राच्या भाषणांत ग्राम्य भाषेचा उपयोग व्हावा ही गोष्ट व्यवहाररीत्या ठीक आहे; परंतु सर्व पुस्तकभर कुणबी भाषेचा उपयोग करूं लागलें तर ग्रंथास मोठें सौंदर्य येईल असें माझ्या अल्प मतीस वाटत नाहीं.

हें पुस्तक तारीख १० दिसेंबरचे आंत छापून

प्रसिद्ध होणें अवश्य होतें, व तसें होण्यास अवकाश फारच थोडा, म्हणजे सरासरी पंधरा वीस दिवसांचा काय तो राहिला. इतक्या थोडक्या वेळांत पुस्तक छापून निघण्याची मोठी पंचाईत होती; पण माझे मित्र रा० रा० हरि कृष्ण दामले, पुणें येथील न्यू इंग्लिश स्कुलांतील शिक्षक, यांनीं आपला अमोलिक वेळ खर्चून पुस्तक छापण्यासंबंधीं सर्व प्रकारची तसदी घेतली, म्हणूनच तें मुदतशीर व सुबक असें छापून निघालें. याबद्दल रा० दामले यांचा मी अत्यंत आभारी आहें.

वासुदेव वामन शास्त्री खरे.

मिरज, ता० २९ नोवेंबर १८८५.

## नाटकांतील पात्रें.

शिवाजी—महाराष्ट्र देशाचा राजा.
संभाजी—शिवाजीचा पुत्र.
मोरोपंत—शिवाजीचा मुख्य प्रधान.
प्रल्हाद निराजी—शिवाजीचा मित्र.
हिरोजी फर्जंद—शिवाजीचा मित्र.
बहिर्जी—शिवाजीचा मुख्य जासूद.
गणपतराव—पन्हाळ्याचा किल्लेदार.
रघूजी—पन्हाळ्याचा हवालदार.
जिवाजीपंत—वडगांवचा देशपांड्या.
कृष्णराव—जिवाजीपंताचा मुलगा.
राधाबाई—जिवाजीपंताची सून.
शामराव—जिवाजीपंताचा कारकून.
गोविंदपंत—जिवाजीपंताचा कारकून.

## स्थळें.

पन्हाळा, वडगांव वगैरे.

# गुणोत्कर्ष नाटक.

## अंक पहिला.

### मंगलाचरण.

श्लोक.

नेऊं दैत्यां लयातें परिहरण करूं भक्तदुःखांस देव ॥
कौसल्यादेवकींच्या उदरिं जनन घे अद्वितीयप्रभाव ॥
ज्या ज्या मर्त्यांस साधारण घडति दशा हर्षशोकादि त्यांतें ॥
दावी स्वाभाविकत्वें अवनकर असो नाटकी तो तुम्हांतें ॥१॥

( अशी नांदी झाल्यावर सूत्रधार पडद्याबाहेर येतो. )

सू०—आज श्रीमहालक्ष्मीच्या नवरात्रमहोत्सवांत येथें जमलेल्या विद्वान् व रसिक लोकांसमोर एका नवीन नाटकाचा प्रयोग करून दाखवावा, अशी आमचे महाराज शिवकुलालंकार बालभूपाल शाहू छत्रपति यांची मला आज्ञा झाली आहे. तर कोणच्या नाटकाच्या प्रयोगानें प्रेक्षकांचें मनोरंजन होईल या विवंचनेंत मी पडलों आहें. ( क्षणभर स्वस्थ राहून व सुचल्यासारखें करून. ) हो, असें एक नाटक मजजवळ आहे; पण त्याची रचना नवीन प्रकारची असल्यानें तें लोकांस कितपत रुचेल हें मला कळत नाहीं. बरें, माझा मित्र विदूषक आज येथें दिसत नाहीं. त्यास हांक मारून

त्याची या कामांत मदत घेतली पाहिजे. ( पडद्याकडे पाहून ) अरे विदूषका, इकडे ये.

**वि०**—( प्रवेश करून ) नमस्कार! अहो रावसाहेब, सूत्रधारसाहेब, नमस्कार! नमस्कार!

**सू०**—वा:! का आज नमस्कारांची फारशी गर्दी उडविली आहे! बरें तें असो. विदूषका, तुला मीं येथें का निमंत्रण केलें हें कळलें?

**वि०**—हो हो! कळलेंच पाहिजे! विदूषकाला बोलावणें कशाकरितां होणार? जेवणाकरितां! पण सूत्रधारपंत, केवढीहो तुमची ब्राम्हणांच्या ठायीं भक्ति! केवढी तुमची दानशूरता! तुमची औदार्य-नदी अशी अपरंपार भरून चालली आहे कीं, जींत शेंकडों याचक बुडून मरण पावतात!

**सू०**—वाहवा! कल्पना तर मोठी सरस केलीस बुवा! पण विदूषका, मीं तुला जेवणाकरितां बोलाविलें नाहीं!

**वि०**—( नाक मुरडून ) अं! तर मग आम्हांला कशाकरितां बोलाविलेंत हो?

**सू०**—तुझें मला साह्य पाहिजे आहे.

**वि०**–( डोलानें ) मित्रास साह्य करण्याचा आमचा धर्मच आहे! दुसऱ्यावर उपकार करण्याविषयीं आम्ही तर केवळ कर्ण. नाहीं–कर्णाहूनही मोठे महाकर्ण-अतिकर्ण लंबकर्ण—काय म्हणाल तें म्हणा!

**सू०**—या रंगभूमीवर एक नाटक करून दाखवावें असें माझ्या मनांत आहे याकरितां—

**वि०**—(त्रासून) नकोतरे बाबा मला तीं तुझीं नाटकें! सूत्रधारा, खरेंच सांगतों, तुझ्या नाटकांस कंटाळून मी आतां संन्यास घेतों आणि काशीस जाण्याची तयारी करितों!

सू०—कांहो विदूषकराव, असे त्रासलां कां ? संन्यास घेऊन काशीस जाण्यासारखें आमच्या नाटकांनीं तुमचें काय केलें ?

वि०—बाबारे, परदुःख शीतल म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं ! मला काय काय क्लेश झाले आहेत ते तुला सांगून काय उपयोग ?

सू०—सांगा सांगा तर खरें ! ऐकूं द्या आम्हांला.

वि०—बाबारे, तूं नाटकें करूं लागलास म्हणजे होतात देवदैत्यांच्या मारामाऱ्या, आणि रंगभूमीवरच्या लढाईंत पडलेल्या मंडळींस उचलून पडद्यांत न्यावें लागतें मला ! एकदां असाच त्या रामराक्षसांच्या मारामारींत मी सांपडलों आणि एका राक्षसानें मजवर केला तरवारीचा वार. त्या वारासरसें त्या लेकानें माझें डोकें कापून कोणीकडे उडविलें नकळे ! मग डोक्याशिवाय कित्येक दिवस काम करीत होतों ! हल्लीं डोकें आहे हें माझें नव्हे. हे एका डाक्टरानें मोठ्या कुशलतेनें माकडाचें डोकें माझ्या धडावर बसविलें आहे ! ( मान हलवून ) तो डाक्टर मोठा हुशार खरा बुवा !

सू०—आणि तुमचें डोकेंही माकडाचें खरेंच. बरें मग ?

वि०—मग काय तुझें कपाळ ? म्हणून म्हणतों, ही तुझीं नाटकें मला नकोत; मी आपला जातों कसा !

सू०—अरे मित्रा, जाऊं नको ऐक. आज जें मी नाटक करणार आहें त्यांत पौराणिक विषय नाहीं. त्यांत व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टींचें निरूपण केलें आहे. विशेषेंकरून दुर्जन मैत्रीच्या मिषानें भोळ्या लोकांस कसे

फशीं पाडतात, चांगल्या स्वभावाचा मनुष्यही प्रसंगीं दुष्ट लोकांच्या संगतीस लागून कुमार्गास कसा प्रवृत्त होतो, कशींही संकटें आलीं असतां सद्गुणी स्त्रियांचें पातिव्रत्य कसें स्थिर रहातें, इत्यादि गोष्टी प्रेक्षकांच्या. नजरेस आगण्याचा नाटककर्त्यानें यत्न केला आहे. मराठी राज्याचे स्थापक जे शिवाजी महाराज त्यांचें चरित्र या नाटकांत वर्णिलें आहे. विदूषका, असें नाटक केलें असतां तुझें साह्य मला मिळेल कीं नाहीं ?

वि०—हो, असें कांहीं बोलशील तर तें मी ऐकेन; आणि तुझें हें नाटक लोकांसही पसंत पडेल असें मला वाटतें.

सू०—मलाही असेंच वाटतें. कारण कीं त्या राजर्षि शिवाजीचें चरित्र भारतभागवताप्रमाणें लोक भक्तिपुरःसर वाचतात.

वि०—हो, हो. रायगडचा बादशहा जो नादिरशहा व विजापूरचा बादशहा जो औरंगजेब त्यांच्याशीं विजयानगरच्या मुसलमानांचें साह्य घेऊन शिवाजीनें लाहोराहून येऊन लढाई केली; त्या वेळेस त्याचा चुलता राघोबादादा व उदेपूरचा टिपू सुलतान यांनीं मोठी मर्दुमकी करून गाणगापूरच्या खाडींतील वसईचा किल्ला घेतला; या गोष्टी कोणास माहीत नाहींत ?

सू०—वाहवा वाहवा !! विदूषका, तुझें इतिहासाचें व भूगोलाचें ज्ञान तर अगाध आहे बाबा !

वि०—अगाध म्हणजे विचारणें काय ? आज बारा वर्षेंपर्यंत त्या विषयाचा व्यासंगच मीं केला आहे !

सू०—विदूषका, आपणास शिवछत्रपतीचें चरित्र

दाखविणें आहे. त्याकरितां दोनशें वर्षांपूर्वींच्या काळांतील आपण माणसें आहों असें आपणांस कल्पिलें पाहिजे. तर मजबरोबर पन्हाळगडाखालच्या रानांत चल, म्हणजे तुला तेथें काय काय चमत्कार होतील ते दिसतील.

**वि०**—भटक्या मारीत हिंडावयाचें खरें, मग रानांत कां ? दिल्लीसारख्या एकाद्या मोठ्या शहरांतच कां न जावें ?

**सू०**—त्याचें कारण असें कीं, शिवाजी महाराज कर्नाटकांतून स्वदेशास परत येत असतां तोरगल मुक्कामीं एकदम गुप्त झाले. तेथून ते वेषांतर करून बातमी काढण्याकरितां स्वतः या रानांत आले आहेत. तर आतां डोळे मीट, म्हणजे एका क्षणांत त्या स्थळीं तुला प्रविष्ट करितों.

**वि०**—( डोळे मिटून व उघडून ) अरे वाः सूत्रधारा, आपण पन्हाळगडाखालींच येऊन पोहोंचलों ! चल तर आतां शिवाजी महाराजांस शोधून काढूं. ते मोठे उदार आहेत असें मी ऐकतों. तूं आपल्या तुणतुण्याची तार चढवून एक पोवाडा म्हणूं लाग आणि मी तुला सूर देऊन "जी जी" ओढतों. म्हणजे आपणांस कांहीं तरी इनाम मिळेल. मग आपण हा नाटकाचा धंदा सोडून अग्निहोत्र घेऊं !

**सू०**—अरे, महाराजांचा शोध करण्यास दूर जावयास नको. ते पहा स्वतःच इकडे येत आहेत. त्यांबरोबर आणखी दोन असामी असून त्या सर्वांनीं कुणब्यांचे वेष घेतले आहेत. ते बोलण्याच्या नादांत अगदीं चूर झाले आहेत. याकरितां येथें त्यांस गडबड करणें हें आपणांस

श्रेयस्कर होणार नाहीं. तर चला जाऊं आपण एकीकडे.

[ सूत्रधार व विदूषक जातात. ]

[ नंतर शिवाजी राजा हा हिरोजी फर्जंद व प्रल्हाद निराजी यांसहवर्तमान प्रवेश करितो. ]

**शि०**—प्रल्हादपंत, आपण येथपर्यंत तर सुखरूप आलों. ( आसपास पाहून ) अहाहा ! काय हें सृष्टिवैभव ! येथें झाडी इतकी गर्द आहे कीं तींतून सूर्यकिरणांचाही प्रवेश होत नाहीं. नुकत्याच प्रफुल्लित झालेल्या वन्य पुष्पांचा सुगंध जिकडे तिकडे सुटला आहे. चित्रविचित्र रंगाचे पक्षी आनंदानें शद्ध करीत या झाडावरून त्या झाडावर उडत आहेत. इकडे पहावें तों डोंगरांतून स्वच्छ पाण्याचे ओढे उद्दामपणानें खालीं उड्या टाकीत येतांना दृष्टीस पडतात. तिकडे वेलींचीं भलीं मोठालीं जाळीं माजून तीं कड्यावरून खालीं लोंबत आहेत. त्यांच्या हिरव्या गार पानांवर सकाळीं पडलेले दंवाचे बिंदु उन्हांत चकाकत आहेत. वाऱ्याच्या झुळकेसरसें हें दाट पसरलेलें धुकें हालत आहे व तेणेंकरून त्याखालीं लपलेल्या भयंकर दरी दृष्टिगोचर होत आहेत. तो पहा पन्हाळगडचा डोंगर आपणाकडे जणू काय टवकारून पहात आहे! दक्षिणेकडे व पश्चिमेकडे जों जों दृष्टि लावावी तों तों एकामागून एक उठणाऱ्या पर्वतांच्या रांगा दृष्टीस पडतात. माझें सर्व आयुष्य असल्याच प्रदेशांत गेलें असल्यानें हीं स्थळें मला फार आवडतात. तशांतून त्या रखरखीत, रांकट, निःसत्व व निर्जल अशा कर्नाटकांतून मी दीड वर्षानें परत आलों आणि हा रम्य प्रदेश माझ्या दृष्टीस पडला; तेणेंकरून माझ्या मनाला फारच समाधान झालें आहे. बरें

बहिर्जी करविरास गेला आहे, त्याचा व आपला कोणत्या ठिकाणीं भेटण्याचा संकेत झाला आहे?

प्र०—तें ठिकाण येथून सुमारें दीड कोसावर आहे. तेथें एक देवीचें जुनें देऊळ आहे. त्या ठिकाणीं बहिर्जी आपणांस करविराहून येऊन मोंगलांकडील बातमी सांगेल. त्यापूर्वीं आपण किल्ल्यावर जाऊन तेथील स्थिति कशी काय आहे याची चौकशी केली पाहिजे.

हि०—पन्हाळ्यावरील किल्लेदार इमानास जागून सरकारची चाकरी बजावीत असेल तर मोंगलांनीं जरी करवीर घेऊन प्रांतांत दंगा माजविला आहे, तरी त्यापासून विशेष भीति वाळगणें नको. त्यांस पाहिजे तेव्हां येथून घालवून देतां येईल. परंतु जर का हाच किल्लेदार दगलबाजीनें पन्हाळा मोंगलांच्या स्वाधीन करणार असेल, तर रांगण्यापासून विजापूरच्या सरहद्दीपर्यंत मधला सर्व मुलूख मोंगल त्वरेनें काबीज करितील; कारण करविरास आलेला मोंगलांचा सरदार रणमस्तखान हा मोठा शूर असून त्याजवळ फौजेची तयारी दिवसेंदिवस चांगली होत आहे.

शि०—मला वाटतें कीं या किल्लेदाराच्या फितुराबद्दल ही केवळ बाजारबातमीच असेल. जर किल्लेदार फितूर असता तर आम्ही कर्नाटकांत व पेशवे कोंकणांत असतांच तो मोंगलांस पन्हाळ्याचा किल्ला देता.

प्र०—कदाचित् ती खरीही असेल. त्या किल्लेदारास गडकरी अजून अनुकूळ झाले नसतील किंवा संभाजी महाराज हल्लीं तेथें आहेत, त्यांच्या धास्तीनें तो उद्योग सध्या बंद पडला असेल.

शि०—मला चमत्कार म्हणून एवढाच वाटतो कीं,

प्रत्यक्ष माझा मुलगा किल्ल्यावर असून त्यानें मोंगलांचें बंड इतकें कसें बळावूं दिलें? तो कांहीं आतां लहान नाहीं. त्याला या सर्व गोष्टी कळाव्या. आतां लवकर फौज आणवून मोंगलांस करवीर प्रांतांतून हांकून लाविलें पाहिजे. प्रल्हादपंत, पेशवे हल्लीं कोणीकडे आहेत व ते इकडे केव्हां येतील हें तुम्हांस माहीत आहे?

प्र०—सरकार, मोरोपंत पेशवे कोंकणांतून निघून पार घांटानें वर चढून मजल दरमजल इकडेच येत आहेत. त्यांबरोबर नऊ हजार सडी फौज असून त्या फौजेचा मुक्काम आज संध्याकाळीं कऱ्हाडाच्या अलीकडे चार कोसांवर व्हावयाचा होता.

शि०—ते जितके लवकर येतील तितकें बरेंच आहे. ( समोर पाहून ) हा घोड्यावर बसून तिकडून कोणी मनुष्य येत आहे. याचा घोडा उमदा असून हा शिपाईबाण्याचा मनुष्य दिसतो. हा कोणी किल्ल्यावरला मोठा अधिकारी असेल. याची आपण थोडी विचारपूस करूं. ( घोडेस्वार जवळ आलासें पाहून त्यास )राम राम रावसाब!

घोडे०—कोणरे तुम्हीं हरामखोरांनो? कोणीकडून आलेत? चाललां कोणीकडे?

प्र०—हामी म्हाराज आलों तकडून वारशी वैरागाकडून. आन् हामी चाललों या कोकनामंदी. रावसावांच्या पायांचे चाकुर हाओं हामी गरीब कुनबी.

शि०—गडावर ह्योच रस्ता जातुया व्हय रावसाब?

घोडे०—तुम्हांला रस्ता विचारण्यास मीच तेवढा मनुष्य भेटलों वाटतें! आपले बरोबरीचा मनुष्य पाहून

विचारावयाचें होतें. बैलांनो, तुम्ही कोणाशीं बोलत आहां हें तुम्हांला माहीत आहे ?

शि०—( आपल्याशीं ) भल्या गृहस्था, तूं कोणाशीं बोलत आहेस हें तुला तरी माहीत आहे ? ( मोठ्यानें ) असं कसं व्हईल रावसाब ! आपुन कोनू तरी म्होट सरदार गडी असत्याल. ह्ये हमी कुनबी झालों म्हनुनशानी हमास्नी उमगत नाहीं. आपनाला काय म्हनूत्यातू रावसाब ?

घोडे०—तुम्ही मोठे लबाड मनुष्य दिसतां. मी कोण, मला काय म्हणतात ही चौकशी तुम्हांलारे कशाला पाहिजे ?

शि०—(आपल्याशीं) हा मनुष्य कावेबाज दिसतो. हा कोण कुठला हें तर कळलेंच पाहिजे. ( मोठ्यानें ) धनी-साबांचा वारूबी लइ उमदा दिसतो. त्याच्या आंगांतून घामबी आक्शी दरदरूनशानी चाललाया. जनावर पन जनावर. हामा गरीबांस्नी असलं बगायबी गवसायच न्हइ.

घोडे०—( डौलानें ) अरे किमतच तशी पडली आहे! या घोड्याला विजापुरी होन शंभर मोजले आहेत. इतकें सोनें तुझ्या वाडवडिलांनीं कधीं पाहिलेंही नसेल! ( घोड्याची मान थोपटून ) गडी असा बहाद्दर आहे कीं एका मजलेंत सातान्यास जायचा. आज कोंबडा आरवल्याबरोबर गडावरून निघालों तों गेलों करविरास अरूणोदयाला. तेथें चार घटका बसून पुन्हा निघालों तो हा आतां गडावर चाललों. ( घोडेस्वार मध्येंच हिरोजीस निरखून पहातो व घाबरून ) अंहं:, मी करविरास नव्हतों गेलों महाराज!

शि०-(चपापून) महाराज कोनाला म्हनूताव धनीसाब ?

[ घोडेस्वार कांहीं उत्तर न देतां पळून जातो. ]

शि०—काय चमत्कारिक मनुष्य हा ! यानें नुकतीच कोठें जीभ सैल सोडिली होती इतक्यांत याला काय आठवलें नकळे ! एकदम पांखरूं उडून गेल्याप्रमाणें निघून गेला ! ( सचिंत ) हा जर किल्ल्यावरील अधिकारी असला तर हा करविरास कशाकरितां गेला असेल बरें ?

हि०—( संतापून ) मला ठाऊक आहे तो कशाकरितां करविरास गेला होता तें. महाराज, गणपतराव किल्लेदार म्हणतात तो हाच. भला गुलाम दगलबाज पाजी मनुष्य. तो माझ्या पूर्ण माहितीचा आहे. माणकोजी दुतोंड्याच्या हाताखालीं तो आणि मी कांहीं दिवस जमादार होतों.

शि०—( हिरोजीकडे वळून ) हा गृहस्थ तुझ्या ओळखीचा होता तर तूं मला पूर्वीं सांगावयाचें होतेंस. आम्ही त्याच्या दृष्टीसच पडलों नसतों. आतां त्यानें आम्हांस ओळखलें असलें तर कसें होईल ?

हि०—ही गोष्ट मी आपणांस सुचविणार होतों. परंतु मला अवकाशच सांपडला नाहीं. तो एकदम आला आणि आपण त्याजबरोबर बोलूं लागलां. मग निघून जावें तर संशय उत्पन्न होणार, म्हणून मी उगीच राहिलों. त्यानें आपणांस ओळखिलें असेल हें संभवत नाहीं. कारण, त्याची व माझी संगत सुटून अकरा वर्षें झालीं. त्यांतून आपले वेष या तऱ्हेचे आहेत. तेव्हां तो आपणांस कसें ओळखील ?

प्र०—जर त्यानें आपणांस ओळखिलें नाहीं तर

पळून कां गेला व " महाराज् " हीं अक्षरें त्याच्या मुखां-तून कां निघालीं ?

हि०—दोहोंचेंही कारण एकच गोष्ट आहे. ती हीच कीं, आपल्या घोड्याची फुशारकी सांगतां सांगतां हा घोड्यावर बसलेला गाढव मी महाराजांचा नोकर असून करविरास मोंगलाकडे गेलों होतों हें परक्या लोकांसमोर आपोआप बोलून गेला. मग फटकर आपण भलतेंच बोलून गेलों याची त्याला शरम वाटून त्यानें पळ काढला. तो पळाला म्हणूनच बचावला; नाहीं तर आज त्याला मी एव्हांना जमीनीवर लोळविलें असतें!

शि०—कसेंही झालें तरी त्याच्या विश्वासघाताबद्दल आतां संशय राहिला नाहीं. चला आपण त्या देवळाकडे जाऊं व बहिर्जी करविराहून काय बातमी आणतो तें पाहूं.

हि० — चला. [ जातात.

[ नंतर मरधांव घोडा टाकीत **गणपतराव किल्लेदार** येतांना दृष्टीस पडतो. ]

---

## प्रवेश दुसरा.

ग०—( आपल्याशीं ) काय माझें पूर्वजन्मीचें पुण्य होतें नकळे! आज वाघाच्या जबड्यांत सांपडून जिवंत सुट-लों किहो? ( भीतीनें अंगावर शहारे आल्यासारखें दाखवून ) होय. शिवाजीच तो. हिरोजीफर्जंद हिरोजीफर्जंद. त्याला वाटलें असेल मीं त्याला ओळखलें नाहीं म्हणून. मी–मी त्याला विसरेन? तिसरा कोण तो? तो प्रल्हादपंत असेल. कारण, तोर्गलाहून हे तिघेच गुप्त झाले अशी बातमी मला जासु-दांनीं कळविली आहे. मी पळत असतां पाठीमागून शिवा-

णीनें भवानीचा एखादा फटकारा नाहीं ना मारला? मी घाल्यास टांच मारिली तेव्हां बंदुकीचा बार ऐकिल्यासारखा वाटतो. माझ्या अंगाला एखादी गोळी नाहींना लागली? ( आंग चांचपून ) छे. कांहीं नाहीं. तो उगीच भ्रम. ( त्रासून )काय करावें आतां? आग लागो या माझ्या तोंडाला? मी आपणास आतां किती तरी शिव्या घेऊं? अरे, सर्व जगाला ठकवूं पाहणारा मी गणपतराव, आणि मीं असें बावरल्यासारखें भलतेंच बोलून जावें? आणि तेंही शिवाजीपुढें? माझी जिव्हा गळून कां नाहीं पडली? आतां मी शिवाजीच्या तावडीस सांपडलों तर मरणाशिवाय मला दुसरी गति नाहीं ! शिवाजीच्या दरबारांत विश्वासघात करणाऱ्यावर दया नाहीं. खंडोजी काकड्याची जी स्थिति झाली तीच माझी होणार ! बरें, या लचांडांतून सुटण्याची कांहीं तोंड निघेल कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. ( विचार करीत असतां कांहीं सुचल्यासारखें दाखवून ) ओहो ! झालें काम. आतां अशी एक युक्ति काढिली आहे कीं, सगळें जग माझ्या शहाणपणाची तारीफच करीत राहील ! बघा हीं आतां किती बस्तानें बांधलीं आहेत तीं ! संभाजीला मोंगलांचे स्वाधीन करून देऊन त्यांच्या फौजेंतला मी मनसबदार होणार. वडगांवचा देशपांड्या जिवाजीपंत याची सून संभाजीनें गडावर अडकवून ठेविली आहे; तिच्या नवऱ्याला मारून शेवटीं तिला मीच उपटणार. संभाजीचा डोळा तिच्यावर आहे खरा, पण तो मोंगलांकडे गेला म्हणजे जिवंत कशाला राहतो ? पण आतां जी मला युक्ति सुचली आहे ती सगळ्याहून विशेष. अहो, संभाजीला पकडून मोंगलांकडे नेल्याबद्दल जर दोन हजार स्वारांची मनसबदारी मिळते, तर

प्रत्यक्ष शिवाजीलाच धरून दिल्यावर एखादी मोठी जहागीर कां न मिळावी ? बापाची गादी बळकावावी व आपण राज्य करावें हा संभाजीचा हेतु. त्यासाठींच मोंगलांकडे जाण्यास तो तयार झाला आहे. त्याला मी भर देतों कीं तुझा बाप एकटा या रानांत हिंडत आहे त्याला धर, आणि राज्य मिळीव. माझी मसलत तो ऐकेलच. मग मी संभाजीचे वतीनें शिवाजीस धरण्यास जाईन. माझ्या सुदैवानें शिवाजी सांपडला तर फारच उत्तम. नाहीं तर त्यांत इतकें तरी होईल कीं शिवाजीचें व संभाजीचें अगदीं वितुष्ट पडेल. मग संभाजी कोठें जातो? तो आपला जीव बचावण्याकरितां मोंगलांकडे पळेल आणि माझें कार्य होईल! ( हर्षानें ) वाहवा! शिवाजी कपटी तर मी सात कपटी! त्याच्याच तंगड्या त्याच्याच गळ्यांत घाऊणारा मी! ( मोठ्यानें हंसून ) आतां मी किल्ल्याच्या माचीवर येऊन पोंचलों. ( मागें पाहून ) तो तपकिरी रंगाचें पागोटें घालून पोटाचें ढेर हालवीत हालवीत जलदी जलदीनें कोण येत आहे बरें! हां हां, तो शिवाजीपंत देशपांड्या. त्याच्या मुलग्याला आणि सुनेला प्रतिबंधांत ठेविल्याबद्दल रडगाणें गाण्याकरितां तो संभाजीकडे येत असेल. पण याची आणि संभाजीची गांठ पडूं देऊन उपयोगीं नाहीं. हा लुच्चा थेरडा वेदांताच्या लांब लांब गोष्टी सांगून त्याचें मन कदाचित् वळवील. छेः, तें उपयोगीं नाहीं. ( तो दरवाज्यांत जातो आणि पहारेकरी त्यास रामराम करितात. तो रामराम घेत पहारेकऱ्यांस म्हणतो. ) अरे, रघूजी हवालदार कोठें आहे ?

र०—( पुढें होऊन ) जी.

ग०—हवालदार, वडगांवचे जिवाजीपंत देशपांडे अर्ध्या घटकेनें येथें येतील, त्यांस किल्ल्यांत येऊं देऊं नका, समजलां?

ह०—जी–हुकूम.

ग०—संभाजी महाराज आतां काय करीत आहेत हें तुम्हांला माहीत आहे?

ह०—म्हाराज बंगल्यामंदी एकलच बसल्याती.

ग०—ठीक आहे. मी आतां त्यांच्याच भेटीस जातों.

[ जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[ गणपतराव व संभाजी येतात. ]

सं०—एकूण खान म्हणतो कीं मीं आतांच त्याच्या छावणींत निघून यावें; म्हणजे तो दिल्लीहून फौज आणवून मराठी राज्य जिंकणार आणि तें माझ्या स्वाधीन करणार. गणपतराव, हें खानाचें बोलणें दिसण्यांत सरळ दिसतें खरें, परंतु त्याच्या खरेपणाबद्दल मला वारंवार संशय येतो.

ग०—कां बरें?

सं०—मोंगलांची जात म्हणजे प्रथमपासून दगलबाज. त्यांचा धर्म निराळा व जात निराळी. ते आजकाल प्रबळ असून आम्हां हिंदूंस तुच्छ लेखितात. तेव्हां त्यांस मराठी राज्य बुडविण्याची इच्छा कां नसेल? कोणच्या तरी रीतीनें मला पकडून दगा करावा अशी तर मसलत नसेल ना?

ग०—छे छे! महाराज, ही शंका मलाही पूर्वीं आली नसेलसें आपणांस वाटतें? मीं आपल्या सेवेस माझें तनमन

अर्पण केलें आहे. माझ्या जिवापेक्षां आपल्या जिवाच्या संरक्षणार्थ मला दसपट अधिक जपावें लागतें. मी पूर्ण चौकशी केली आहे, आणि आपणांस मी खात्रीनें सांगतों कीं, खानाच्या मसलतींत कपट मुळींच नाहीं. मोंगलांचें वैर मराठे लोकांशीं नाहीं; शिवाजी महाराजांशीं त्यांचें वैर आहे; कारण ते वारंवार केलेले तह व ठराव मोडून मोंगलांच्या मुलखांत शिरतात; व लुटालूट करून प्रजेस फार क्लेश देतात. मोंगलांशीं मैत्रीनें वागणारा व आपल्या प्रजेचें यथान्यायेंकरून पालन करणारा व आपल्या लुटारू शिपाई लोकांस जरबेंत ठेवणारा असा राजा रायगडच्या गादीवर बसेल तर ती गोष्ट मोंगलांस इष्टच आहे.

सं०—पण माझ्या कुळांतील पुरुषांनीं आजपर्यंत मोंगलांशीं वैरच केलें, सख्य केलें नाहीं. मोंगलांनीं बुडविलेली निजामशाही पुनः स्थापित करण्याकरितां माझा आजा दिल्लीपतीबरोबर कित्येक वर्षें झगडत होता. माझ्या बापानें आपल्या प्रतापानें मोंगलांस जर्जर केलें आहे. त्याचा पुत्र मी संभाजी, आपल्या कुळाचे व देशाचे हाडवैरी जे मोंगल त्यांजबरोबर कसें सख्य करूं?

ग०—संभाजी महाराज, आपल्या आजोबांनीं व वडिलांनीं मोंगलांबरोबर युद्ध करीत असतां विशेष पराक्रम केले ही गोष्ट खरी आहे. परंतु ते दिवस आतां गेले. अलम्गीर बादशहाच्या पुण्यानें व प्रतापानें मोंगल प्रबळ होत चालले आहेत. त्यांनीं हिंदुस्थानांतील सर्व राज्यें बुडविलीं. आपल्या दक्षिण देशांत तरी निजामशाही ठार बुडाली. मोंगलांनीं विजापूर हाताखालीं घातलेंच आहे. कुतुबशाहीची हळूहळू तीच दशा होणार, मग आपलें

ग०—हवालदार, वडगांवचे जिवाजीपंत देशपांडे अर्ध्या घटकेनें येथें येतील, त्यांस किल्ल्यांत येऊं देऊं नका, समजलां?

र०—जी–हुकूम.

ग०—संभाजी महाराज आतां काय करीत आहेत हें तुम्हांला माहीत आहे?

र०—म्हाराज बंगल्यामंदी एकलच बसल्याती.

ग०—ठीक आहे. मी आतां त्यांच्याच भेटीस जातों.

[ जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[ गणपतराव व संभाजी येतात. ]

सं०—एकूण खान म्हणतो कीं मीं आतांच त्याच्या छावणींत निघून यावें; म्हणजे तो दिल्लीहून फौज आणवून मराठी राज्य जिंकणार आणि तें माझ्या स्वाधीन करणार. गणपतराव, हें खानाचें बोलणें दिसण्यांत सरळ दिसतें खरें, परंतु त्याच्या खरेपणाबद्दल मला वारंवार संशय येतो.

ग०—कां बरें?

सं०—मोंगलांची जात म्हणजे प्रथमपासून दगलबाज. त्यांचा धर्म निराळा व जात निराळी. ते आजकाल प्रबळ असून आम्हां हिंदूंस तुच्छ लेखितात. तेव्हां त्यांस मराठी राज्य बुडविण्याची इच्छा कां नसेल? कोणच्या तरी रीतीनें मला पकडून दगा करावा अशी तर मसलत नसेल ना?

ग०—छे छे! महाराज, ही शंका मलाही पूर्वीं आली नसेलसें आपणांस वाटतें? मीं आपल्या सेवेस माझें तनमन

अर्पण केलें आहे. माझ्या जिवापेक्षां आपल्या जिवाच्या संरक्षणार्थ मला दसपट अधिक जपावें लागतें. मीं पूर्ण चौकशी केली आहे, आणि आपणांस मी खात्रीनें सांगतों कीं, खानाच्या मसलतींत कपट मुळींच नाहीं. मोंगलांचें वैर मराठे लोकांशीं नाहीं; शिवाजी महाराजांशीं त्यांचें वैर आहे; कारण ते वारंवार केलेले तह व ठराव मोडून मोंगलांच्या मुलखांत शिरतात; व लुटालूट करून प्रजेस फार क्लेश देतात. मोंगलांशीं मैत्रीनें वागणारा व आपल्या प्रजेचें यथान्यायेंकरून पालन करणारा व आपल्या लुटारू शिपाई लोकांस जरबेंत ठेवणारा असा राजा रायगडच्या गादीवर बसेल तर ती गोष्ट मोंगलांस इष्टच आहे.

सं०—पण माझ्या कुळांतील पुरुषांनीं आजपर्यंत मोंगलांशीं वैरच केलें, सख्य केलें नाहीं. मोंगलांनीं बुडविलेली निजामशाही पुनः स्थापित करण्याकरितां माझा आजा दिल्लीपतीबरोबर कित्येक वर्षें झगडत होता. माझ्या बापानें आपल्या प्रतापानें मोंगलांस जर्जर केलें आहे. त्याचा पुत्र मी संभाजी, आपल्या कुळाचे व देशाचे हाडवैरी जे मोंगल त्यांजबरोबर कसें सख्य करूं?

ग०—संभाजी महाराज, आपल्या आजोबांनीं व वडिलांनीं मोंगलांबरोबर युद्ध करीत असतां विशेष पराक्रम केले ही गोष्ट खरी आहे. परंतु ते दिवस आतां गेले. अलमगीर बादशहाच्या पुण्यानें व प्रतापानें मोंगल प्रबळ होत चालले आहेत. त्यांनीं हिंदुस्थानांतील सर्व राज्यें बुडविलीं. आपल्या दक्षिण देशांत तरी निजामशाही ठार बुडाली. मोंगलांनीं विजापूर हाताखालीं घातलेंच आहे. कुतुबशाहीची हळूहळू तीच दशा होणार. मग आपलें

एवढेंसें मराठी राज्य या दिल्लीपतीच्या सेनासमुद्रापुढें कसें टिकेल ? बरें तें टिकलें असें आपण समजूं. त्यांत आपणांस लाभ कोणता ? महाराजांचा मनोदय आपल्यामागें कनिष्ठ पुत्रानें राज्य करावें असा आहे. आपल्या मातुश्री परलोकास गेल्या. आपली सावत्र आई तर आपणांस पाण्यांत पाहते. दरबारी लोक आपला द्वेष करितात. मग आपणांस राज्यलाभाची आशा कोठें राहिली? याकरितां मी म्हणतों कीं मोंगलांशीं सख्य करून आपलें कल्याण करून घ्यावें. त्यांतून म्लेंच्छांचा आश्रय करण्यांत आपल्या मनास फारच खंत वाटत असेल तर मी आपणांस दुसरी युक्ति सांगतों. तेणेंकरून मोंगलांचें साह्य घेतल्याशिवाय अल्पश्रमानें आपलें काम होणार आहे. आपली इच्छा असली म्हणजे झालें. एकाच दिवसांत आपण "श्रीमन्महाराजाधिराज शंभु छत्रपति" असें नांव पावाल.

**सं०**—कोणची युक्ति ? सांग पाहूं ?

**ग०**—शिवाजी महाराजांस धरून प्रतिबंधांत ठेवा, आणि आपण गादीवर बसून आपले नांवाची द्वाही फिरवा.

**सं०**—का गणपतराव, आज सकाळींच कोठें भांग प्यायला सांपडली ? का अकस्मात् तुमचें माथें फिरलें ?

**ग०**—( गंभीरपणानें ) मी भांगही प्यालों नाहीं, आणि सुदैवानें मला वेडही लागलें नाहीं. माझी बुद्धि इतर मनुष्यांप्रमाणें चांगली शाबूद आहे !

**सं०**—मग मघां काय बरळत होतास तें ! तूं मला वाऱ्याची मोट बांधूं पहाणाराच गडी दिसतोस !

**ग०**—शिवाजी राजाला जिवंत धरणें आणि वाऱ्याची

मोट बांधूं जाणें या दोन्ही गोष्टी सारख्याच अशक्य आहेत हें मीही जाणतों ; पण आपलें प्राक्तन असें बलवत्तर आहे कीं, तशीही गोष्ट घडून येण्याचा संभव आज आहे. ऐका—दचकूं नका—शिवाजी महाराज या क्षणीं तुमच्या अगदीं समीप आहेत !

**सं०**—( घाबरून ) काय म्हणतोस? गणपतराव, बाबा येथें आले आहेत ? कोठें आहेत ते ? बोल लवकर!

**ग०**—ते या वेळीं येथून अर्धकोसावर रानांत फिरत आहेत. मीं प्रत्यक्ष त्यांस डोळ्यांनीं पाहिलें !

**सं०**—( अतिशय घाबरून ) आतां काय करणाररे ? आपला सर्वस्वी नाश झाला !

**ग०**—छे ! घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यांजबरोबर फौजफांटा कांहीं नाहीं. फक्त दोन मनुष्य आहेत.

**सं०**—ते कोण बरें ?

**ग०**—त्यांपैकीं एक तर हिरोजी फर्जंद माझ्या ओळखीचा आहे. दुसरा प्रल्हादपंत असावासें वाटतें. महाराजांस तरी मीं धोरणानें ओळखलें. त्यांनीं जरी केवळ कुणब्याचा वेष घेतला आहे, तरी त्याखालीं त्यांचें तेज झांकत नाहीं !

**सं०**—ते इकडे कशाला बरें आले असावे ?

**ग०**—या प्रांतांत मोगल शिरले आहेत, तेव्हां त्यांची बातमी काढण्याकरितां ते आले असावे. त्यांस आम्हांबद्दल अजून संशय आला नसेल. जरी त्यांस संशय आला असला, तरी त्यांजपासून आम्हांस सध्या कांहीं भीति बाळगावयास नको !

सं०—मग आतां मी काय करावें म्हणतोस ?

ग०—करायाचें काय, महाराजांस एकदम धरून आपण गादीवर बसावें. आपल्या शौर्याबद्दल, चातुर्याबद्दल व स्वधर्माभिमानाबद्दल जिकडे तिकडे कीर्ति पसरलीच आहे. लोक आपणांस सहज वश होतील. मग सोयराबाईसाहेब व प्रधानमंडळी रडत बसतील तर बसेनात !

सं०—माझ्या हातून ही गोष्ट कधींही घडणें नाहीं. दगा करून राज्य मिळवावें अशी माझी इच्छा नाहीं ! त्यापेक्षां वडिलांबरोबरच कां होईना, पण रणामध्यें तरवारीचे दोन हात करून राज्यलाभाचा यत्न करणें हें योग्य होय. मग त्यांत जय झाला तर राज्य मिळेल ; धारातीर्थीं मरण आल्यास स्वर्गप्राप्ति होईल !

ग०—संभाजी महाराज, आपल्या शौर्याबद्दल कोणासही संशय नाहीं. लोक म्हणतात कीं धैर्य, साहस, आणि युद्धचातुर्य या गुणांत बापापेक्षां मुलगा कांकणभर चढच !

सं०—असें जर आहे तर शूर पुरुषाच्या चारित्रास कलंक लावण्यासारखी गोष्ट तूं मला कशी सांगतोस !

ग०—याचें कारण आपले शौर्याचा या प्रसंगीं कांहीं उपयोग नाहीं म्हणून. नुसत्या शौर्यानें कधींही कामें होत नसतात ! शौर्यास मुख्यत्वेंकरून कपटाचें साह्य पाहिजे. द्रोणासारख्या प्रबल शत्रूशीं लढत असतां प्रत्यक्ष धर्मराजानेंही कपटाचा अंगीकार केला, मग आपली ती कथा काय? कपटानें जें काम एका क्षणांत होईल तें शौर्यानें दहा वर्षांत देखील होणार नाहीं ! तस्मात् युक्तीच्या मार्गानें अल्पकाळांत व अल्पश्रमांत जर आपले

मनोरथ सिद्धीस जाण्याजोगे असतील, तर शौर्यापेक्षां युक्तीचें अवलंबन सुज्ञ पुरुषांनीं अवश्य करावें. जर कोणी या युक्तीस 'लुच्चेगिरी' 'हरामखोरी' 'दगलबाजी' अशीं निंदाद्योतक नांवें देतील तर खुशाल देवोत! परंतु इतकें खचीत आहे कीं, कपटाचें अवलंबन केल्याशिवाय आजपर्यंत कोणीही वैभवास चढला नाहीं. फार कशाला, आपल्या वडिलांनीं जें एवढें राज्य स्थापिलें तें कशानें! कपटानचें ना! ते जर आपल्याप्रमाणें तरवारीच्या जोरावर राज्य स्थापूं असें म्हणते, तर चार बादशहांशीं दावा लावण्यांत त्यांचा टिकाव कसा लागता? आतां पुत्रानें पित्यास धरून कैदेंत ठेवणें हें थोडें वाईट तर खरेंच; परंतु त्यास दुसरी तोड नाहीं. आपला नाश करण्याकरितां आपल्या सापत्न मातुश्री व दरबारी लोक टपले आहेत, त्यांनीं महाराजांचें मन कनिष्ठ पुत्रास राज्य देण्याबद्दल वळविलें आहे. जर त्यांचे मनोरथ सफळ झाले तर आपण राज्यास मुकाल इतकेंच नव्हे, तर कदाचित् प्राणासही मुकाल! याकरितां आपले प्राण राखण्यासाठीं आपणांस महाराष्ट्र देशाचें राज्य मिळविलें पाहिजे. राज्य मिळविण्याकरितां महाराजांस प्रतिबंधांत ठेविलें पाहिजे. आज जी संधी आली आहे ती पुनः कधींही येणार नाहीं. ती फुकट दवडणें म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे!

**सं०**— (मनांत) काय करावें? हा किल्लेदार म्हणेल तसतसें माझें मन वळतें. हा बोलतो तें सर्व मला खरें वाटूं लागतें! (मोठ्यानें) गणपतराव, तूं म्हणतोस ती गोष्ट करण्याचें जरी मीं मनांत आणलें, तरी ती सिद्धीस जाणें दुर्घट दिसतें. महाराजांस धरण्याचें काम सुलभ नाहीं!

त्याला शेंपन्नास माणसांचें साह्य पाहिजे, तें आपल्यांजवळ कोठें आहे ? मी रायगडाहून निघालों तेव्हां पेशव्यानें माझ्या तैनातीस म्हणून दोनशें मावळे दिले आहेत, पण त्यांजवळ जर आपण ही गोष्ट बोललों तर ते आपणांस जागच्या जागींच तोडून टाकतील असे ते करडे शिपाई आहेत! तुझे गडकरीही त्याच मासल्याचे लोक आहेत, हें तुला ठाऊकच आहे!

**ग०**— ( आपल्याशीं ) मला हेंच पाहिजे होतें. ( मोठ्यानें ) आपली इच्छा असली म्हणजे पुरे आहे. दोन दिवसांत शिवाजी राजास धरून आपल्यापुढें आणतों. त्यांस धरल्यावर हेच गडकरी आपणांस अनुकूळ होतील. माणसें या कामाला पाहिजेत खरीं, पण त्याची तजवीज मीं योजली आहे. करविरास जाऊन मोंगलांचे कांहीं लोक बरोबर घेतों, आणि शोधास लागतों. प्रयत्न होईल तितका करून पहातों. पुढें फळ येणें हें दैवाधीन आहे !

**सं०**—( भीतीनें ) गणपतराव, ही बातमी मोंगलांस कळून देखील उपयोगी नाहीं. मोंगलांचें आणि महाराजांचें वैर कोणच्या तऱ्हेचें आहे हें तुला माहीतच आहे. जर महाराज त्यांच्या हातांत सांपडले तर ते त्यांचा प्राण घेतल्याशिवाय स्वस्थ राहणार नाहींत. तीर्थरूपांस धरून कैदेंत टाकण्याचें निष्ठुर व नीच कर्म करण्यास मी प्रवृत्त झालोंच आहें, आणखी पित्याच्या प्राणनाशास कारणीभूत होऊन म्यां पुत्रानें कसें जगावें ?

**ग०**—भलतेंच नाहीं तें ! शिवाजी महाराजांचा जीव घेऊन तुम्हांला, मला, किंवा मोंगलांना तरी काय नफा आहे!

आणि चिंता किमपि करूं नये. त्यांच्या जिवास धक्का पोंचेल तर त्याचा जामीन मी!

**सं०**—तूं करशील तें माझ्या मनाप्रमाणेंच असेल यांत संशय नाहीं; परंतु आणखी एकदां विचार कर. ज्याला केवळ हत्तीचें बळ अशा अफझुलखानासही ज्यानें यमलोकास पाठविलें; ज्याचें नांव ऐकून मोठमोठे मोंगल सरदार कांपतात; त्या शिवाची राजाशीं गांठ आहे! भलत्यासलत्याशीं नाहीं! सर्पाच्या शेंपटीवर पाय देण्यापूर्वींच एकदा विचार करावा म्हणजे बरें!

**ग०**—विचार करण्याची ही वेळ नव्हे. सर्पाच्या शेंपटीवर पाय देऊन आम्ही चुकलोंच आहों! आतां सर्पाचे दांत काढून घेऊन त्यास पोतडींत घालून ठेवण्याकरितां आपणांस गारोडी बनलें पाहिजे! आपल्या फितुराबद्दल महाराजांस जरी अजून संशय आला नसला, तरी ती गोष्ट फार वेळ गुप्त राहील असें नाहीं. तो जिवाजीपंत आज गडावर येणार होता, परंतु तो आंत न येईल अशी तजवीज मीं केली आहे. तो म्हातारा केवळ आग्या वेताळ आहे! त्याला आमच्या कृत्यांबद्दल कांहीं बातमी कळली आहे.

**सं०**—बरें, तीच गोष्ट काढलीस म्हणून बोलतों. ती राधा मोठी हट्टी दिसते. ती कोणाशीं बोलत नाहीं. तिनें अन्नपाणी वर्ज्य केलें आहे. ती सारा दिवस रडून रडून दुःखांत घालवते. तिची ही स्थिति पाहून माझा जीव तिळ तिळ तुटतो. असें हें स्वर्गींच्या अप्सरेसारखें सुंदर रूप आणि त्याची ही दशा! तिचें या बागेंत जेव्हां दर्शन झालें, तेव्हांपासून माझ्या मनाला वेड लागल्यासारखें झालें आहे! जेवतांखातां, उठतांबसतां, तिची ती गोजिरवाणी सुंदर मूर्ति

डोळ्यांसमोर दिसत्ये ! ती मला कोणच्या रीतीनें वश होईल या चिंतेंत झोंप येत नाहीं. झोंप लागली तर कधीं मौल्यवान् वस्त्रालंकार धारण करून मजपुढें हसतमुख उभी राहिलेली, कधीं मलिन वस्त्रें धारण करून शोकानें दीन होत्साती मजकडे पाहून माझी निंदा करणारी, कधीं क्रोधानें आपले काळे गरगरीत डोळे लाल करून खालचा ओंठ थरथरत असतां मला शाप देणारी, कधीं रुसलेली, कधीं शृंगारचेष्टा करणारी, कधीं पाठीस लागलों असतां वेगानें पळून अकस्मात् अदृश्य होणारी, अशी ती राधा नानाप्रकारचे आविर्भाव करून स्वप्नामध्यें माझा छळ करित्ये. येथें काय करावें ! मला वाटतें, तिजकडे जाऊन प्रांजलपणानें तिला आपला अभिप्राय कळवावा. ती वश झाली तर बरेंच, नाहीं तर तिला सोडून द्यावी.

ग०—( मनांत ) हा संभ्या जर त्या सुंदरीकडे जाऊन तिला मिठ्या मिठ्या वाता सांगूं लागेल, तर न जाणों कदाचित् ती याला वळेल! स्त्रियांचें चित्त चंचल असतें. तशांत याचें नांव मोठें, हा शिवाजी राजाचा पुत्र, हा स्वरूपानें देखणा, वयानें तरुण व मोठा गुणी आहे. स्त्रियांचें अंतःकरण वेधून घेण्याची कला याच्या अंगीं मूळचीच भरली आहे! पण ती यास वश झाली असतां आमचें बस्तान बिघडेल; याकरितां आतां असें बोलूं-( उघडपणें ) तिला सोडून देण्याबद्दल जें आपण मनांत आणिलें आहे तें फारच वाईट. अहो, असलें मावुक पांखरूं हातांत सांपडलेलें सोडून देण्याची वांछा धरितां तेव्हां आपणांस काय म्हणावें ? या गजगामिनीस चार दिवस पातिव्रत्याचे ढंग माजवावेसे वाटत असतील तर तसेंच चालूं द्या! ती अन्न घेणार नाहीं, बोलणार

नाहीं, ती रडेल, ओरडेल, शिव्या देईल, आर्जवें करील, तिकडे लक्षच देऊं नका! नंतर कांहीं दिवसांनीं तिच्या खोलींत डोकावून तिला हंसत हंसत विचारा कीं, " का राधाबाई, कसें काय?" मग तिनें धांवत येऊन जर तुमच्या गळ्याला मिठी मारली नाहीं तर माझें नांव गणपतरावच नव्हे! अंमळ धीर धरा. असे उतावीळ होऊं नका!

**सं०**—तर मग ठरलेल्या बेताप्रमाणें तूं केव्हां कामास लागणार?

**ग०**—हा मी जेवण आटोपून करविरास जाण्याकरितां आतांच निघतों. आपणांस सिंहासनावर आरूढ झालेले पाहिल्याशिवाय माझ्या जिवाला स्वस्थपणा मिळणार नाहीं!

**सं०**—ठीक आहे. जा तूं; मीहि आतां स्नानास जातों.

[ दोघे जातात. ]

**पहिला अंक समाप्त.**

# अंक दुसरा.

**स्थळः—पन्हाळ्यावरून वडगांवाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एक मोडकें देऊळ.**

[ कुणब्याचा वेष घेतलेले **शिवाजी, हिरोजी फर्जंद** व **प्रल्हाद निराजी** हे दृष्टीस पडतात. ]

शि०—( दुःखाचा सुस्कारा टाकून ) हरहर !! ज्या महाराष्ट्र देशाच्या राज्यरूपी वृक्षाचें बीजारोपण करून त्यास आज चाळीस वर्षे सतत मेहनत घेऊन मीं पाणी घातलें, तो राज्यवृक्ष अकस्मात् तुटून पडण्याचा समय आला आहे ! आणि त्यास तोडणारा तरी कोण—तर प्रत्यक्ष माझा मुलगा ! ज्या मुसलमानांनीं आमच्या धर्माचा छळ केला म्हणून त्यांच्याशीं मीं लहानपणापासून वैर बांधिलें, ज्यांनीं आमच्या डोक्यावर पाय देऊन आम्हांस गुलाम बनविलें म्हणून त्यांच्याशीं झगडण्याकरितां मीं हातांत तरवार धरिली, त्या यवनांशीं हा माझा शहाणा पोर मैत्री करून राज्य मिळवूं पहातो! ( आकाशाकडे पाहून ) शंभु! शंभु! असा कसारे तूं कुलांगार कार्टा निपजलास! माझ्याच उदरीं जन्म पावलास त्या तुला दुसरी कोठें जागा नव्हती ? तू जन्मलास तेव्हांच कां मेला नाहींस ? म्हणजे हे खेळ पाहणें तरी माझ्या नाशीवीं आलें नसतें! तुला एवढा राज्यलोभ होता तरी माझ्या हाडवैऱ्यांचें साह्य घेऊन मला धरण्याचा प्रयत्न तूं करावयाचा नव्हतास! माझें आतां उतारवय होत चाललें; शक्ति क्षीण झाली; दिवसेंदिवस राज्य

कारभाराची दगदग व काळजी माझ्यानें झेंपत नाहींशी झाली आहे. आतां मी फार दिवस वांचत नाहीं हें उघड आहे. याकरितां माझे डोळे मिटत तेथपर्यंत तरी वाट पहावयाची होती! मुला, फार चांगलें कृत्य केलेंस! श्लाघ्य कृत्यानें माझ्या कुळास तूं मोठें भूषण आणिलेंस! आपल्या वृद्ध पित्याला फार सुख दिलेंस! (प्रल्हादपंतास) पंत, हे पुत्र बरें पुत्र! यांच्या प्राप्तिसाठीं दुस्तर तपश्चर्या करावी, यांना जीव का प्राण करून बाळपणापासून वाढवावें, हे म्हातारपणीं सुख देतील म्हणून आशा ठेवावी; आणि शेवटीं या पुत्रांनीं आमचे अशा रीतीनें उपकार फेडावे!!

प्र०—महाराज, त्याबद्दल आतां शोक करून काय उपयोग? सांप्रत आपण ज्या संकटावस्थेंत पडलों आहों तींतून पार पडण्याची तजवीज आधीं शोधून काढून नंतर राजपुत्रास ताळ्यावर आणण्याचा कांहीं तरी उपाय पाहिला पाहिजे.

शि०—(निराशेनें) आतां कसचा उपाय? त्या पोराचें कपाळ काय आहे तें मला कळलें! पोरगा पुनः शुद्धीवर येण्याची आतां मला आशा नाहीं! तो पुढें मागें केव्हां तरी मराठी राज्य बुडवून तुमच्या माना मुसलमानांच्या हातीं देणार हें खचीत. मराठे लोकांचें स्वातंत्र्य स्थापण्यासाठीं आजपर्यंत मीं व्यर्थ श्रम केले! काळ आणि द्रव्य यांची व्यर्थ नासाडी झाली; लक्षावधि माणसांचे फुकट बळी पडले; ज्या शूर पुरुषांनीं स्वधर्माची सेवा करण्याकरितां माझी संगत धरिली, मोंगलांशीं वैर चालविण्यांत आपले जीव खर्ची घातले, त्यांच्या शौर्याचें व एकनिष्ठेचें आतां काय चीज होणार? तो भीमसेनाप्रमाणें बलवान्

बाजीराव फसलकर, तो सिंहासारखा शूर बाजी परभू, तो कर्णाप्रमाणें अद्वितीय योद्धा सूर्यराव कांकडा, हे आतां कोठें आहेत? जे मला आपल्या जीवितापेक्षां अधिक प्रिय मानीत होते, ज्यांनीं मला प्रसन्न करण्यासाठीं ऐहिक सुखाचा त्याग केला, ज्यांनीं असंख्य पराक्रम करून माझें प्रिय केलें, जे माझे बाळपणापासून जिवलग स्नेही, ते येसाजी कंक, प्रतापराव गुजर, व तान्हाजी मालुसरे आज मला सोडून कोणीकडे गेले! त्या बिचाऱ्यांनीं धारातीर्थीं मरण पावून सद्गति मिळविली. मी अभागी मात्र हा दिवस पाहण्यास मागें राहिलों आहे!

**प्र०**—सरकारांनीं असें निराश होऊं नये. मी विनंती करितों ही लक्षांत घेतली पाहिजे. सांप्रत संभाजी महाराजांची वर्तणूक जरी अशा रीतीची आहे, तरी तिजपासून ते परावृत्त न होतील असें नाहीं. त्यांचा स्वभाव थोडा उतावीळ व अविचारी आहे. त्यांतून त्यांचें वय लहान व बुद्धि अपक्क. तेव्हां दुर्जनाच्या संगतीनें त्यांच्या हातून हा अविचार घडला यांत आश्चर्य नाहीं. पुढें त्यांस जसा जसा जगाचा अनुभव येत जाईल, तशी तशी त्यांची वृत्ति सुधारत जाईल.

**हि०**—महाराज, प्रल्हादपंत म्हणतात ही गोष्ट खरी आहे संभाजी महाराजांचा स्वभाव इतका दुष्ट नाहीं. त्या दगलबाज किल्लेदाराचेंच हें कृत्य दिसतें. त्यानेंच संभाजी महाराजांस भर दिली असावी.

**प्र०**—महाराज, आज जी वेळ येऊन गुदरली आहे ती कठीण तर खरीच. परंतु यापेक्षांही महाराजांवर कठीण प्रसंग आलेले आहेत. त्या वेळीं महाराजांनीं धैर्य सो-

डिलें नाहीं; आणि आतां जर महाराज निराश झाले तर लोक काय म्हणतील?

शि०—( विचार करून शांतपणानें ) खरें म्हणतां प्रल्हादपंत, तुमचें भाषण योग्य आहे. शिवाजी मोठमोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं डगमगला नाहीं, आणि या वेळीं मात्र तो घाबरला असें मी दुनियेला कधीं म्हणूं देणार नाहीं! त्यांतून माझा पितृधर्म आहे. पुत्रानें कितीही अन्याय केले तरी ते पोटांत घालून त्याच्या कल्याणासाठीं त्यास बुद्धिवाद सांगणें हें माझें कर्तव्यकर्म आहे. तें मला बजाविलें पाहिजे.

प्र०—आतां मात्र महाराजांनीं यथायोग्य भाषण केलें. महाराज, असा उत्साह धरा. आशा सोडूं नका; आणि प्रयत्नांत शिथिल होऊं नका, म्हणजे सर्व कांहीं ईशकृपेनें आपल्या इच्छेप्रमाणें होईल.

शि०—तर आतां स्वस्थपणानें बसून विचार ठरवूं. हा पन्हाळ्याचा किल्लेदार आम्हांस धरण्याचा मनापासून प्रयत्न करीत आहेसें दिसतें. तेव्हां या प्रसंगीं तुमची काय मसलत आहे ?

हि०--( निराशेनें ) मला तर कांहीं मसलत सुचत नाहीं. बहिर्जीनें जी बातमी आणली आहे ती जर खरी असेल, तर येथून निसटून जाण्याची मोठी पंचाईत दिसते. गणपतरावान कालच माणसें पाठवून जिकडे तिकडे रस्ते रोखिले आहेत. गांवोगावीं पाटीलकुळकर्ण्यांस, आम्ही जाऊं तेथें आम्हांस धरून ठेवण्याबद्दल सूचना गेल्याच आहेत. जो कोणी आम्हांस धरून देईल त्यास मोठें इनाम मिळेल अशी दवंडी फिरविली आहे. कांहीं हुषार

व धूर्त लोक, गोंसावी, बैरागी, फकीर इत्यादि नानाप्रकारचीं सोंगें घेऊन आम्हांस शोधण्याकरितां हिंडत आहेत. स्वतः किल्लेदारही बरोबर शंभर स्वार घेऊन त्याच कामाकरितां आज पहांटेस निघणार होता. इतक्या प्रकारांनीं इतके लोक आम्हांस धरण्याकरितां टपले असून त्यांस कसें चुकवितां येईल ?

शि०--मला वाटतें कीं या वेळीं अकस्मात् पन्हाळगडावर जाऊन गडकऱ्यांस ओळख द्यावी.

प्र०--तसेंही करणें म्हणजे पंचाइतीचेंच काम आहे. गडावरील शिबंदी लोक आपल्या इमानास जागून आजपर्यंत मोंगलांस वश झाले नाहींत हें खरें आहे; तथापि प्रत्यक्ष त्यांचा मुख्य अधिकारी किल्लेदार व संभाजी महाराज हेही उघड मोंगलांबरोबर महाराजांशीं द्वेष करण्यास प्रवृत्त झाले आहेत; तर बिचारे गडकरीही फिरले नसतील असें कशावरून ? त्यापेक्षां मी दुसरा एक उपाय योजिला आहे. तो आपणांस पसंत पडेल तर सांगतों.

शि०--तो कोणचा उपाय ?

प्र०--या प्रांतांतील सर्व गांव मोंगलांनीं घेतले, परंतु वडगांव मात्र त्यांच्या हातास अजून लागलें नाहीं. याचें कारण हा गांव चांगला तटबंदीचा असून शिवाय येथें महाराजांचें एक ठाणेंही आहे. खेरीज या गावांतील लोक चांगले राजभक्त असल्यानें मोंगलांचा लाग त्या ठिकाणीं चालला नाहीं. महाराजांची मर्जी असल्यास पेशवे येतील तोंपर्यंत याच वेषानें आपण वडगावांत राहिल्यास कांहीं हरकत नाहीं.

शि०--शाबास, प्रल्हादपंत, या वेळीं योग्य मसलत

दिलीत. तुह्मी म्हणतां त्याचप्रमाणें करूं. ( समोर पाहून ) हा गडावरून म्हातारा गृहस्थ कोण येत आहे बरें ? यानें आपणास पाहिलें आहे त्या अर्थी आतां याची नजर चुकवून एकीकडे सरावें तरी पंचाईतच. काल याच वेळीं त्या किल्लेदारबुवांचें दर्शन घडलें त्याबद्दल आज आम्हा या लंचाडांत पडलों आहों. आतां हे गृहस्थ आम्हांस भेटले तर काय होईल न कळे ! ( हिरोजीस ) हिरोजी, तूं पुढें हो आणि हा गृहस्थ कुठला कोण वगैरे साधल्यास चाकशी करून येऊन मला कळीव. म्हणजे त्याप्रमाणें वागणूक ठेवण्यास ठीक पडेल.

**हि०**—जी, हुकूम. ( जाऊन व पुनः प्रवेश करून ) महाराज. समोरून मनुष्य येत आहे त्याचें नांव जिवाजीपंत देशपांडे. हा वडगांवचा रहाणार. हा पन्हाळ्यावर कांहीं कामाकरितां गेला होता व आतां तो परत वडगांवास चालला आहे.

**शि०**—जिवाजीपंत ? जिवाजीपंत देशपांडे म्हणतोस तूं ? या गृहस्थाचें नांव माझे कानावरून बहुत वेळां गेल्यासारखें वाटतें.

**प्र०**—या जिवाजीपंताची व आपल्या पेशव्यांची चांगली ओळख आहे. ते वारंवार वर्णन करीत असतात कीं हा गृहस्थ मोठा प्रामाणिक, उदारमनाचा व दयाळू असा आहे. हा ब्राम्हण जमदग्नीसारखा तापट आहे, तरी मनाचा फार कोंवळा आहे. हा मोंगलांचा पक्का शत्रु व आपला मनापासून उत्कर्ष इच्छिणारा असा आहे.

**शि०**—तर मग या प्रसंगीं याची गाठ पडली हीं सुदैवाची गोष्ट. याजबरोबरच आपण वडगांवांत जाऊं म्ह-

णजे झालें. पण प्रल्हादपंत, आतां कोणावर एकदम भरं-वसा टाकण्याची सुद्धां पंचाईत. प्रत्यक्ष पुत्र देखील पित्यावर उलटून त्याचा नाश करण्यास प्रवृत्त होतो. आतां काळ प्रतिकूळ आला आहे. याकरितां आधीं याचें इमान कसास ल.ावलें पाहिजे.

[ नंतर **जिवाजीपंत देशपांडे** प्रवेश करितो. ]

**जि०**—( शिवाजी व त्याचे सोबती यांस पाहून ) राम-राम ! पाटीलबुवा, कोठले रहाणार तुम्ही ?

**शि०**—हामी व्हइम्हतपुरचे र्‍हानार व.

**जि०**—हां, तर तुम्ही लांबून आलां आहां. इकडे कोणी-कडे चाललां ?

**प्र०**—हामी चालल्या कोलापुराला.

**जि०**—( साशंक मुद्रेनें ) कोल्हापुरास ? कोल्हापुरास कशाकरितां बरें ?

**शि०**—बैलं इकत घ्यायाचीं हाईती त्यापांइं तकडे जातुंया.

**जि०**—( हंसून ) हो, कोल्हापुरास हल्लीं जमले आहेत ते सगळेच बैल आहेत. भले गुलाम घीशक्कर खाऊन एकापेक्षां एक तुंद पडून राहिले आहेत. पण तुम्हीं विकत घेऊं गेल्यास तुम्हां गरीब लोकांच्या उपयोगीं पडण्या-सारखे ते बैल नाहींत ! ते नांगराच्या उपयोगीं नाहींत, मोटेच्या उपयोगीं नाहींत, गोणीच्या उपयोगीं नाहींत. खा-यल काळ व भुईला भार ! शिवाय ते कडबा, पेंड, सरकी, वगैरे खाणार बैल नव्हेत. तुमची वर्षाची धान्याची बेगमी ते आठ दिवसांत खाऊन फस्त करितील; आणि जातां येतां तुम्हांस हुंदाड्या मारून दुनियाभर आग लावीत सुटतील!

**शि०**—( न समजल्यासारखें करून ) काय म्हनता व तुमी. तुमी काय म्हनूता त्याचा अरूतबी हामाला उमगना जनु !

**जि०**—अर्थ कसला खुळ्यांनो, अनर्थ झाला आहे त्या कोल्हापुरांत ! तो तेथें रगमस्तखान आला आहे. त्यानें तीन हजार मोंगल जमविले आहेत. तुम्हांला सांगतों, तुम्ही आल्या वाटेनें मागें फिरा, नाहीं तर तुम्ही तेथें गेल्यावर एखादा लांब दाढीचा खां तुमचेजवळ काय पैसाअडका असेल नसेल तो हिसकून घेईल, आणि टाकील तुमच्या सुंता करून !

**शि०**—आमच्या मनामंदी इत बैल कांई सोइवार पडत्याला हनुनशान् आलों ! पन येऊन यरत व्हाया करताय किव ! तर हामासारक्या भल्या मानूसाची तत जान्याची सुइ नाइं म्हनूताया. बरं, हामास्नी इचाराया तुमी कंच्या गावच आन् हाकड कुनिकड जातासा ? हामास्नी वाइस सांगा किनी!

**प्र०**— तुम्हीं हकड कुट किल्ल्यावर गेला व्हता जनु ?

**जि०**—( त्रासानें ) होय, होय मी किल्ल्यावरच गेलों होतों. तुम्हांला मी अमकीकडे गेलों होतों म्हणून कोणीं सांगितलें !

**प्र०**—तकडच्या रस्त्यान तुमी आलायसा त्यापाई इचारलं, तुमचा चेहरा लई तपत झाल्यावानी दिसतूया!

**जि०**—मला आधीं सांगा कीं, शिवाजी महाराजांबद्दल रहिमतपुराकडे काय वातमी आहे ? ते स्वदेशीं कधीं येणार ?

**शि०**—म्हाराजास्नी येउनशान पंधरा दिस झाल. तुमाला अजुन खबर बी लागली न्हाई म्हना ?

**जि०**—( मिशांस पीळ भरीत आवेशानें ) असें काय!

आतां पाहून घेईन या किल्लेदाराला. अधिकाराच्या गर्वानें या लुच्चाला स्वर्ग दोन बोटें उरला आहे! पण महाराजां-कडून त्यास तोफेच्या तोंडीं न देववीन तर माझें नांव जिवाजी-पंत नव्हे!

**शि०**—आपल्याला जिवाजीपंत म्हन्त्यात जनु. आन् ह्यो किल्लदार कोन?

**जि०**—त्याचें नांव गणपतराव. तो महाराजांचा प-न्हाळ्यावरील ठेवणाईत किल्लेदार आहे.

**शि०**—आन् त्याच्या जिवावरच उटलायसा जनु! असं त्येनं केलं तरी काय?

**जि०**—त्यानें काय केलें? त्यानें काय नाहीं केलें असें विचार? या किल्लेदाराची आईबापें हा लहान तीन महिन्यां-चा असतांच मरण पावलीं. तेव्हांपासून पोटच्या पोराप्रमाणें याचें मीं पोषण केलें. हा मोठा झाल्यावर याला शिवाजी म-हाराजांच्या फौजेंत मींच चाकरी देवविली. आतां हा कि-ल्लेदार झाल्यावर पूर्वीचे माझे सर्व उपकार विसरून माझा समूळ नाश करण्यास तयार झाला आहे! यानें माझा सर्वस्वी घात केला. रणमस्तखानाचे मोंगल करवीर प्रां-तांत शिरून लुटालूट करूं लागले, तेव्हां या दुष्टाच्या वि-श्वासावर, मजजवळ काय वित्त होतें नव्हतें तें बरोबर देऊन मीं आपला मुलगा कृष्णराव व त्याची बायको यांस किल्ल्यावर पाठविलें. पुढें संभाजी महाराज पन्हाळ्यावर राहण्यासाठीं आले. हा गणपतराव किती पाजी मनुष्य आहे हे तुम्हांस माहीत नाहीं! यानेंच संभाजीस नानाप्रकारचीं दुर्व्यसनें लाविलीं; यानेंच माझ्या सुनेस संभाजीच्या दृष्टीस पाडून तिजविषयीं त्याच्या मनांत पापबुद्धि उत्पन्न केली; यानें-

च संभाजीकडून माझ्या मुलावर मोगलांकडे फितूर असल्याबद्दल खोटा आरोप ठेऊन त्यास कैदेंत टाकिलें; आणि माझें वित्त लुटून घेऊन नाच, रंग, तमाशे करण्यांत तें उडवून टाकिलें! आतां मी ऐकतों कीं हाच गणपतराव किल्लेदार मोगलांस अनुकूल असून त्यानें महाराजांविरुद्ध बंड करण्यासाठीं संभाजीस भर दिली आहे! काय अधमागा हा! तेव्हां आतां तूंच सांग कीं, हा दुष्ट मनुष्य देहान्त शासनास पात्र आहे कीं नाहीं!

प्र०—आन् जिवाजीपंत दादा, आज तुमी किल्ल्यावर जान्याचं कारन् ?

जि०-मनांत होतें कीं गडावर जाऊन संभाजीची एकदां चांगली कानउघाडणी करावी; आणि गणपतरावाची चारचौघांत अप्रतिष्ठा करून त्यास कांहीं शरम वाटली तर पहावी!

हि०—संभाजी महाराजांची आन् गनूपतरावाची गांठ घेउनशानी आलासा का तुमी ?

जि०—( क्रोधानें जळफळत ) किल्ल्यांत माझा प्रवेश होईल तर ना सगळ्या गोष्टी! मी दरवाजाशीं जातों तों पहारेकऱ्यांस हुकूम कीं मला आंत सोडूं नये म्हणून! मी सारी रात्र उपाशीं आणि थंडीनें कुडकुडत-किल्ल्याबाहेर पडून राहिलों होतों. ( डोळ्यांत अश्रु आणून ) हा तरी शेवटचाच उपाय होता. आतां मी इहलोकच्या सुखास अंतरलों खरा. आतां माझीं मुलें माझ्या दृष्टीस कोठून पडणार! देवा, देवा, म्हातारपणीं मला तांब्याभर पाणी देण्यास सुद्धां कोणी उरलें नाहीं! अरे दुर्दैवा, माझी आंधळ्याची काठी तूं अकस्मात् हिसकून घेतलीस!

शि०—अऱ्यार्‍यार्‍या ! ! ! तुमचा ल्योकबी तुरुंगांत घातलाया आन् सूनबी तुरुंगांत घातलीया ? असं तुमचं वनवास क्येल अं? म्हाराजान वायुस बामनाकडं बघायाचं व्हतं! संबाजी म्हाराजाची अशी वंगाळ बूद जालिया कायव ? आतां म्होरं इचार ! आतां तुमी काय करनार ?

जि०—काय करणार ! सांगतों तुला मी आतां काय करणार तें. शिवाजी महाराज जर कर्नाटकांतून परत आले असले तर रायगडापर्यंत एक खेप घालीन. तेथें महाराजांपुढें जाऊन आडवा पडेन आणि पदर पसरून विनंती करीन की. " महाराज, आजपर्यंत सरकारांशीं मी इमानानें वागलों आहें; आणि वेळोवेळीं मी यथाशक्ति या गादीची सेवा केली आहे. मजवर आपल्या पुत्राकडून व आपल्या कामदारांकडून अशा अशा रीतीनें जुलूम होत आहे. आपण न्याय करण्यांत प्रत्यक्ष धर्मराज आहांत अशी आपली कीर्ति आहे, म्हणून मी पायांशीं आलों आहें. तर या कामांत आपला पुत्र अपराधी आहे तरी आपण मज गरिबावर योग्य न्याय करून कृपा करावी. "

शि०–ह्यं सारं तुमी मनामंदी घ्यतलं । खरं; पन तुमचं ऐकुनशान् पोटच्या पोराचं बी पारपतं शिवाजी म्हाराज करत्यो काय ! पोटच्या पोराची माया त्याला येनारच असं मी म्हनतों.

जि०—( रागानें ) तूं फार शहाणा आहेस. मोठा आला लेक मला सांगणार ! मी " असें म्हनतों आणि तसें म्हनतों ! " मूर्खा, खऱ्या मार्गानें जे चालतील त्यांचें शिवाजी महाराज पालन करितील तसें प्रत्यक्ष पुत्राचेंही करणार नाहींत. दुष्टांचें शासन करण्यांत ते काळाप्रमाणें उग्र आहेत हें तुला माहीत नाहीं ?

शि०—काय राव म्हनुता येड्यावानी ! शिवाजी महाराज म्हन तुमची दाद घेतुया ! ( हिरोजीस ) कायव बहिरोजीबुवा, ह्येनी म्हनुत्यात त्या परमान शिवाजी करल कायव ?

हि०—मला तर बा लइ कोड पडलया !

जि०—( संतापून )काय ? काय म्हणतोस ? बोल ते शब्द पुनः तूं ? शिवाजी महाराजांविषयीं असे शब्द बोलतोस त्या तुझी जिव्हा कशी तुटून पडत नाहीं ! अरे आमचे महाराज ह्मणजे प्रत्यक्ष सांबाचा अवतार !

शि०—( तिरस्कारानें ) सांबाचा अवतार कुट दरोड घालतो ? ठाव हाय जिवाजीपंत, बसा उगीच. शिवाजीचा त्येगार हामाम्होर सांगुबी नगा ! त्यानं माग किरत केलेली ठावी हाय तुमाला ? नर्मदा नदी धरूनशान तुंगभद्रे पावतर झडा दुनिया ओस पाडूनसानी गबर होऊन बसलाया. आन् येड्या बामना, त्याची भरांत कशाला धरतुयास ? जा बग जा घरामंदीं, नाहीं तर तूंबी मरून जाचील. त्याच्या नावान समदी दुनिया खड फोडतिया. नवां जवां जवां त्यो मोंगल आन् शिदी आन् इजापूरवालाबी येउनशान् झडा दुनिया लुटून गेला, तवा त्यो तुमचा परजा पालनारा कुट मुर्का मारून बसला व्हता ? त्याच्या नावान सारी परजा धाई धाई रडतिया आन् म्हन शिवाजी न्याई. आन् चंदरराव मोर्‍या.

जि०—( चवताळून ) थांब तुझी बत्तिशीच हालवून सोडतों ! पाजी मनुष्य कुठला ! आपण कोण, आपली योग्यता काय, आपण कोणाविषयीं बोलत आहों याचें तुला भान नाहीं वाटतें ? शिवाजी महाराजांनीं वेळोवेळीं संकटें प्राप्त झालीं असतां जे जे उपाय केले, ते यथायोग्य प्रसंगास अनुसरूनच होते. पण हें तुला कुणबटाला सांगून काय

उपयोग ! महाराजांची निंदा करण्यासाठीं तुझी जिव्हा जी इतकी वळवळत आहे ती तुझ्या जबड्यांतून उपटूनच काढली पाहिजे ! तूं आमच्या गांवांत जर हे शब्द बोलता-स तर तुझी धिंडच काढली असती! लुच्चा, बेशरम मनुष्य कुठला ! माझ्यासमोर शिवाजी राजाची निंदा करतोस त्या तुला असा खरपूस मार देतों कीं तूं आठ पंधरा दिवस अंथरुणावर कुंथतच पडशील ! ( शिवाजीस मारा-वयास धांवतो. )

**प्र०** —( घाबरून आपल्याशीं ) आतां काय करावें या खुळ्या ब्राम्हणाला ? ( घाई घाईनें पुढें होऊन ) अहो जिवाजीपंत, मागें सरा मागें सरा आधीं तुम्ही कुणापुढें—

**शि०** — ( प्रल्हादपंतास डोळा घालतो )

**प्र०**—( आपल्याशी ) खरंच. मी भलतेंच बोलून जात होतों. पण रागाच्या आवेशांत जिवाजीपंताचें तिकडे लक्ष्य गेलें नाहीं हें बरें झालें. ( उघडपणें ) आहो म्हाउंद्या म्हाउंद्या, वाटच्या वाटसरासंगं तुमी काय लावलया ! कुनाला कसं वाटतं आन् कुनाला कसं वाटतं. तुमचं भांडन कशापाई ? शिवाजी कुट हाय आन् तुमी कुट हायसा. ( जिवाजीपंतास अडवितो. )

**जि०**—( आवेशानें ) हो एकीकडे ! आधीं महाराजांची निंदा करणाऱ्या माकडतोंड्या मुरदाड कुणबटाचीं हाडेन् हाडें मोकळीं करितों ! ( जिवाजीपंत पुढें येत असतां प्रल्हाद निराजी त्यास मिठी घालून एकीकडे ओढतो. )

**शि०** —( हंसून आपल्याशीं ) प्रजेचें मन मजविषयीं कसें आहे हें पाहण्याकरितां मी वेषांतर करून पुष्कळ वेळ गुप्त रूपानें हिंडलों आहें; पण अशी कडक राजभक्ति मात्र

आजपर्यंत माझ्या दृष्टीस पडली नव्हती. ( उघडपणें ) सोडा—सोडा—कन्याखाऊ बामन् येऊं द्या बरं बगूं !

**प्र०**—( आपल्याशीं ) आमचे महाराज सत्वधीर आहेत. ज्याप्रमाणें एखादें अजाण मूल सिंहाची उग्रता न जाणून त्याच्या झिंजोट्या धरून ओढीत असतांही सिंहास मुळींच राग येत नाहीं, तर उलटा तो त्या बालकाकडे प्रसन्न मुद्रेनेंच पहात असतो, त्याप्रमाणें हा भोळसर ब्राम्हण आपल्या प्रभूशीं उद्धट आचरण करीत आहे, तरी महाराजांची प्रसन्नता अधिकच वाढत आहे! ब्राम्हणानें उरावर लात मारिली असतां तें भूषण म्हणून मिरविणाऱ्या श्रीहरीची उपमा आमच्या महाराजांस चांगली शोभेल !

**हि०**—अहो जिवाजीपंत, बामनासनी इतका कुरुद असूं नये. तुमच्या पायास्न हामी गरीब कुनबी. तुमच तिरुत घेऊनशानी हामी न्हानार. आन् आमच्यावर तुमची कुरपा असूं द्याची. आन् तुमी रागावून माराया उटलायसा. हामी काय म्हनूतों त्यें अदुगर ऐकूनशान तरी घ्या !

**जि०**—तुमचें काय म्हणणें असायाचें आहे ?

**प्र०**—हामी इक्तच म्हनूतों, जवां तुमची भेट झाली तवां तुमी बी म्हाराजाचे अबिमानी हायसा, ह्य हामाला ठाव नव्हतं. हामी शिवाजी म्हाराजाची इक्ती नालस्ति केली त्याचं कारन तुमास फोडूनशान् सांगतों. आतां या मुलक्षामंदी म्हाराजाचा अमल नाहीं व्हय. मोगलांचा अमल तर जालाया. या अमदानींत कोनाचं मन कसं असतं काय ठाव हाय! म्हनुनशान् हामी बगा आमच्या

कामाला निगालुया. त्यवां आपल राजा तसा परजा होऊन-शानी आपल कारन करून जान्याचा हामचा ब्योत. त्या परमान तुमच्या मनाच घोरून काडाय पाइ हामी तसं बोललों. पन हामी बी शिवाजी म्हाराजाच्या अन्नान ह्य दिवस पायल. शिवाजीचा अबिमान हामाला नाहीं आन् तुमाला त्येवढा हाय व्हय? पन करनार काय? त्यं सारं ध्यनामंदी घेऊनशान मग बोला म्हन्.

**जि०**—(किंचित् खजिल होऊन ) हो. तेंही खरेंच. पण तुम्हांला खरेंच सांगतों, ही गोष्ट प्रथम माझ्या लक्षांत आली नाहीं. मला असें कळलें नाहीं कीं महाराजांच्या जयदुंदुभीचा नाद ऐकून ज्याच्या बाहूंस स्फुरण चढणार नाहीं, असा मनुष्य महाराष्ट्र देशांत असेल कसा? तेव्हां हे लोक जे बोलतात तें कांहीं कारणानेंच बोलत असतील. तुमची खरी योग्यता न ओळखल्यानें मीं तुमचा मोठा अपमान केला. ( शिवाजीचा हात धरून ) कां पाटील बुवा ?

**शि०**—काय व जिवाजीपंत. घडीमंदी इक्का फेर पाडलायसा काय व. मंगा मला माकाडतोंड्या, मुरदाड कुनत्रटबी बोलला, आन् आतां म्हन पाटील. बर हासा.

**जि०**—अरे झालें तें झालें. मी अविचारी मनुष्य आहें. क्रोधामध्यें मी काय बोलतों याचें मला भान रहात नाहीं. परंतु मागून मात्र फार वाईट वाटतें. तुम्ही महाराजांचे गरीब प्रजाजन असून तुम्हांस मी कांहीं बोललों असेन तर त्याचा राग मानूं नका. तुम्ही शिवाजी महाराजांची निंदा केली हें मीही मनांत ठेवीत नाहीं. माझ्या मनांत तुमच्या-विषयीं कांहीं वाईट राहिलें नाहीं. यास प्रमाण (खिशांतून रुपया काढून ) हा रुपया मी तुम्हांस पानसुपारीकरितां देतों, हा घ्या.

शि०—( हांसून ) ठेवा राव रुपया ठेवा! मानुस जोडलइ का पैसा जोडलई ? तुमीच सांगा ?

जि०—अरे, तुम्ही फार भले मनुष्य दिसतां. चला आतां दोनप्रहर भरत आले. चला आमच्या गांवांत. वाटेनें चालून थकलां शिणलां असाल. याकरितां आजचा दिवस मुक्काम वडगांवांत करून उद्यां घरच्या वाटेला लागा. आतां तुम्ही कोल्हापुरास जाणें म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे!

हि०—न्हाइ न्हाइ हामाला मांग म्यलच पाहिजे. सुगी आलीया अन—

शि०—म्या बी लइ बामनं बगितली. पन् तुमावानी नाहि बगितला भोळासंकर. मला बी वाटतया तुमच्या पायासंग चाकरी करूनशान् न्हाव.

जि०—( प्रल्हादपंतास ) हें काय म्हणतो हा ?

प्र०—अव जिवाजीपंत दादा, ह्यो आमासंग कुट चाकरी बगाया आलाया. तुमावानी भल्या गिरस्तानें ठेवला तर ह्यो न्हानार हाय, कामालाबी लई हुशार. आन बगा सदा आनंदांत. यजमानाची मर्जी खुस करून न्हायाचा. ठयेवा ठयेवा तुमी त्याला चाकरीला.

जि०—सांप्रत माझा काल विपरीत आला आहे. आतां चाकरमाणसें मला कशास पाहिजेत? त्यांस बाळगण्याची मला शक्ति कोठें आहे? मी घरीं गेल्यावर माझ्या आसऱ्यास जे चार लोक आहेत त्यांसच मी निरोप देणार आहें!

शि०—राजमुन्याची इशेश जिकीर न्हाइ बगा. तुमी पायासंग ठेवा मजी झाल. माज काम बगुनशानी सुई सुई परमान पगार द्या म्हन. आता तर आसं का न्हाइं राहिलं ?

जि०—( आश्चर्यानें ) काय? चाकरी करून वेतनाची कुरकूर नाहीं असे म्हणतोस? असला कसला चाकर हा? माझ्या घरीं कांहीं नाहीं तरी दहा गडी आहेत. पण गुलाम सगळे आळशी, आंगचोर, उर्मट आणि भांडखोर असे आहेत. कोणचेंही काम त्यांस सांगा. तें त्यांनीं म्हणजे कधीं व्यवस्थेनें केलें असें घडणेंच नाहीं! तरी पण महिना सरला नाहीं तों आधींच ते पगारासाठीं तगादा सुरू करितात! पण तुझी तऱ्हा पहावी तों अगदींच निराळी! तूं पूर्वजन्मीं कोणी तरी राजा असशील.

शि०—( आपल्याशीं ) मी पूर्वजन्मीं राजा होतों किंवा नव्हतों हें मला माहीत नाहीं, पण या जन्मीं मात्र मी राजा आहें खरा!

जि०—बरें बावा, ज्या अर्थीं तुझी मजवर इतकी भक्ति आहे, त्या अर्थीं तुला नाखुष करणें बाजवी नाहीं. यजमानाची भरभराट चारचौघा आश्रित लोकांच्या दैवानें होत असते असें म्हणतात. तेंव्हा तुझ्या दैवानें तरी माझा ऊर्जित काळ कशावरून येणार नाहीं? चल मजबरोबर. वाटेनें जातां जातां तुला काय काम सांगावयाचें तें ठरवून टाकूं. अरे, पण तुझें नांव काय तें मला आधीं सांग बरें?

शि०—(हात जोडून) मला धर्म्या म्हनत्यात धनीसाब.

जि०—वा:! काय गोड नांव तरी? धर्म्या, धर्माजी, धर्माजीराव कसेंही म्हटलें तरी कानाला गोडच लागतें! तूं जर एकादा राजा असतास तर तुझें नांव कसें 'धर्मराज' असें सुंदर शोभलें असतें!

प्र०—( शिवाजीच्या कानाशीं लागून ) सरकार, आपल्या सुरक्षितपणाबद्दल जी आम्हांस काळजी होती ती

सुदैवानें दूर झाली. आतां आम्हीं काय करावें याबद्दल सेवकांस आज्ञा झाली पाहिजे.

शि०—( प्रल्हादपंतास हळूच ) तुम्ही येथें राहून किंवा मजबरोबर वडगांवास येऊनही तुमचा कांहीं उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. मजविषयीं म्हणाल तर गणपतरावाकडून किंवा करवीरच्या मोंगलांकडून मला उपद्रव होण्याची मुळींच काळजी नाहीं. याकरितां तुम्ही दोघे येथून जा आणि पेशव्यांची गांठ घेऊन त्यांस इकडील वर्तनमान कळवा. समजलास हिरोजी, मी काय म्हणतों तें? मजविषयीं चिंता आतां अगदीं करूं नका.

प्र० व हि०—जसा महाराजांचा हुकूम होईल त्याप्रमाणें करणें हें आमचें काम.

शि—या तर आतां तुम्ही.

प्र०—( जिवाजीपंतास ) तात्या, आमच्या धर्म्यास आतां जपूनशान् वागवा.

हि०—तुमी बी इचारी हायसा खर. ह्यापाई हामी लइ सांगत नाहीं.

जि०—धर्म्याविषयीं आतां काळजी सोडा. या तर आतां. राम राम!

प्र० व हि०—( जिवाजीपंतास ) रामराम! ( शिवाजीस ) धर्माजी बुवा, बामनाच्या मनापरमान व्हावा बर काय! रामराम!

शि०—रामराम!

[ सर्व निघून जातात. ]

दुसरा अंक समाप्त.

## अंक तिसरा.

### स्थळ:—वडगांवांतील जिवाजीपंताचा वाडा.

[ मध्यरात्र झाली असतां शिवाजी येतो. ]

शि०—( आपल्याशीं, लोक म्हणतात कीं या जगामध्यें सुख व समाधान यांचें राजपद हें स्थान होय. परंतु स्वानुभवावरून मी खचित सांगतों कीं, ही त्यांची समजूत खरोखर चुकीची आहे. जसें जसें पर्वतावर उंच चढूं लागावें तसें तसें श्वासोच्छ्वास करण्यास कठीण पडतें, त्याचप्रमाणें वैभवाची गोष्ट आहे. तें जसें जसें मनुष्याला अधिक प्राप्त होईल तशा तशा त्याच्या चिंता अधिक वाढतील व त्या मानानें त्यास सुखप्राप्तीही कमीच होईल. यापेक्षां दिवसभर मेहनत करून आपलें व आपल्या कुटुंबाचें पोषण करणारा गरीब कुणबी ज्यास्त सुखी होय! कारण त्याची तृष्णा थोडी. मीच पहा, आज चार दिवस या जिवाजीपंताकडे घोड्याची चाकरी करून आहें. जर मोंगल माझ्या देशबांधवांस धुळीस मिळवण्याचा यत्न न कारितील, किंवा मजशिवाय जर कोणी दुसरा भाग्यशाली पुरुष माझ्या जन्मभूमीची मुक्तता करण्यास उभा राहील, तर या स्थितींत मरण येई तोंपर्यंत मी खुशाल काळ काढीन ! आतां एवढें खरें आहे कीं, मूर्धाभिषिक्त क्षत्रियानें असलें काम करणें हें त्याच्या प्रतिष्ठेची हानि करणारें आहे. तरी पण यांत मला लघुत्व येत नाहीं. प्रत्यक्ष भगवंतानें ही आपल्या भक्ताचीं घोडीं धुतलीं, मग तेंच काम मला

करण्यास हरकत कोणची ? श्रीकृष्णाची अर्जुनावर जितकी ममता होती तितकीच माझी ममता या जिवाजीपंतावर आहे! याचा स्वभाव किती साधा व सरळ ! याचें मन किती थोर व निर्मळ ! याला क्रोध जरी तत्काळ येतो, तरी त्यापासून दुसऱ्याची हानि व्हावयाची नाहीं. त्याला अभिमान आहे तरी त्या अभिमानापासून कोणाचें मन व्यथित व्हावयाचें नाहीं. ( इकडे तिकडे फिरत ) काय शांत वेळ ही ! प्राणिमात्र निद्रेमध्यें निमग्न असल्यानें जिकडे तिकडे अगदीं सामसूम झालें आहे. या वेळीं चांदणें तरी किती शुभ्र पडलें आहे ! भगवान् चंद्रमा आपल्या अमृतमय किरणांनीं पृथ्वीस दुग्धस्नानच घालीत आहे ! खरेंच, या चांदण्यांत अंमळ हिंडलें फिरलें असतां मनाला आनंद होऊन मोठी हुशारी येते. ( आकाशाकडे पाहून ) इतक्यांत चांदणें अंधक झालें ? होय. चंद्राच्या आड मेघसमुदाय आल्यानें त्याचा उजेड अस्पष्ट झाला. हे चंद्रा, तूं एवढा आकाशाचा सार्वभौम राजा असूनही तुला कधीं कधीं हे मलिन मेघ आच्छादून टाकतात; मग मीं संकटकाळीं कुरकूर कां करावी ? ( बंदुकीचे बार ऐकून व चपापून ) काय ? एवढ्या रात्रीं बंदुकीचे बार ? हें काय बरें असेल ? काय, गांवांत कोणाच्या घरावर दरोडा तर नाहीं ना आला ? छे ! पण एवढ्या तटबंदीच्या गांवावर दरोडा कोठून येणार ? ( आणखी बार होतात, शिंगें वाजतात व मोठा गलबला होतो; तो ऐकून ) आणखी आवाज ? हां, समजलों. हा दरोडा तर खराच. पण तो द्रव्याकरितां नव्हे. तर हा माझ्या जीवितावर दरोडा आहे ! मला धरण्यासाठीं मोंगल नमून आले आहेत,

आणि त्यांस पाहून हे वेशीवर पहारेकरी घाबरून बार काढीत सुटले आहेत असें वाटतें. ( आवेशानें व क्रोधानें ) ठीक आहे. मला धरण्यासाठीं मोंगल येतात तर खुशाल येवोत ! त्यांचीं पुरीं शंभर वर्षें जर भरलीं असतील तर त्यांस नको कोण म्हणेल ? हे माते धरणी, आज तुला भारभूत झालेल्या या यवनांचीं सहस्रावधी शिरें तुला वाहतों! त्यांचा स्वीकार करून तूं मजवर संतुष्ट हो. ( मिशांवर ताव देऊन ) मोंगलांस इतकें पक्कें माहीत असावें कीं, शिवाजी कोणच्याही स्थितींत असला तरी जेथें जेथें त्याची व मोंगलांची गांठ पडेल, तेथून तेथून त्यांनीं रडतच निघून गेलें पाहिजे ! वहावा ! आमचे यजमान जिवाजीपंतही उठून डोळे चोळीत इकडेच येत आहेत!

---

## प्रवेश दुसरा.

[ **जिवाजीपंत** प्रवेश करितो व त्यामागून दुसरे कांहीं लोक येतात ]

**जि०**—कायरे ? हा गांवांत गलबला कसला ? आज कोणाकडे गोंधळ आहे वाटतें.

**एकजण**—जिवाजीपंत, गोंधळ गांवांत नाहीं. गांवाबाहेर आहे.

**जि०**—म्हणजे ! याचा काय अर्थ ?

**दुसरा**—अर्थ कसला ! बंदुकीचे आवाज तुम्हीं ऐकिले नाहींत ?

**जि०**—( गलबला ऐकून ) अरे हें आहे तरी काय!

**तिसरा**—करवीराहून मोंगल आले आहेत.

**जि०**—मोंगल आले ! अरे, मग येथें शुंभासारखे

उगीच काय उभे राहिलां? त्या पलीकडच्या सोप्यांत निज-लेल्या मंडळीला उठवा. अहो शामराव, गोविंदपंत, अरे उठा उठा! कोणी तरी वेशीवरच्या शिपायांस जाऊन सांगा कीं "भिऊं नका, आम्ही येऊं तेथपर्यंत दम धरा." शामराव, तुम्ही जाऊन आमच्या तबेल्यावरच्या माडीवर गडी निजले आहेत त्यांना उठवा. त्या सगळ्या गुलामांना बाहेर काढा! कोणाजवळ हत्यारपात्यार नसेल तर पहा. परवां मीं त्या फिरंगाांतून आलेल्या दहा बंदुकी विकत घेतल्या आहेत त्या खालीं काढा. गोविंदपंत, तुम्ही आधीं ठाणेदारास बोलावून आणा.

**ठाणे०**—( प्रवेश करून ) मला बोलावणें नको, हा मी आलों!

**जि०**—शाबास ! वेळेवर आलेत तुम्ही. आज ठाण्यांत किती शिपाई हजर आहेत ? बोला.

**ठाणे०**—पन्नास असामी आहेत.

**जि०**—ठीक आहे. ते आणि आमचे पंधरा सोळा गडी यांस बरोबर घेऊन तुम्ही वेशीवर चला. तेथील पहारेकऱ्यांस हुशारी द्या. मोंगलांस पुढें येऊं देऊं नका.

**ठाणे०**—जिवाजीपंत, मोंगलांची जमात मोठी दिसते. ते निदान एक हजारावर लोक आहेत. त्यांपुढें आमचा निभाव लागण्याची पंचाईत दिसते.

**जि०**—आणि ते दहा हजार असले म्हणून काय झालें! चला, त्यांची धूळधाण उडवून देऊं ! मीही आतां गांवांत जातों. प्रत्येक घरांत शिरून जितके म्हणून पुरुष सांपडतील तितक्यांना बाहेर काढून मी त्यांस बरोबर घेऊन येतों. आज मोंगलांची खात्री झाली पाहिजे कीं, शिवाजी

महाराजांची प्रजा गरीब व गांवढळ असली म्हणून ती उगीच कोणाचा त्रास सोसून घेणार नाहीं ! शिवाजी महाराजांच्या राज्यांतील लोकांस नांगर व तरवार हीं दोन्हीं सारख्याच कुशलतेनें हातांत धरितां येतात. ( डोळ्यांस पाणी आणून ) जर मा॒झा शूर पुत्र आज येथें असता, तर मला म्हाताऱ्याला ही यातायात कशाला पाहिजे होती ? असो, ईश्वरी इच्छा ! ( मंडळीस ) चला आतां, विलंब करण्याची ही वेळ नव्हे. ( जिवाजीपंत व शिवाजी यांशिवाय सर्व जातात. )

जि०—( शिवाजीस पाहून ) कोणरे तो ? धर्म्या ?

शि०—जी, व्हय. मीच त्यो.

जि०—मग तूं येथेंरे कां उभा !

शि०—आपुन लडाइ कराया निगालायसा. मी बी तुमच्या मागून येव म्हनतो.

जि०—हा खुळ्या! तेथें काय घोड्याला खरारा करावयाचा आहे ? तुला बंदूक कशी धरावी हें तरी माहीत आहे ?

शि०—न्हाइ म्हाराज.

जि०—( हंसून ) मग मजबरोबर तूं येऊन उपयोग काय ? या मोंगलाबरोबर लढण्याची योग्यता येण्यास जन्माचे जन्म शिपाईगिरींत घालवावे लागतात. तें काम आम्हींच करावें. तूं जन्मांत कधीं लढाई पाहिलीही नसशील. तूं आपला बैस घरीं. घर राखण्याला कोणी तरी पाहिजेच.

शि०—न्हाइं न्हाइं, त्ये व्हयाचं नाहीं. मी तुमच्या पायांशींच व्हानार. जत तुमी तत मी. ह्योच समदा इचार.

जि०—( आपल्याशी ) काय इमानी मनुष्य आहे हा ! ( मोठ्यानें ) तुझी जर इतकी उत्कंठा असेल तर चल मज-

बरोबर ! उगीच कुठें हातापायाला जखम लागून जन्माचा लंगडा किंवा थोंटा होऊन बसशील म्हणून म्हणत होतों. बरें आतां घरीं दुसरा गडी ठेवून तुला बरोबर नेतों.

शि०--माजं बी त्येंच म्हननं. चला तर.

[ शिवाजी व जिवाजीपंत जातात ]

---

## प्रवेश तिसरा.

### ( स्थळः—वडगावांतील एक रस्ता. )

[ शामराव व गोविंदपंत समोरासमोर येतात. ]

शा०--कां गोविंदपंत, आज तुम्ही होतां कोणीकडे ? वेशीवर तर दिसलां नाहीं!

गो०--आज आमची वेशीवर योजनाच झाली नव्हती.

शा०—कां ? असें कां बरें ! तुम्ही जिवाजीपंताच्या तावडींत सांपडलां नाहीं वाटतें ?

गो०--अहो, तो म्हातारा मला कुठला सोडायाला ? तो म्हणाला, " चला वेशीबाहेर मोंगल आहेत त्यांचा चांगला समाचार घेऊं. " पण मोंगलांचें नांव ऐकिल्याबरोबर माझें अंग भीतीनें थरथर कांपूं लागलें !

शा०—( हंसून ) छे हो! तुमच्या अंगांत लढाईचें स्फुरण भरलें असें म्हणा! बरें मग तुमचा हा युद्धोत्साह पाहून जिवाजीपंत काय म्हणाला ?

गो०— तो ह्मणाला " कांहो गोविंदपंत, असे कांपता कां ? तुम्हांला आलीकडे हिंवताप येत असतो वाटतें. " मी चटकर म्हणालों, " होय होय. मला हिंव येत

असतें. काय करावें ? " मग तो म्हणाला, " गोविंदपंत, आज तुमचा तर मग वेशीवर उपयोग नाहीं. तुम्ही त्या पलीकडल्या बुरजावर चढा, आणि इतकेंच करा कीं मोंगल आपलें ठिकाण सोडून गुप्त रूपानें जर कोठें दुसरीकड तटावर चढण्याचा एलगार करितील तर आम्हांस कळवा." मी हर्षानें नाचत नाचतच आपल्या कामावर गेलों. तेथून तुमच्या आरोळ्या व बंदुकीचे बार ऐकून माझ्या तर कानटाक्या बसल्या ! त्या वेळीं मला वाटलें कीं, लोक "युद्धस्य कथा रम्या " असें म्हणत असतात तें कांहीं खोटें नाहीं ! असो, मग लढाई संपून मोंगल पळून गेल्यावर मी खालीं उतरलों.

**शा०**—मग तर तुम्ही मोठे दुर्दैवी म्हणावयाचे! कारण कीं आमच्या गांवकऱ्यांनीं आज जी कांहीं मर्दुमकी केली तीं अवर्णनीय होती ! त्या दुष्ट यवनांच्या जुलमापासून आपल्या घरादारांचें व बायकापोरांचें रक्षण करण्याकरितां आमच्या मंडळीचे अचाट प्रयत्न पाहून एकादे भागूबाईसही स्फुरण चढलें असतें!

**गो०**—शाबास ! एकूण आमचे गांवकरी बहादर तर खरेच; कारण कीं मोंगल म्हणजे आज काल कांहीं सामान्य योद्धे नव्हत. त्यांच्यापुढें विजापुरवाल्यांच्या फौजांचा दम निघत नाहीं, व ते शिवाजी महाराजांच्या मावळे लोकांसमोरही युद्ध करण्यास कधीं मागें घेत नाहींत; तर असे मोंगल आम्हांपेक्षां पांचपट संख्येनें अधिक असूनही आम्हीं त्यांस दाद दिली नाहीं हें केवढें भूषण म्हणावयाचें !

शा०—पण आज एक महापराक्रमी पुरुष जर आमच्या साह्यास न येता तर आमचे इतके ही प्रयत्न व्यर्थ झाले असते!

गो०—असा पुरुष कोण बरें ?

शा०—तो कोण हें तुम्हांस सांगितल्यास खरें सुद्धां वाटणार नाहीं! आपल्या जिवाजीपंतांनीं तो नवीन ठेविलेला गडी धर्म्या, तो तुम्हांस माहीत असेलच.

गो०—मग तुम्ही त्याचें नांव घेणार वाटतें ?

शा०—अहो, तो धर्म्या म्हणजे एक झांकलें माणीक आहे बरें! दिसतांना पहा कसा भोळसर कुणबी दिसतो, पण त्याची कृति पाहिली तर केवळ अलौकिक आहे! ( हळू स्वरानें ) गोविंदपंत, मला वाटतें, हा देशपांड्यांनीं ठेविलेला गडी कोणी तरी मोठा मनुष्य असावा. याच्या दिसण्यावर तुम्ही जाऊं नका. तुम्हांला मी खचित सांगतों कीं हा हाडाचा खरा शिपाई आहे. याला युद्धकलेची पूर्ण माहिती असून यानें जन्मभर हाताखालीं मोठाल्या फौजा बाळगिल्या असाव्यात असें दिसतें.

गो०—छे, भलतेंच नाहीं तें ! शामराव, असला मनुष्य जिवाजीपंताच्या घरीं घोडे घांसून पोट भरण्यास कशाला राहील ?

शा०—अहो, शत्रु कोणास नाहींत ? दुर्योधनादिकांच्या छलानें पांडवांसारखे राजपुत्रही अज्ञातवासांत नानाप्रकारचीं हलकीं कामें करीत होते. त्याचप्रमाणें या शूर गृहस्थावरही कांहीं संकट येऊन यानें हा वेष धारण केला असावा, असा माझा तर तर्क वाहतो.

गो०—पण तुम्ही जी इतकी त्याची स्तुति करितां, असें त्यानें आज काय बहादुरीचें काम केलें ?

शा०—सांगतों ऐका. जिवाजीपंतांच्या हुकुमाप्रमाणें जेव्हां मी वेशीवर गेलों, तेव्हां आमचे सरासरी दीडशें लोक जमले होते. आम्हांस वाटलें होतें कीं, मोंगलांस याच ठिकाणीं आटपून धरिलें म्हणजे झालें. पण शत्रूंची हिकमत मोठी ! ते वेशीसमोर अर्ध्या हांकेवर जमावानें येऊन थांबले. तेथें ते नौबती वाजवून व शिंगें फुंकून मोठा गलबला करूं लागले. शत्रूंचा वेशीवर नीट चालून नेण्याचा रोंख पाहून आम्हींही त्यांजवर आपल्या बंदुका भराभर सोडूं लागलों. पण इतक्यांत शत्रु कांहीं अंतरावर तटास शिड्या लावून वर चढूं लागले, ते प्रथम आमच्या दृष्टीस पडले नाहींत. मग पाहतों तों शेंदोनशें गांवांत शिरलेले ! त्यांस पाहून आम्ही घाबरलों. ठाणेदार तर निराशेनें हातावर कपाळ टेंकून उगीच बसला. पण धर्माजीनें धीर सोडिला नाहीं. तो म्हणाला, " चला ! अजूनही चला ! ! प्रयत्न केला तर अजूनही आपला बचाव होईल. धीर सोडूं नका." नंतर सवाशें असामींची टोळी करून आम्हीं त्यांत धर्माजीसच मुख्य केलें. मग झाडाच्या सावलींतून छपत छपत आम्ही शत्रूंच्या अगदीं समोर गेलों; व 'हरहर' करून त्यांजवर एकदम झडप घातली. तेव्हां जी चकमक उडाली तिचें वर्णन काय करूं ? मोंगल असावध असतां जरी आम्हीं छापा घातला होता, तरी ते मोठ्या शौर्यानें लढले. आम्हांही कांहीं कमी मर्दुमकी केली असें नाहीं. युद्धकलेमध्यें वाकबगार असणाऱ्या मोंगलांबरोबर आमचा टिकाव या हातघाईच्या प्रसंगीं लागला नसता; परंतु धर्माजीचा अचाट पराक्रम पाहून आम्हांसही स्फुरण

आलें. त्या वेळीं कोणी जिवाची पर्वा केली असें नाहीं. भाले, बर्च्या, कटयारी, यांच्या जखमा लागून कित्येकांच्या आंगांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. सोंटयाच्या तडाक्यांनीं कित्येकांचीं डोकीं फुटलीं. चांदण्यामध्यें विजेप्रमाणें तरवारी चमकूं लागल्या याप्रमाणें अर्धी घटका होऊन शेवटीं शत्रु मागें फिरून शिडया लावलेल्या ठिकाणाकडे पळून जाऊं लागले. परंतु खालीं ज्विंत व सुरक्षित असे थोडकेच जाऊन पोंचले असतील ! कारण कीं आम्हीं हर्षानें गदारोळ करीत त्यांच्या पाठीस लागून लांडगेतोड केली. आम्हांपैकीं तीस असामी ठार होऊन पडले आहेत. शिवाय पुष्कळांस जबर जखमा लागल्या आहेत.

गो०—अरेरे ! ही मोठी वाईट गोष्ट झाली. पण त्या मुसंड्यांस या गांवच्या लोकांच्या अंगांत पाणी कितपत आहे हें चांगलेंच कळलें !

शा०—पण कळून उपयोग काय झाला ? सर्पास काठी मारली असतां तो भय तर पावत नाहींच, पण अधिक चवताळून आंगावर उडी घालूं पाहतो, त्याप्रमाणें मोंगलांची स्थिति झाली. त्यांनीं रागानें एक भयंकर आरोळी ठोकली; आणि मनगटें चावीत ' दिन् दिन् ' करीत ते मोंगल वेशीकडे येऊं लागले. इतक्यांत आमच्या दाजूसही जिवाजीपंत आणि दुसरी पुष्कळ मंडळी येऊन पोंचली. मग आम्हीं शत्रूंवर गोळ्यांचा, तिरांचा, व गोफणींच्या दगडांचा वर्षाव केला. त्या काळीं धर्माजी स्वतः बरकंदाजी करीत होता. त्याची निशाण मारण्याची खुबी इतकी उत्कृष्ट आहे कीं, त्याची गोळी म्हणून फुकट जावयाचीच नाहीं! त्याला नुसते सात गडी बंदुका भरून देण्याकरितां उभे

होते. आमचे जिवाजीपंतही बार काढीत होते. त्यांची कर्तबगारी तुम्हांस माहीतच आहे.

गो०—हो हो ! ते ज्या दिशेला बंदूक धरतील, त्या दिशेस त्यांची गोळी हटकून जावयाचीच !

शा०—त्यांची त्या वेळीं कोण घांदल! धर्माजीरावांच्या बंदुकांतून सुटलेल्या गोळ्यांनीं मोंगल पटापट मरूं लागले. तेव्हां वेशीपासून दोनशें हातांवर कोणी फिरकेनासें झालें. हें पाहून आमच्या यजमानांस असें वाटलें कीं, हा आपलाच प्रताप होय. ते वारंवार हंसून मोठ्यानें ओरडत कीं, "या, या! मुसंड्यानों, घ्या अल्लाचें नांव; आणि मरा ! तुम्हांपैकीं बातमी सांगण्याकरितां एकासही जिवंतपणें परत जाऊं देत नाहीं! मग तो पन्हाळगडावरील किल्लेदार गणपतराव—

गो०—काय ? तोही शत्रूस फितूर झाला आहे? काय-हो नीचपण हें ! कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ म्हण-तात तो हाच !

शा०—तो तर करवीरच्या मोंगल सरदाराचा गळ्यांतील ताईत बनून गेला आहे. कालच्या सर्व अनर्थास मूळ तोच. मोंगल धास्त खाऊन निराश झाले तेव्हां तो पुढें झाला, आणि मोंगलांस ओरडून म्हणाला, "दोस्तहो, तुम्ही अलमगीर बादशाहाचे शूर शिपाई आहां. तुम्ही असे भागूबाईसारखे या गांवढल लोकांसमोर पळून जाऊं लागलां तर जग तुम्हांला काय म्हणेल ! उद्यां बायका-पोरेंही तुमच्या पगड्या हिसकावून घेतील ! यापेक्षां मरण आल्यास बेहत्तर! चला, कुऱ्हाडीनें दरवाजा फोडून आपण आंत शिरूं व लुटालूट करून या गांवास आग लावूं; आणि आंत सांपडतील त्या लोकांची कत्तल करूं." असें बोलू-

न तो स्वतः हातांत कुऱ्हाड घेऊन पुढें सरला. त्या वेळीं प्रलयकाळीं खवळलेल्या समुद्राच्या लाटेप्रमाणें सर्व शत्रु 'दिन् दिन्' ओरडून पुढें निघाले. आम्हीं त्यांस करवला तितका प्रतिबंध केला; तरी ते आम्हांस आवरेनात. शेवटीं ते वेशीवर येऊन थडकले. दरवाज्यावर कुऱ्हाडीचे घाव धाड धाड पडूं लागले. जिकडे जिकडे हाहाकार उडाला! सर्वजण भयामुळें स्तब्ध उभे राहिले.

**गो०**—( भय पावून उत्सुकतेनें ) मग काय झालें ?

**शा०**—इतक्यांत धर्माजीनें एक अत्यद्भुत कर्म केलें, तेणेंकरून कालचा प्रसंग बचावला. शत्रु आतां दरवाजा खचित फोडतात असें पाहून त्यानें हातांतील बंदूक खालीं ठेविली. नंतर त्यानें तरवार मेणांतून काढून दरवाज्यांत उडी टाकिली. दरवाज्याचे सांखळदंड सोडवून त्यानें अकस्मात् दरवाजा मोकळा केला; आणि मशालीच्या उजेडांत तरवार पडताळून तो मोंगलांस आवेशानें म्हणाला, "या, या पुढें. दुष्ट हो, एक या, दहा या, पन्नासजण या !! तुम्हां सर्वांचा काळ मी येथें तुमच्या छातीवर पाय देऊन उभा आहें." त्या वेळीं धर्माजीरावाचें जें उग्र स्वरूप दिसत होतें, त्याचें वर्णन कोण करील ? कौरवांच्या सभेंत तेजःपुंज सुदर्शन हातांत घेऊन द्रौपदीच्या संरक्षणार्थ उभा राहिलेल्या श्रीकृष्णास पाहून जशी दुर्योधनादिकांची गाळण उडाली, तशी मोंगलांची स्थिति झाली. सर्व शत्रु भयानें व आश्चर्यानें स्तब्ध होऊन क्षणभर जागच्या जागींच उभे राहिले. सर्वांपुढें किल्लेदार होता तो भीतीनें अगदीं गांगरून पाठ फिरवून माघारा चालला. त्याबरोबर सर्व मोंगल मागें फिरले.

**गो०**—वाहवा ! शाबास ! शाबास ! ! धर्माजीराव, तुझा पराक्रम लोकोत्तर होय ! आमच्या बायकांची अब्रू आज तूं बचावलीस ! आम्हांस व आमच्या पोरांबाळांस तूं दुसरा जन्म दिलास ! आज हजारों माणसें तुला दुवा देत राहतील ! तुझें देव सर्वदा कल्याण करो !

**शा०**—सर्व प्रकारें ईश्वराची आपल्यावर कृपादृष्टि आहे इतकीच गोष्ट खरी. कारण कीं, आज त्याच्या दयेनें जिवाजीपंतांचा प्राण बचावला. नाहीं तर ते मृत्यूच्या दाढेंत खचित पडले असते !

**गो०**—तें कसें काय ? मला तरी वाटलेंच होतें कीं, हा तापट म्हातारा कोठें तरी या दंग्यांत कांहीं अविचार करून प्राणास मुकेल.

**शा०**—दरवाजा उघडल्याबरोबर सर्व मोंगल आमच्या दृष्टीस पडले. त्या सर्वांचा पुढारी गणपतराव होता हें तुम्हांला मीं सांगितलेंच आहे. त्यास पाहिल्याबरोबर जिवाजीपंत खवळले. त्यांचा राग कसा अनावर आहे हें तुम्हांला माहीतच आहे. ते बुजावलेल्या बैलाप्रमाणें बिथरून एकटेच मोंगलांवर चालले. धर्माजी नको नको म्हणून त्यांस ओढीत असतां ते वेगानें वेशीबाहेर पडले. मग गणपतराव परत जात होता त्यास गांठून ते क्रोधानें दांत ओंठ खात म्हणाले, " रे अधमा, रे कृष्णसर्पा, ज्यानें तुला दूध पाजून वाढविलें त्यावरच तूं उठलास. रे राक्षसा, आजपर्यंत मजवर खोटा लोभ दाखवून शेवटीं तू माझ्या पोरांच्या मुंड्या मुरगळण्यास चुकला नाहींस ! उभा रहा. चोरा, हरामखोरा, आतां तूं कोठें पळशील ? थांब. तुला या वेशीसमोरील वडाच्या झाडास टांगून फांशीं देतों ! " इतकें बोलून जिवा-

जीपंतानें जाऊन गणपतरावाचा हात धरिला. तेव्हां तो किल्लेदार सर्पाप्रमाणें त्वेषानें मागें फिरला; आणि जवळ उभ्या असलेल्या एका शिपायाची बंदूक घेऊन त्यानें जिवाजीपंताच्या पायावर बंदुकीच्या दस्त्याचा असा एक तडाका दिला कीं, तेणेंकरून तो म्हातारा " अरे गण्या, माझा पाय मोडला कीरे ? " असें म्हणत जमिनीवर कोसळला ! शत्रूंनीं त्याचे तुकडे तुकडे केले असते, परंतु आम्हीं धर्माजीसह त्यास सोडविण्याकरितां धांवलों. इतक्यांत पश्चिमेकडे धुळीचे लोटावर लोट उठूं लागले, चांदण्यांत भाले चमकूं लागले, हजारों घोड्यांच्या खाड खाड खाड टांपा ऐकूं येऊं लागल्या; व एकदांच ' हरहर महादेव ' अशी भयंकर गर्जना झाली ! ती ऐकून मोंगल एकसारखे पळत सुटले.

**गो०**—ही नवीन आलेली स्वारांची फौज कोणाची ?

**शा०**—ती मोरोपंत पेशव्यांची फौज. मोंगलांचा दंगा मोडण्याकरितां महाराजांनीं त्यांस इकडे पाठविलें अशी बातमी पसरली आहे.

**गो०**—होय, तसेंच असेल खरें. ( पुढें पाहून ) हे पहा आपले यजमान जिवाजीपंत पुष्कळ मंडळीसहवर्तमान लंगडत लंगडत घराकडे चालले आहेत. चला, त्यांच्या पायास किनपत दुखापत झाली आहे हें पाहिलें पाहिजे.

जातात.

## प्रवेश चवथा.

[ जिवाजीपंत व दुसरे कांहीं लोक प्रवेश करितात. ]

**जि०**—शाबास वडगांवकरांची. त्यांनीं आज मोंगलांची खोडच मोडून टाकिली. मोठे आले लेक "पीरखां" "शीरखां' 'हुसेनखां' 'दगडखां' 'मातीखां!' पण त्यांना जिवाजीपंताशीं गांठ आहे हें कोठें माहीत होतें?

**एकजण**—आपणांस फार मेहनत पडली. आपण आज मोठा पराक्रम केला.

**जि०**—अं, तसें कांहीं नाहीं. मीं सरासरी शेंपन्नास मोंगल जमिनीवर पाडले, आणि शेवटीं तर त्यांस केवळ आपल्या गर्जनेनेंच पळावयास लावलें ही गोष्ट खरी आहे. पण यांत कांहीं मीं मोठा पराक्रम केला असें होत नाहीं. पण (पायाकडे बोट दाखवून) कळा फार लागल्या आहेत बुवा!

**दुसरा**—आज धर्माजीसारखा शूर पुरुष येथें होता म्हणूनच वेळ निभावली!

**तिसरा**—रात्रीं त्यानें जो पराक्रम केला तो ऐकून मोठमोठाले शूर पुरुष सुद्धां तोंडांत बोटें घालतील!

**चवथा**—याकरितां आपण त्याचा चांगला सन्मान केला पाहिजे.

**जि०**—काय रे बडबडतां तुम्ही? धर्म्यानें काल फार चांगली लढाई केली हें मी नाहीं म्हणतों काय? तो तसें करणारच! त्यानें पराक्रम केलेच पाहिजेत! कारण तो कोणाचा चाकर आहे? माझा! पण त्याबद्दल सन्मान मला देणें योग्य आहे. माझा पराक्रम पाहून माझ्या चाकरांसही आवेश

चढतो; आणि ते अद्भुत कृत्यें करतात ह्यांत काय आश्चर्य? खरें कीं नाहीं ? धर्म्या, तूंच सांग या लोकांना.

**शि०**—( हात जोडून ) धनीसाबांच्या पुन्यपरतापानें समद हुयाचं; आन् म्या गरीबानं काय करायाचं हाय ?

**जि०**—खरें बोललास धर्माजी. बरें, रात्रीं ज्यांना जखमा लागल्या आहेत त्यांना मीं आपल्या घरीं पाठविलें आहे; तेथें जाऊन त्यांच्या जखमा बांधण्याची तजवीज काय झाली आहे ती बघ.

**शि०**—जी. ( निघून जातो. )

**जि०**—अरे, हा पुनः गलबला कसला उठलारे ? जाहो शामराव, काय प्रकार आहे तो पहा.

**शा०**—( जाऊन व प्रवेश करून ) जिवाजीपंत, मोंगलांचा पाठलाग तीन कोसपर्यंत करून आतां पेशव्यांचे स्वार परतले आहेत. खुद्द मोरोपंत पेशवेही आपल्या भेटीकरितां निघाले आहेत.

**जि०**—बर आहे. येऊं दे त्यांना इकडे. त्यांच्या अधिकारास व योग्यतेस साजेल असें आगतस्वागत करण्याचें सामर्थ्य देवानें मला जरी दिलें नाहीं, तरी त्याबद्दल त्यांस कांहीं वाटावयाचें नाहीं. कारण कीं, आम्ही व ते लहानपणचे खेळगडी आहों.

[ **मोरोपंत** पेशवे हे कांहीं सरदार व मानकरी लोकांसह प्रवेश करितात. ]

**मो०**—नमस्कार! जिवाजीपंत, क्षेम आहे ना ?

**जि०**-नमस्कार ! (मोरोपंतांस आलिंगन देऊन) तुमच्या दयेनें पूर्ण क्षेम आहे. कारण, आज तुम्ही जर न येतां तर माझी गच्छंतीच होण्याची वेळ आली होती ! पण

भेटीचा योगायोग पहा कसा तो, कीं तुमची आमची गांठ त्याच वेळीं पडून माझ्या जिवाचें रक्षण तुम्हीं करावें !

**मो०**—होय. मी वेळेवर येऊन पोंचलों म्हणून बरें, नाहीं तर मोठा अनर्थ होत होता. अहो, तुमच्यासारखे लोक म्हणजे महाराजांच्या राज्याचे आधारस्तंभ. मग त्यांचाच जर नाश झाला तर यापेक्षां दुर्दैवाची गोष्ट ती कोणची ? आज तुम्हीं वडगांवचें ठाणें राखण्याबद्दल फार प्रयत्न केले त्याबद्दल सरकारांतून तुमचा मोठा सन्मान होईल.

**जि०**—मला दुसरा कांहीं सन्मान नको. महाराजांनीं माझी आपल्या विश्वासू सेवकांत गणना केली म्हणजे मला सर्व पावलें.

**मो०**—शिवाय कालच्या लढाईंत पुष्कळ लोक जखमी झाले आहेत ह्मणून ऐकिलें. त्यांस व ज्यांनीं काल मर्दुमकी केली असेल त्यांस सरकारांतून पोषाक व इनामें देण्यांत येतील. काल जे कोणी कामास आले असतील त्यांच्या मुलांमाणसांच्या संरक्षणाची सोय आमचे दयावंत प्रभू अवश्य करतील यांत संशय नाहीं.

**जि०**—तें सर्व यथायोग्य होईल. बरें, आतां रस्त्यांत उभे राहून किती वेळ बोलणार ? चला आमच्या घराकडे. मोरोपंत,-तुह्मांला एकच सांगतों कीं, तुमचा आमचा ऋणानुबंध बहुत दिवसांचा; आज गांठही बहुत वर्षांनीं पडल आहे; याकरितां तुम्हांस या वडगांवांत चार दिवस राहू । घेतल्याशिवाय मी सोडणार नाहीं.

**मो०**—छेः, जिवाजीपंत, सध्यां येथें राहण्यास मला मुळींच सवड नाहीं. मोंगल जेथपर्यंत करवीरांत आहेत, तेथपर्यंत माझ्या जिवाला स्वस्थता नाहीं. त्यांस तेथून त्वरित

हांकून लावण्याची महाराजांकडून मला सक्त ताकीद झाली आहे. शिवाय तो पन्हाळ्यावरील किल्लेदारही बिथरला आहे. त्याचा समाचार मला घेतला पाहिजे. मी याच पायीं करविरास जाणार होतो. परंतु या कामांत मला एका मनुष्याची मसलत घेणें जरूर आहे. त्याकरितां मी मुद्दाम वडगांवांत परत आलों.

जि०—( उत्साहानें ) समजलों आपलें काय म्हणणें आहे तें. मी इकडला राहणारा असल्यामुळें मला करविराबद्दल माहिती चांगली आहे. शिपाईगिरीचा धंदाही मला थोडाबहुत समजतो. याकरितां माझी मसलत घेण्याकरितां तुम्ही येथें आलां आहां. ठीक आहे. शिवछत्रपतींच्या सेवेस हा देह अर्पण केलाच आहे. त्यांच्या शत्रूंचें निर्दलन करण्यांत या देहाचा कांहीं उपयोग व्हावा हीच माझी इच्छा. माझ्या हाताखालीं तुमच्या फौजेंतील दोन तीन पथकें द्या, आणि मी काय चमत्कार करून दाखवितों तो स्वस्थ बसून पहा. नुसती माझी मसलत तुमच्या काय उपयोगीं पडणार ? मी गेलों तर पहा शत्रूंची कशी दाणादाण उडवून देईन. काल त्यांनीं माझा पराक्रम पाहिलाच आहे. आतां मी कोल्हापुरास गेलों म्हणजे पुरे. माझें नांव ऐकिल्याबरोबर मोंगलांच्या उरांत धडकी बसून ते पोबारा करतील !

मो०—( किंचित् हंसून ) तुम्हांला करविरास धाडल्यावर शत्रु पराजित होऊन पळून जातील यांत संशय नाहीं. परंतु तुम्हासारख्या सद्गृहस्थास तसदी देण्याचें माझ्या मनांत मुळींच नाहीं. मला मसलत घ्यावयाची ती दुसऱ्याच माणसाची आहे.

जि०—( निराशेनें ) हां, असें काय ?

मो०—आपले घरीं धर्म्या म्हणून एक गडी आहे नाहीं बरें ?

जि०—होय, आहे. मग त्याचें काय ?

मो०--मी त्याची मसलत घेण्यासाठीं मुद्दाम आज वडगांवास आलों आहें.

जि०--छेः, काय म्हणतां ? तम्हांला धर्म्याची गांठ घ्यावयाची आहे ? छेः, तुम्ही माझी थट्टा करतां. माझीच मसलत घेण्यासाठीं तुम्ही येथें आलां हीच गोष्ट खरी.

मो०--नाहीं. मला धर्म्याचीच गांठ घ्यावयाची आहे.

जि०--तें मला खरें वाटत नाहीं. कारण कीं तुमची पदवी मोठी, तुमचा पराक्रम व अधिकारही विशेष. तुम्ही केवळ शिवछत्रपतींचें दुसरें हृदय आहां. तेव्हां तुम्ही माझ्या गरीब गड्यावर स्वदर्शनाचा अनुग्रह कशास कराल ? धर्म्याचें शौर्य मोठें आहे खरें; परंतु तसले पुरुष तुमच्या फौजेंतही शेकडों हजारों असतील. तेव्हां तुम्हांस लढाईच्या कामांत मसलत देण्यासारखें माझ्या धर्म्यांत काय ज्ञान आहे ?

मो०--जिवाजीपंत, तुम्हांला माणसाची पारख अगदीं नाहीं असें म्हटलें पाहिजे. तुमच्या चाकराचें ज्ञान कित्येक गोष्टींत आम्हांपेक्षांही अधिक आहे. मी त्यास फार दिवसांपासून ओळखतों. याकरितां आतां उशीर लावूं नका. माझी व त्याची एकांतीं गांठ पडेल अशी तजवीज अगोदर करा. मला त्याजवळ पुष्कळ महत्वाच्या गोष्टी बोलावयाच्या आहेत.

जि०— बरें बाबा, आमचें काय जातें ? ( आपल्याशीं पुटपुटत ) पण हें काय गौडबंगाल आहे हें मला

कळत नाहीं ! मोरोपंत पिंगळे शिवाजी महाराजांचे मुख्य प्रधान, आणि ते मजवळ कांहींच भाषण करीत नाहींत. माझ्या गरीब गळ्यापाशीं राज्यकारस्थानाच्या मसलती करूं इच्छितात ! सर्वच चमत्कारिक ! ( मोठ्यानें ) चला आमच्या घराकडे. तेथें तुमची व धर्माजीरावाची गांठ घालून देतों.

[ सर्व जातात. ]

**तिसरा अंक समाप्त.**

## अंक चवथा.

### स्थळः—संभाजीचें पन्हाळगडावरील रहाण्याचें ठिकाण.

[ संभाजी एकटाच इकडून तिकडे हिंडतांना दृष्टीस पडतो. ]

**सं०**—( आपल्याशीं ) स्त्रियांनीं एकदां दुराग्रह धरिला म्हणजे तो मोडून काढण्यास प्रत्यक्ष ब्रम्हदेवही समर्थ होणार नाहीं ! या हट्टी त्रिजवटया मरून जातील, पण शेवटीं आपलेंसें करतील. असें असून स्त्रियांचें चित्त चंचल आहे असें ह्मणणारे लोक मूर्ख नव्हेत काय ! अरे, तसें असतें तर एव्हांना मी आनंदसमुद्रांत पोहूं लागलों असतों ! ही देशपांड्याची बायको राधा येथें येऊन अडीच महिने झाले. इतक्या काळांत तिला वश करण्याकरितां मी नानाप्रकारचे यत्न करून थकलों; पण तिचा एक निश्चय आहे तो आहेच ! तिची भेट घेऊं नका म्हणून गणपतराव मला सांगतो. पण माझ्यानें आतां दम निघत नाहीं. माझ्या हृदयांत मदनाग्नि जो एकदां प्रज्वलित झाला आहे तो दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन माझ्या अंगाची होळी करीत आहे ! मना, तूं तिच्यावर एकदम आसक्त झालेंस ही फार अविचाराची गोष्ट केलीस. किती झालें तरी ती परस्त्री, त्यांतून आपणास पूज्य अशा ब्राम्हणकुलांत तिचें जन्म; तेव्हां तिजवर आसक्ति ठेवून आपणास काय कर्तव्य आहे ? असा जर तूं विचार करितेंस तर ही गोष्ट आज या थरास कां येती ? रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबरोबर जर मीं औषध

घेतलें असतें, तर हा शरीरांतील रक्त शोषण करणारा, इंद्रियें विकल करणारा, व विचारबंधनाप्रत छिन्न करणारा प्रीतिरोग माझ्या हृदयांत कां बळावता ? बरें, माझ्या इच्छा कधीं पूर्ण होण्याचा संभव आहे काय ? नाहीं—नाहीं—नाहीं. ही राधा हें एक चमत्कारिक पुष्प आहे. तें अतिशय सुंदर असल्यामुळें दूर टाकून देतां येत नाहीं. तें इतकें नाजुक आहे कीं, त्यास चुरडून टाकण्याची कोणाचीही छाती होणार नाहीं ! हे विधात्या, अरे या स्त्रीचें शरीर जसें तूं सुंदर निर्माण केलें आहेस, त्याप्रमाणें जर तूं हिला सारासारविचार दिला असतास, तर काय बहार झाली असती ! तसें असतें म्हणजे, माझें स्वरूप, गुण, कुल व माझें तिजवरील अप्रतिम प्रेम, यांचें महत्व तिच्या लक्षांत आलें असतें. मी कधीं तरी मराठी राज्याचा मालक होणारच. ही राधा जर मला अनुकूल होती तर हिला तिच्या सौंदर्यास अनुरूप असें पट्टराणीचें पद मीं दिलें असतें ! ( रागानें ) पण लक्ष्मी घरीं चालत येत असून तिचा अव्हेर करणारी ही दांडगी कोण ? किती झालें तरी मी राजपुत्र आहें ! माझा मानभंग व आज्ञाभंग आजपर्यंत कोणींही केला नाहीं ! तो तिला मी कसा करूं देईन ? मी तिचः राजा या नात्यानें तिला पाहिजे तसें वागविण्याचा माझा हक्कच आहे ! आणि माझा हक्क आज मी गाजवीनच गाजवीन ! आज तिजकडे मी जातों आणि पहातों ती मला कशी वळत नाहीं ती ! आज तिच्या पोंवळ्यासारख्या लाल व रसरशीत ओंठाचें चुंबन घेतल्याशिवाय जर मी परत येईन तर मला धिक्कार असो ! [ जातो.

## प्रवेश दुसरा.

[ शोकानें व्याकुल झालेली अशी **राधाबाई** दृष्टीस पडते. ]

**रा०**—( आपल्याशीं ) काय बाई असेल तें असो ! माझ्या मनाला आज एकसारखी हुरहुर लागली आहे ! सकाळपासून उजवा डोळा लवत आहे. यावरून मजवर कांहीं संकट येणार आहे असें वाटतें. पण मजवर येणारें असें संकट आतां कोणचें राहिलें आहे ? एक आकाशांतून वीज कडाडून माझ्या डोकीवर पडावी, किंवा धरणीनें दुभंग होऊन मला गिळण्यासाठीं आ पसरावा हें मात्र अजून घडून आलें नाहीं ! तसें होणार असेल तर तें कांहीं वाईट नाहीं ! या हालांतून माझी एकदांची सुटका तरी होईल ! कांहींही होवो, माझें पातिव्रत्य जेथपर्यंत माझी पाठ राखणारें आहे, तेथपर्यंत मला भीति कोणाची ? देवा ! देवा ! तिकडे काय हाल चालले असतील व किती अपमान होत असेल ? आई जगदंबे, तूं सर्वसाक्षीच आहेस याकरितां तुला किती विनवूं ? तुजवांचून अनाथाचा कैवार कोण घेईल ? या प्रसंगीं आमचें रक्षण करणारी तूंच आहेस. या प्रसंगीं तुझ्या कृपेनें जर आम्ही या संकटांतून पार पडलों, तर तुझ्या नांवानें एकशें आठ सुवासिनींची खणानारळांनीं ओंटी भरीन !

[ **संभाजी** आंत येतो व त्यास पाहून **राधाबाई** उभी रहाते. ]

**सं०**—( पुष्कळ वेळ तिजकडे प्रीतीनें निरखून पाहून ) हे सुंदरी, तूं अशी निराश्रितासारखी दीन व उदासीन कां दिसतेस ? ईश्वरानें तुला हें सुंदर शरीर दिलें आहे त्याची अनास्था कां करितेस ? तूं वस्त्रालंकारांविषयीं निरिच्छ कशी झालीस !

रा०—स्त्रियांचा मुख्य अलंकार त्यांचा पति. तो खुशाल असल्यावर इतर दागिने शोभनात. तो प्राणसंकटांत पडला असल्यावर मला अलंकार काय करावयाचे? ( जाऊं लागते. )

सं०—( तिला अडवून ) ज्याच्या पायांशीं प्रणाम करीत असतां सहस्त्रावधि बलिष्ठ लोक आपणांस धन्य मानून घेतात, त्या शिवाजी राजाचा पुत्र मी संभाजी. माझा धिक्कार करून तूं निघून जावेंस हे तुला योग्य काय? पहा, माझा पिता प्रजेचें पोटच्या लेंकराप्रमाणें पालन करितो त्याचा मी पुत्र, त्या अर्थीं तूं माझा आदर केला पाहिजेस.

रा०—शिवाजी महाराज प्रजाजनास पोटच्या लेंकराप्रमाणें मानतात असें आपण म्हणतां हें कांहीं खोटें नाहीं. आपण त्यांचे चिरंजीव, त्या अर्थीं आपलें व माझें बहीणभावंडांचें नातें आहे, हें ध्यानांत आणून जर माझी आपण मर्यादा राखाल, तर मजकडून आपला अनादर कसा होईल?

सं०—( आपल्याशीं ) ही मोठी वस्ताद बायको आहे. हिजबरोबर मी बोलूं लागलों तर ही मला निरुत्तर करील. याकरितां आतां मुख्य मुद्यावर आलें पाहिजे. ( मोठ्यानें ) तुझ्या नवऱ्यास मीं कां प्रतिबंधांत ठेविलें आहे हें तुला ठाऊक आहे?

रा०—खरें कारण काय आहे तें मला माहीत नाहीं. लोक सांगतात कीं ते मोंगलांकडे फितूर आहेत अशा संशयावर आपण त्यांस प्रतिबंधांत ठेविलें आहे. हें जर खरें असेल तर आपणांस मी हात जोडून विनंती करितें कीं, तो

आरोप अगदीं खोटा आहे. कृपा करून आपण त्यांस सोडून द्यावें. आपले उपकार आम्ही जन्मभर स्मरूं!

**सं०**—कृष्णरावाची मुक्तता करण्याचें काम तुझ्या इच्छेचें आहे!

**रा०**—माझ्या इच्छेचें आहे ? तें कसें ?

**सं०**—तूं मजजवळ राहण्याचें जर कबूल करशील तर तुझ्या नवऱ्यास मी आतांच सोडून देतों!

**रा०**—( क्रोधानें लाल होऊन ) हे शब्द शिवाजी राजाचाच पुत्र बोलत आहे काय? आंब्याचे झाडास कधीं कधीं कंवडळेंही लागतात हें मला आजच कळलें !

**सं०**—प्रियकरणी, आतां उपहास करून काय उपयोग? तुला पाहिल्या दिवसापासून अंगांत भूत संचारल्याप्रमाणें तुजविषयीं माझ्या मनांत जो अवर्णनीय अभिलाष उत्पन्न झाला आहे, तो कधींही शांत व्हावयाचा नाहीं. याकरितां हे लावण्यलतिके, मी तुजवर अत्यंत लुब्ध होत्साता तुझा दासानुदास होऊन तुझ्या चरणीं लागलों आहें! ( पायां पडतो. ) माझे प्राण घेणें किंवा मला जिवंत ठेवणें हें तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. जर तूं माझा अव्हेर करिशील तर दुःखानें झुरून झुरून मरून जाण्याचें माझ्या नशीबींच आलें आहे! पण जर तूं मला अनुकूल होशील, तर मजसारखा धन्य प्राणी या त्रिभुवनांत कोण आहे ?

**रा०**—( कानावर हात ठेवून ) हरहर ! काय भाषण हें ? संभाजी महाराज, कांहीं विवेक धरा. विचार करा. आपले मनास असें पाहिजे तिकडे बहकूं देऊं नका ! आपल्या कुलशीलाकडे लक्ष द्या ! आपल्या वडिलांची नीति कशी आहे, ते आपल्या ज्ञानाचा आणि अधिकाराचा कसा व्यय

करितात हें ध्यानांत आणा. ज्याच्या ठायीं धर्म व नीति हीं निरंतर वास करितात, त्या राजर्षींचे आपण चिरंजीव ; आपणांस परस्त्रीवर अशी पापवासना ठेवणें हें कधींही योग्य होणार नाहीं! येसूबाईसाहेबांच्या सौंदर्याविषयीं व सद्गुणांविषयीं मीं कीर्ती ऐकिली आहे. त्यांजवर जर आपण असेंच प्रेम कराल तर आपणांस इहलोकीं चांगलें व परलोकींही चांगलें. आपण वडिलांमागें सिंहासनावर आरूढ होणार. आपणच जर असें अन्यायाचें आचरण करूं लागलां, तर आपली आज्ञा कोण मानील ? आणि नीतीनें प्रजापालन करणें तरी आपलेकडून कसें घडेल ?

**सं०**—राधाबाई, तुला मघांशीं एकदां सांगितलें ना, कीं आतां विवेक करण्याच्या गोष्टी सांगणें व्यर्थ आहे म्हणून! मग माझी व्यर्थ निंदा करून फल कोणचें ? माझ्या म्हणण्याप्रमाणें जर तूं चालशील तर त्यांत तुझें अत्यंत हित आहे. तुला पट्टराणी करण्याचें माझ्या अंगांत सामर्थ्य आहे !

**रा०**—देवानें मला ज्या स्थितींत निर्माण केलें आहे त्या स्थितींत मी सदाचरणानें राहिलें म्हणजे इहलोकचें सर्व सुख मला मिळालें!

**सं०**—छे छे! पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळालें म्हणजे आपणास इहलोकचें सर्व सुख मिळालें असें होत नाहीं ! वेडे! शेले, शालू, शालजोड्या हीं ज्यांचीं वस्त्रें; हिरे, मोतीं, पाच, माणिकें यांनीं सुशोभित ज्यांचे अलंकार ; मिष्टान्नभोजन करणें व सुखशय्येवर आपल्या प्रियाशीं विलास करणें, हे ज्यांचे नित्य व्यवसाय ; त्या राजस्त्रियांच्या स्थितींत व तुझ्या स्थितींत कांहींच भेद नाहीं म्हणतेस !

सेवेकरितां हात जोडून भोंवत्या उभ्या असणाऱ्या शेंकडों दासी; सहस्त्रावधि लोकांचें बरेंवाईट करण्याचा हातांत अधिकार; मजसारख्या बलिष्ठ राजाचें जिवाहूनही अधिक प्रेम; या गोष्टी जर तुला अनुकूल नसतील, तर तूं इहलोकच्या सुखांचा व विलासांचा काय उपभोग घेशील ? विधात्यानें आपलें कौशल्य खर्च करून जें तुझें रूप निर्माण केलें आहे, त्याची कृतार्थता झाली पाहिजे. ज्या ठिकाणीं मनुष्यानें कधींही पाऊल ठेविलें नाहीं, ज्या ठिकाणीं व्याघ्रसिंहादिक हिंस्त्र पशु मात्र हिंडावयाचे, अशा रानांत जर एखादें गुलाबाचें फूल निर्माण झालें व कालेंकरून कोमेजून गेलें, तर त्याचा उपयोग काय ? त्याचें सौंदर्य व नाजुकपणा पाहून आपली दृष्टि कोण निववील ? त्याचा अनुपमेय सुगंध घेऊन कोणाचें मन प्रसन्न होईल ? त्याला स्वशिरीं धारण करून आपणास कोण धन्य मानून घेईल ?

रा०—आपण माझा स्वभाव अगदीं ओळखला नाहीं. इहलोकचें खरें सुख संपत्तीमध्येंच मिळतें अशी माझी समजूत नाहीं. मग पापमार्गानें मिळविलेल्या वैभवांत आपण मला सुखाची आशा कां दाखवितां ? मला स्वतःला सुखाची कांहींच पर्वा नाहीं. देवानें ज्या पुरुषाशीं माझी जन्माची गांठ घातली आहे, त्याला जें सुख तेंच मला सुख. त्याजबरोबर रानांत अनवाणी उपाशीं हिंडण्यांत जें मला सुख आहे, तें त्याशिवाय मोठ्या राजवाड्यांतही होणें नाहीं! नवऱ्याच्या सेवेंत तत्परतेनें राहून आयुष्य घालवावें हा स्त्रीचा धर्म. तिला अन्यवस्तूचा विचार कशास पाहिजे ? याकरितां महाराज, माझी पदर पसरून आपणांस

विनंती इतकीच आहे कीं, माझा नाद आपण सोडा. मला व्यर्थ पीडा देऊं नका. मजवरच आपण आग कां पाखडतां? जगामध्यें आपल्या ऐश्वर्यास भुलणाऱ्या शेंकडों स्त्रिया सांपडतील!

**सं०**—( आवेशानें ) मी तुझा नाद सोडून देणार ! तें तर मी जिवंत आहें तेथर्यंत घडणेंच नाहीं ! तूं जिवंत आहेस तेथर्यंत तूं पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही गेलीस तरी मी तुला तेथून हुडकून काढीन ! मी हरएक उपाय करून आपले मनोरथ पूर्ण करीनच करीन ! दुर्दैवानें माझ्या आधींच जर तुला मरण आलें तर ' राधा ! ' ' राधा ! ' ' राधा ! ' असा या मनोहर नामाचा जप करीत मीही प्राण सोडीन!

**रा०**—संभाजी महाराज, सावध व्हा, सावध व्हा; अजून तरी मी काय म्हणतें तें ऐका असे उन्मत्त होऊं नका ! इहलोकीं पुरुषास परस्त्रीसारखें विष नाहीं. स्त्रियेस परपुरुषाच्या संसर्गासारखा नरक नाहीं. तुम्ही प्रभु आहां. तुम्हांस सर्व अनकूल आहे. तुम्ही एक सोडून दहा लग्नें करून घेतलीं तर त्यांत तुम्हांस कोणी दोष देईल असें नाहीं. परंतु दुसऱ्यांच्या स्त्रियांवर, सुनांवर व मुलींवर पापदृष्टि ठेवून नरकाचें साधन करून घेऊं नका ! पुरुष कितीही गुणी, ज्ञानी व मान्य असला तरी परस्त्रीच्या अभिलाषानें त्याच्या सर्व गुणांवर पाणी पडून लोकांमध्यें त्याची छीथू होते ! आणि प्रायः याच दुर्व्यसनांत त्याचा प्राण जाऊन निंद्य परिणाम होतो!

**सं०**—पुरे! पुरे! तूं मला व्यर्थ भीति घातलीस म्हणजे मी एखाद्या लहान मुलाप्रमाणें भिऊन जाईन असा अर्थ

नाहीं! तूं म्हणतेस तें कदाचित् खरें असेल; परंतु ती गोष्ट हलक्यासलक्या लोकांस लागू. मी राजा आहें. मला वाटेल तें मी करीन. मला पीडा करण्यास कोण समर्थ आहे?

**रा०**—( तिरस्कारानें ) आपली कथा काय? आपलेपेक्षां शेंकडोंपटीनें बलिष्ठ असणारे लोक पूर्वी परस्त्रियांच्या पायीं उलथून गेले आहेत हें आपणांस ठाऊकच आहे! परस्त्रीच्या नादांत प्रत्यक्ष देवांचा राजा जो इंद्र त्याची काय दुर्दशा उडाली? ज्यास नऊ हजार हत्तींचें बळ तो कीचक द्रौपदीस भुलून अग्नीच्या ज्वाळेवर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें कसा प्राणास मुकला? ज्यानें स्वपराक्रमानें त्रिभुवन हालवून सोडिलें तो लंकानाथ सीतेचा अभिलाष धरून आप्तगणगोतासह कसा नाश पावला? या गोष्टी ध्यानांत धरा. जे जे या मार्गानें गेले, त्यांतून एकाचेंही कल्याण झालें नाहीं!

**सं०**—( आपल्याशीं ) ही सरळ उपायांनीं वळतां दिसत नाहीं. याकरितां आतां कठोरपणा धरलाच पाहिजे. ( क्रोधाचा आविर्भाव आणून मोठ्यानें ) दुष्टे! मी तुझ्या हिताची गोष्ट तुला सांगत असतां तूं माझी कीचकाशीं व रावणाशीं तुलना करितेस! मी म्हणतों तसें तूं ऐकशील तर बरेंच आहे; नाहीं तर मी आज तुला जिवंत टेवीत नाहीं. तूं जिवंत राहून मजसारख्या शेंकडों तरूण पुरुषांचीं हृदयें पोळशील? ( कमरेची कट्यार काढून ) पहा, ही कट्यार तुझ्या उरांत खुपसून मी तुझा प्राण घेणार!

**रा०**—( शांतपणानें ) मीं अशा रीतीनें मरून जावें अशी जर ईश्वराची इच्छा असेल तर त्यास उपाय काय?

परंतु आपणांस मी एकच सांगतें कीं, एक सोडून शंभर मृत्यु जरी माझ्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत येऊन उभे राहिले, तरी माझें वर्तन पातिव्रत्यापासून तिळमात्रही ढळणार नाहीं ! याकारितां खुशाल पुढें या, आणि माझ्या जिवाचा बळी घेऊन मला मोकळी करा ! त्यांत मला आनंदच आहे! कारण दुसऱ्याची मजकारितां विटंबना होणार, त्यापेक्षां मी मेलें तर पातिव्रत्यासाठीं प्राण देण्यासही मागें सरलें नाहीं अशी माझी कीर्ति तरी होईल ! मज अबलेवर हत्यार टाकल्यानें आपल्या शिपाईगिरीचीही जगांत प्रशंसाच होईल !

**सं०**—( जळफळत आपल्याशीं ) काय करावें ! मी जें जें करितों तें तें माझ्याच गळ्यांत येत आहे ! बरें आणखी एक उपाय करून पाहूं. ( मोठ्यानें ) नाहीं नाहीं. तूं आजपर्यंत जी मला अनन्वित पीडा दिली आहेस, आणि आज मला ज्या दुरुक्ति बोलली आहेस त्याचा सूड मी निराळ्याच रीतीनें घेईन ! नवऱ्याच्या नांवावर तूं फार उड्या मारीत आहेस, तर त्याचेच हाल करून त्याला मी ठार मारीन म्हणजे तूंही दुःखानें तडफडून मरशील !

**रा०**—( अतिशय घाबरून ) का—काय ?

**सं०**—काय तें तूं आतां घटकेंतच पहाशील. तुझ्या डोळ्यांसमोर पलीकडे तो कडा दिसत आहे, त्यावरून कृष्णराव देशपांड्याचे हात पाय बांधून त्यास ढकलून देईन. तीं पहा त्या दरीच्या तळाशीं बिघाडें; तीं तेथें कशाकारितां फिरत असतात हें तुला माहीतच आहे !

**रा०**—( दीनस्वरानें ) छे छे ! असले भयंकर शब्द आपण उच्चारूं देखील नयेत ! असलें क्रूर कर्म करण्याचें आपल्या मनांत देखील येणार नाहीं, मग हातून कसें घडलें ?

सं०— ( निष्ठुरपणानें ) पण अशा मतलबी भाषणानें माझें मन वळेल असें तूं समजूं नको. मी म्हणेन त्याप्रमाणें करणारा मनुष्य आहें !

रा०—( काकुलतीनें ) असें करण्यापासून हित कोणचें ? नको नको ! असले शब्द ऐकण्यापेक्षां माझा प्राण झटकर निघून गेला तें बरें ! आम्हीं आपला काय अपराध केला आहे ? मी आपलेपुढें पदर पसरतें ! पाहिजे तर आपल्या पायांशीं शंभर वेळां नाक घासतें ! माझी विनंती एवढी आपण ऐकली पाहिजे ! आपण म्हणतां त्याप्रमाणें जर मी आपल्या मनःसंतापास कारण झालें असेन, तर मला पाहिजे ती कडक शिक्षा आपण करावी. त्यांच्या जिवास काडी इतकी यातना देऊं नये. आपण समर्थ आहां. आपले ठिकाणीं दया असलीच पाहिजे !

सं०—( रोषानें ) राधे, तुजबद्दल मला आतां दया कशी येईल ? मी येवढा राजपुत्र, आपला मान एकीकडे ठेवून तुझ्या विनवण्या करूं लागलों, तेव्हां तुला माझी दया आली ? मग आतां मजपासून दयेची अपेक्षा कां करितेस ? तुझ्या भर्त्यावरील संकट टाळण्याचा आतां एकच मार्ग आहे. इतःपर तूं त्याचें नांव काढूं नयेस व त्याचें मुखावलोकनही करूं नयेस. आजपासून तूं मजजवळ दासीप्रमाणें रहावेंस. तुझ्या शरीराचा व मनाचा मालक मी. या गोष्टी जर तुला कबूल असतील तर कृष्णरावाचा जीव बचावेल. कसें काय ? बोल.

रा०—( निराशेनें चवताळून ) राक्षसा ! नीघ येथून. जा, तुला काय करणें असेल तें कर ! माझ्या हातून असलें कर्म कधींही घडणार नाहीं ! निर्लज्जा, अधमा,

मी काकुलतीस येऊन तुझ्या इतक्या विनवण्या केल्या असतां तुझें हृदय द्रवत नाहीं, तर तें पाषाणापेक्षांही कठीण म्हटलें पाहिजे! बरें, तुला वाटेल तें कर! सन्मार्गानें चालणाऱ्या नवराबायकोंची तूं या लोकीं तुटातूट केलीस तरी परलोकीं आम्ही आनंदानें एकत्र अक्षय्य सुखांत राहूं! तेथें तर तूं येत नाहींस? पण काळतोंड्या, असलें अतिनीच कर्म करून तूं आमचा छळ करीत आहेस, त्या अर्थी तुझें कधींही कल्याण होणार नाहीं! तुझ्या जिवांत जीव आहे तेथपर्यंत तुला यमयातना होतील; आणि तूं हालहाल होऊन मरशील! हा माझा शाप कधींही अन्यथा होणार नाहीं, हें खचित समजून ठेव!

सं०—(तिरस्कारानें) तुझ्या असल्या शापांस व शिव्यांस मी भीत नाहीं! गोडागुलाबीनें तूं वळली नाहींस हें तुझें दुर्दैव. त्याला मी काय करूं? तुजवर बलात्कार करून मी आपली इच्छा पूर्ण करणार. तुझें रक्षण करण्यास कोण तुझा काका येथें उभा रहातो तो पहातों! (राधाबाईच्या अंगाशीं जाऊं लागतो.)

रा०—(मागें सरून) मागें हो, मागें हो. निलाजऱ्या! अरे, असा पशूसारखा उन्मत्त कसा झालास! खबरदार, जवळ येशील तर संभाळून ऐस! (संभाजी तीस धरूं लागतो व ती इकडे तिकडे पळूं पहाते.) अग बाई, आतां काय करूं! अरे देवा नारायणा, धांव धांव लौकर, आतां अंत पाहूं नको! (संभाजी तीस धरतो.) अरे काळतोंड्या, सोड, सोड मला! नाहीं तर बघ या भिंतीवर डोकें आपटून प्राणच मी देईन! (मोठ्यानें ओरडून) अरे

धांवा धांवा कोणी तरी ! या चांडाळाच्या हातून मला कोणी तरी सोडवा लौकर !

**सं०**—( मदनानें व क्रोधानें धुंद होऊन दांत खात ) राधे, राधे, ओरडूं नको. प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला तरी मी तुला आतां सोडणार नाहीं. गप् गप्, ओरड तर खरी म्हणजे गळा चेपून तुझा प्राणच घेतों. ( दोघे धडपड करितात. )

[ इतक्यांत **गणपतराव** खोलीजवळ येतो. ]

**ग०**—( खिडकींतून आंत पाहून आपल्याशीं ) वहावारे संभ्या ! मी नसतां माझ्या घरावर दरोडा घालव-याचा तो घातलासच अं ? मी वेळेवर आलों म्हणून तुला लाग साधला नाहीं ही गोष्ट निराळी. ( अकस्मात् दरवाजा उघडून प्रवेश करून ) वाहवा ! संभाजी महाराज, फार चांगलें काम करीत आहां !

**सं०**—( राधाबाईस सोडून क्रोधानें पाय आपटीत ) हा शिनळीच्या गाढवा ! तुला येथें येण्यास हीच वेळ बरी सांपडली ! अरे, आज दोन महिनेपर्यंत मदनाग्नीनें संतप्त झालेली गात्रें या निर्दय परंतु सुंदर स्त्रियेच्या गाढालिंगनानें शांत करणार होतों, इतक्यांत तूं मांगासारखा येथें येऊन उभा राहिलास याची तुला शरम नाहीं वाटत ?

**ग०**—अहो महाराज, तुमच्या डोळ्यावरची थोडी धुंदी उतरेल तर तुमचे हे चाळे लागलेच बंद पडतील. तुम्ही आहां कोठें ? प्रसंग कोणचा गुदरला आहे याची तुम्हां-ला दाद तरी आहे काय ?

**सं०**—( चपापून ) काय ? काय म्हणतोस ?

**ग०**—संभाजी महाराज, आपणांस सर्व वृत्तांत मी

उणें होतें ? वडिलांच्या कृपेनें दूधभात खाऊन खुशाल पडलों असतों ! या राज्यप्राप्तीच्या वेडगळ कल्पना माझ्या मनांत तूं भरविल्यास ; मोंगलांकडे बोलणें करण्याची बुद्धि तूं शिकविलीस; बाबांस धरण्याचा घाट तूं घातलास; आणि आपलें काळें तोंड येथें मला दाखवून म्हणतोस कीं, " मोंगलांकडे पळून गेल्याशिवाय आपल्यास गत्यंतर नाहीं ! "

ग०—( निस्पृहतेचा डौल घालून ) वाहवा ! मैत्री म्हणतात ती हीच ! मित्राच्या खऱ्या प्रेमाचें चीज श्रीमंत लोक याच तऱ्हेनें करितात. बडे लोकांच्या कल्याणासाठीं गरीब लोकांनीं जिवापाड श्रम केले तरी शेवटीं त्यांची पूजा याच रीतीनें व्हावयाची ! संभाजी महाराज, अजूनही आपण वडिलांकडे जावें. तुम्ही प्रत्यक्ष त्यांचे पुत्र आहां याकरितां तुम्हांस माफी होईलच. महाराज आपलेवर विश्वास ठेवणार नाहींत तरी तेथें दूधभात खाऊन ते जिवंत आहेत तेथपर्यंत राहण्यास अडचण पडणार नाहीं. जा, दरबारी लोक तुम्हांस ' पितृद्वेषी ' ' धर्मशत्रु ' ' दगेबाज ' असें म्हणतील तें ऐकून तुमची सावत्र आई क्षणोक्षणीं मर्मभेदक वाग्बाण मारील ते सहन करा. वडिलांमागें एकाद्या डोंगरी किल्ल्यांतील तुरुंगांत कित्येक वर्षें अन्नपाण्याचे हाल सोसून एकाद्या दिवशीं विषप्रयोगानें किंवा मारेकऱ्याच्या कट्यारीनें मरून जा, झालें. आपले जसें प्राक्तन असेल तशी आपणांस बुद्धि होईल. मीं आपणांस राज्यावर बसविण्याची निरपेक्ष बुद्धीनें खटपट केली हा मजकडून मोठा अन्याय झाला; याची क्षमा असावी. आतां माझेंच काय होईल तें होवो!

सं०—( विरमून ) तसें नव्हे गणपतराव, एकादे

वेळेस उगीच मी एकीकडे बसून राहिलों म्हणजे असले विचार मनांत येतात. तूं माझ्याच कल्याणासाठीं झटतोस ही माझी खात्री आहे. तुझी माझी मैत्रीबद्दल जी आणभाक झाली आहे ती आपण जिवंत आहों तेथपर्यंत कायम राहावयाची. तुला मीं या संकटांत ओढिलें आहे, याकरितां मी तुला कधींही सोडणार नाहीं. जी तुझी गति ती माझी. मग आतां मी काय करूं म्हणतोस ?

**ग०**—मजबरोबर तुम्हीं मोंगलांकडे जाण्यास निघालें पाहिजे.

**सं०**—कधीं ?

**ग०**—आज रात्रीं.

**सं०**—इतकी घाई कां ?

**ग०**—महाराज, आतां येथें राहणें सुरक्षित नाहीं. गडकरी लोकांनीं आजपर्यंत आपला अपमान केला नाहीं ही सुदैवाची गोष्ट. पण कालपासून तें गाणें फिरलें आहे, आज गडकरी लोक अगदीं बिथरले आहेत. मी आज गडावर आलों तेव्हां त्यांच्या रागीट मुद्रांवरून मला भीति पडली कीं ते आतांच माझा कडेलोट करतात कीं काय नकळे ! पेशव्यांची फौज आल्यापासून हे गडकरी इतके शेफारून गेले आहेत. नाहीतर, आजपर्यंत त्यांना आपल्या फितुरीबद्दल संशय आला नसेल ? आलाच असेल. परंतु ते सरकारी फौज येण्याची वाट पाहत होते. आतां येथें आपण एक दिवस राहिलों तर खचित धोका पोंचेल.

**सं०**—तूं म्हणतोस तें सगळें खरें. पण माझे पाय येथून कसे सुटतील देव जाणे ! माझे तैनातीस जे लोक आहेत त्यांचा मी नांवाचा धनी, पण वस्तुतः बंदिवान आहें

हें तूं पहातोसच. ते मला एकट्याला पाहिजे तिकडे कसें जाऊं देतील ?

ग०—मीं सर्व योजना करून ठेविली आहे. या किल्ल्याला एक चोरवाट आहे. ती मला मात्र माहीत आहे. प्रहररात्र झाली म्हणजे आपण हळूच कोणास न कळत त्या वाटेनें किल्ल्याबाहेर पडूं. माचीवर आपण पोंचलों म्हणजे तेथें दोन घोडे तयार टेवण्याबद्दल मीं आपल्या विश्वासू गड्याला सांगून ठेविलें आहे; त्या घोड्यांवर बसून आपण निघून जाऊं. एकदां बाहेर पडल्यावर मग गडावरून पाठलाग होण्याची भीति नको. बरें, त्या राधाबाईचें तुम्ही काय करणार ? तिला बरोबर नेणार काय ?

सं०—नाहीं. आतां तिची गोष्ट मजसमोर काढीत जाऊं नको.

ग—अहो, दोन घटकांपूर्वीं तुम्ही इतके आतुर झालां होतां कीं मी आलों नसतों तर तिजवर तुम्हीं खचित बलात्कार केला असता, आणि इतक्यांत तिजविषयीं असें वैराग्य कां धरिलें ?

सं०—ती हट्टी व मूर्ख पोर आहे. ती मला कधीं वश होणार नाहीं. मग तिचा उगीच नाद कशास पाहिजे ? खरेंच सागूं गणपतराव, माझ्या बोलण्यापासून तिला फार दुःख होतें. अशा सुंदर अबलेचें मन दुखविणें योग्य नव्हे. आपल्याला वाटलें होतें तशांतली ती बायको नव्हे!

ग०—इतकी तुम्हांला भूतदया होती तर तुम्ही तिजवर जुलूम करण्यास कसे प्रवृत्त झालां होतां ?

सं०—त्याचें कारण अभिमान. मीं अभिमानाच्या भरीं पडून अशीं दुष्ट कृत्यें करण्यास तयार होतों. पण मागून

त्याबद्दल मला फार पश्चात्ताप होतो. अरेरे ! त्या गरीब स्त्रियेची म्यां अधमानें किती छळणा केली ?

ग०—( आपल्याशीं ) हें पोरगें अगदीं अजागळ आहे! याला या वेळीं थोडा पीळ भरला नाहीं तर राधा माझ्या हातीं लागतां दिसत नाहीं! ( मोठ्यानें ) मला वाटतें या राधेचा नाद अगदीं सोडून देण्यास पश्चात्ताप किंवा भूतदया यांपैकीं एकही कारण नसावें. (उपहासपूर्वक) महाराज, तुम्ही भ्यालां होय ?

सं०—( रागानें ) भ्यालों ? तो कशाकरितां ?

ग०—तिचा नवरा तुमचा सूड घेईल म्हणून!

सं०—( संतापून ) गण्या, भय ही वस्तु जन्मापासून मला माहीत नाहीं व मला भित्रा असें आजपर्यंत कोणींही म्हटलें नाहीं. कारण, माझें धैर्य केवढें आहे ही गोष्ट जग-जाहीर आहे. आज तूंच बोललास त्याला उपाय नाहीं. दुसरासा कोणी असता तर त्याची जीभच कापली असती!

ग०—छे छे! तुम्ही भ्यालां म्हणून कांहीं आश्चर्य नाहीं. महाराज, या कृष्णरावासारखा प्रतापी योद्धा आमच्या प्रांतांत दुसरा नाहीं. तेव्हां त्याचा जर कोणीं अपराध केला तर तो सूड घेण्यास कधींही चुकणार नाहीं ! त्याचा अपमान करण्याची कोणाची छाती आहे ?

सं०—( आवेशानें ) कोणाची छाती ? माझी! मजसमोर रही तूं ज्याच्या पराक्रमाची प्रशंसा करितोस असा तो कोण पुरुष आहे ? गणपतराव, त्या देशपांड्याच्या उर्मट पो-राच्या भीतीनें मीं राधाबाईचा नाद सोडून दिला असें तुला वाटतें काय ? ठीक आहे. तर आज त्याबरोबर युद्ध

## अंक पांचवा.

स्थळः—पन्हाळगडाखालच्या रानांतील देवीच्या देवळाजवळची एक बारी.

[ राजा व बहिर्जी प्रवेश करितात. ]

**शि०** बहिर्जी, तूं म्हणतोस कीं गणपतरावाच्या गड्याकडून ही बातमी तुला कळली. पण ही बातमी खरी असेल ना ?

**ब०**—तिच्या खरेपणाबद्दल मला तर संशय मुळींच नाहीं. तो गडी म्हणाला कीं, संभाजी महाराज व गणपतराव प्रहररात्रीनंतर या वाटेनें मोंगलांच्या छावणीकडे जाण्यास निघतील. पण त्याचें म्हणणें खरें किंवा खोटे हें आतांच कळेल. कारण आतां प्रहररात्रीचा सुमार असावा.

**शि०**—देव करो व तुझी बातमी खरी ठरो! मग संभाजी मोंगलांकडे कसा जाईल तें पाहीन !

**ब०**—सरकार, आपलेबरोबर आणखी कांहीं मंडळी पाहिजे होती. मला एकट्यालाच बरोबर घेऊन आपण आलां हें योग्य झालें नाहीं.

**शि०**—कां बरें ?

**ब०**—संभाजी महाराजांचा स्वभाव अगदीं बदलला आहे. त्यांस वाटेंत धरण्याचा प्रयत्न केला असतां ते काय करतील हें कळत नाहीं. निराशेनें मनुष्य बेफाम झाला म्हणजे तो काय न करील ?

**शि०**—ही गोष्ट माझ्या मनांत पूर्वीं येऊन चुकली

होती. पण माझ्या मुलावर माझा किती वचक आहे हें मी जाणतों. तो किती बेफाम झाला असला तरी मी जर त्यास हांक मारून म्हटलें कीं, " शंभू, फीर मागें," तर त्याची पुढें पाऊल टाकण्याची मगदूर नाहीं!

व०--पण तो गणपतराव--त्याविषयीं आपण काय म्हणतां? तो तर उलट्या काळजाचा मनुष्य आहे!

शि० -अं:, त्या किल्लेदारांत कांहीं अर्थ नाहीं. तो चांगला शिपाई आहे असें मी ऐकत होतों. पण परवांपासून तो दोनदां मजसमोर आला आणि दोनही वेळां त्याची अगदीं गाळण उडाली. मग मलाच पाहून त्याची अशी दशा होते, कीं तो मूळचाच शेंदाड शिपाई आहे हे कळत नाहीं. कसेंही असलें तरी त्याजपासून आपणांस भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

व० -- ऐका, ऐका. महाराज, घोड्यांच्या टापा अगदीं जवळ ऐकूं येऊं लागल्या. आपल्या उजवे बाजूस वांकणांतून वाट येत असल्यानें कोणी आलें तर अगदीं कळत देखील नाहीं. ते पहा. आपणांस पाहिजेत तें गृहस्थ घोड्यावर बसून चालले आहेत. संभाळा. सावधपणानें पुढें व्हा. ( मिशांस पीळ भरून ) मी या किल्लेदाराचा समाचार घेतों.

शि०--छे! पुढें जाऊन त्यांस अडविण्याचे कारणच नाहीं. कारण ते दोघेही घोड्यावरून उतरून व घोडे झाडांस बांधून इकडेसच येत आहेत. आपण या जवळच्या जाळींत बसून ते काय बोलतात तें ऐकूं.

[ **संभाजी** व **गणपतराव** प्रवेश करितात.]

**सं**०--( गणपतरावास ) आपण किल्ल्यांतून तर

सुरक्षित बाहेर पडलों. पण पुढें काय विघ्नें येतील नकळे ! माझ्या तर मनाला चैन पडत नाहीं !

**ग०**—महाराज, आपण अगदीं दिलगिरी धरूं नये. गडकरी आपल्या पाठीस लागले तर त्यांच्या हातांवर तुरी देऊन आम्ही निसटून जाऊं. मी किल्यावर होतों तेथपर्यंत मात्र मनाला सारखी धुगधुग लागली होती. गड-कऱ्यांनीं मला पकडून शिवाजीकडे नेलें असतें तर काय झालें असतें ? तुम्हांदेखत तुम्हांकरितां तुमच्या गण्याला हत्तीच्या पायांशीं बांधून घेऊन मरावें लागलें असतें ! पण आतां काय, मी वाघाच्या जाळींतून सुरक्षित बाहेर पडलों. आतां मी कोणाला भितों कीं काय ?

**शि०**—( आपल्याशीं ) हरामखोरा, वाघाच्या जाळींतून तूं सुटलास तर नाहींसच. पण उलटा वाघाच्या जबड्यांत मात्र पुरता सांपडला आहेस !

**ग०**—( मोठ्यानें हंसून ) कायहो संभाजी महाराज, आपले वडील राजद्रोही लोकांस मोठें शासन करीत असतात नाहीं बरें ? मी तर प्रत्यक्ष तुम्हांला घेऊन शत्रूकडे चाललों आहें. आहे त्यांचें सामर्थ्य मला अडविण्याचें !

**शि०**—( आपल्याशीं ) अडविण्याचेंच काय, पण रड-विण्याचेही सामर्थ्य आहे ! प्रसंग आला पाहिजे म्हणजे तूं पहाशीलच !

**सं०**—बरें तें असूं दे. तीं दोघें अजून आलीं नाहींत हें कसें ? मला वाटतें आपण खुळ्यासारखे रात्रभर येथें वाट पहात बसूं, आणि तीं येणार देखील नाहींत. त्यांना आपलेबद्दल संशय असेल.

**शि०**—( आपल्याशीं ) तीं! तीं कोण ?

ग०—महाराज, तो कृष्णराव जिवाजीपंताचा मुलगा! संशय धूर्त व शहाण्या मनुष्यास येतात; मूर्खास संशय कुठला व भय कुठलें ! तुम्ही स्वस्थ वसा. असे उतावीळ होऊं नका. वेळ आली म्हणजे त्या जिवाजीपंताच्या सुनेवर झडप घाला म्हणजे झालें ! तो कृष्ण्या कांहीं गडबड करूं लागला तर टाकूं त्याला तिथलच्या तिथेंच तोडून, म्हणजे झालें!

शि०—( बहिर्जीकडे वळून ) बहिर्जी, हें भाषण तूं ऐकिलेंसना ? जिवाजीपंताच्या मुलाचा घात करून त्याच्या सुनेस पळवून नेण्याचा या दुष्टांनीं बेत केला आहे. मी शंभूस धरून नेण्याकरितां आलों असून जिवाजीपंताच्या पुत्रास व सुनेस या संकटातून सोडविण्याजी मला संधी आली आहे हें माझें थोर भाग्य होय !

ब०—हें जर खरें असेल तर महाराज, आपण प्रकट होऊन पुढें प्राप्त होणाऱ्या विघ्नाचा आधींच प्रतिबंध करावा हें उत्तम. कारण येथें कांहीं तरी मोठा अनर्थ होईल असा सुमार दिसतो. कृष्णराव लहान सामान्य मनुष्य नाहीं. तो प्रलय करील ! संभाजी महाराजही उगीच बसणारे नव्हेत. त्यांची व कृष्णरावाची लढाई जुंपली असतां काय परिणाम होईल नकळे !

शि०—बहिर्जी, शंभूस आपल्या दुष्ट कृत्यांबद्दल पश्चात्ताप झाला नाहीं आणि नुसतें मीं त्यास धरून नेलें तर त्यापासून तादृश उपयोग नाहीं. फार झालें तर त्यास प्रतिबंधांत ठेवून तो असलीं दुष्ट कर्में करणार नाहीं अशी तजवीज होईल त्या रीतीनें करीन. पण त्याचें जर मन शुद्ध नाहीं तर पुढेंमागें तो बिघडणारच. त्यास कुमार्गा-

पासून अगदीं परावृत्त करण्यास पश्चात्ताप हेंच मुख्य साधन होय. कृतकर्माबद्दल त्यास पश्चात्ताप झाला तर मी त्याजवर प्रथमप्रमाणें कृपा करीन. न झाला तर मरेपर्यंत कैदेंत टाकीन. येथें आतां काय काय प्रकार होतो हें शेवटपर्यंत मी बघणार आहें. आपलेबद्दल अगदीं अडलेंच तर मात्र ओळख द्यावयाची.

**ब०**—जशी सरकारची मर्जी.

**ग०**—( संभाजीस ) महाराज, सावध असा. ही तुमची शिकार आली.

[ **राधाबाई व कृष्णराव** बोलत येतात. ]

**कृ०**—( क्रोधानें ) काय ? तो दुष्ट तुझ्यावर जुलूम करण्यास देखील प्रवृत्त झाला ?

**रा०**—होय, होय. अग बाई ! त्या वेळच्या स्थितीचें स्मरण झालें म्हणजे भयानें माझें काळीज थरारून जातें!

**कृ०**—( तिला जवळ घेऊन व तिचें चुंबन घेऊन ) आतां तूं भीति धरूं नको. मी समीप असतां तुला यत्किंचित् पीडा देण्यास समर्थ होईल असा पुरुष जन्मासच आला नाहीं!

**रा०**—पण त्या वेळीं मला सोडविण्याकरितां गणपतराव तेथें आले म्हणून हे पाय माझ्या दृष्टीस पडत आहेत !

**कृ०**—अग, ईश्वराला अनाथाची काळजी आहे. भक्तांस संकट पडलें म्हणजे तोच या गणपतरावासारख्या उदार मनाच्या पुरुषास पाठवून संकटाचा परिहार करितो. यावरून गणपतराव आमचा हितशत्रु नसून तो आपला असा विश्वासू स्नेही आहे अशी माझी खात्री होते. आमची संपत्ति लुटून घेण्यांत व आम्हां दोघांस कैदेंत टाकण्यांत

त्याच्या नांवाचा उगीच डंका मात्र झाला. बाकी तें कृत्य संभाजीचेंच होय यांत संशय नाहीं!

रा०—होय, माझ्या सर्व दुःखांस व यातनांस तोच मूळ कारण. ( डाव्या बाजूस पाहून भीतीनें! ) अगाई, ते कोण तेथें बसलें आहे !

सं०—( एकदम पुढें होऊन राधाबाईजवळ जाऊन ) मनमोहिनी, असा व्यर्थ आरोप तूं मजवर कां करितेस ? चल मजबरोबर आणि मग पहा कीं हा विलासी पुरुष तुला यातना देणार आहे कीं तुजबरोबर विषयवनामध्यें प्रीतीच्या सरोवरांत स्वच्छंदानें क्रीडा करणारा आहे.

शि०—( आपल्याशीं ) शंभू, तुझेच कारे हे शब्द !

ग०—( आपल्याशीं ) मूर्ख बेटा ! तिला उचलून घोड्यावर घालावयाची आणि पळून जायचें. 'तिजबरोबर अलंकारिक भाषणें करण्याची का ही वेळ ?

कृ०—( मध्यें होऊन व तरवार उपसून संभाजीस ) राजपुत्रा ! खबरदार, मागें हो. संपत्ति, अधिकार व शक्ति हीं सर्व तुला अनुकूळ आहेत. तेव्हां तूं म्हणशील कीं या गरीब मनुष्यानें मजशीं काय वैर करावयाचें आहे ! तथापि इतकें मनांत पक्कें समजून ठेव कीं, जेथपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तेथपर्यंत मी तुला एक पाऊलही पुढें सरकूं देणार नाहीं. माझा मुर्दा पडल्यावर त्यावरून तूं चालत जा, आणि मग ती तेथपर्यंत जिवंत राहिल्यास तुझ्या हातीं लागेल.

ग०—( आपल्याशीं ) तुझा मुर्दा पाडावा म्हणून तर माझी इतकी खटपट !

रा०—( काकुलतीनें कृष्णरावास एकीकडे ओढून )

आपण कां जीव धोक्यांत घालतां ! आपल्या सर्व श्रमांस कारणीभूत जी मी, ती मीच या कड्यावरून उडी टाकून प्राण देतें, म्हणजे सगळा तंटा मिटला !

कृ०—प्रिये, तूं गेल्यावर मागें राहून मला काय कर्तव्य आहे ? माझा जीव धोक्यांत पडेल हें पहाण्याची ही वेळ नव्हे. विवाहामध्यें अग्नि व ब्राम्हण यांजसमोर मीं तुझें पाणिग्रहण केलें आहे, त्या अर्थीं तुझें संरक्षण करण्याचें माझें कर्तव्यकर्मच आहे. तें मला करूं दे. यश अपयश येणें हें माझ्या हातीं नाहीं. ती गोष्ट दैवाधीन आहे- या कलहांत जर दुर्दैवानें मी पडलों तर तुला वाटेल त्याप्रमाणें तूं कर. तेथपर्यंत तूं स्वस्थ असावेंस अशी तुला माझी आज्ञा आहे. ( संभाजीकडे वळून ) चल दुष्टा, लढण्यास तयार हो. तूं माझ्या धर्मपत्नीचा छळ केला आहेस, त्या अर्थीं या वैराग्नीचें शमन रक्तपाताशिवाय होणें नाहीं. आजच्या युद्धाचा शेवट कोणाचा तरी प्राण गेल्या शिवाय होणेंच नाहीं.

सं०—( तरवार उपसून ) हां हां ! असें असें ! कृष्णराव, मला वाटत होतें कीं तुझ्या अंगांत कांहीं तरी शहाणपणा असेल, व तूं बायकोची आशा न धरितां जीव बचावून निघून जाशील. परंतु मजबरोबर लढून धारातीर्थीं मरण पावण्याचें तुझ्या मनांत आलें आहे असें दिसतें. ठीक आहे. शत्रूनें युद्धार्थ निमंत्रण केल्यावर संभाजी पाठ फिरवून माघारा निघाला ही गोष्ट कधीं घडली नाहीं व पुढेंही घडणार नाहीं.

शि०—( आपल्याशीं ) हें तुझें शौर्य यवनांचा उच्छेद

करून स्वधर्म स्थापण्याकरितां जर उपयोगीं पडतें तर आमच्या कुळास मोठें भूषण आलें असतें !

**शा०**—हाय ! हाय ! किती तरी मी अभागी ! काय हे माझ्या जन्माचे धिंडवडे ! हे सर्व कलह मजकरितां चालले आहेत ! आजच्या प्रसंगीं राजपुत्राच्या देहास कांहीं अपाय झाला तर आमच्या कुळाच्या राजभक्तीस अक्षय्य कलंक लागेल ! जर माझ्या जीविताचें साफल्य करणाऱ्याचेंच कांहीं बरें वाईट झालें तर माझ्या जिण्यास धिक्कार असो !

**सं०**—संभाळ कृष्णराव, तुझ्या आंगीं सामर्थ्य असेल तर विद्युत्पाताप्रमाणें भयंकर असा जो माझा खड्गप्रहार त्याचें निवारण कर.

[ **कृष्णराव** व **संभाजी** लढूं लागतात. लढतां लढतां **कृष्णराव संभाजीच्या** तरवारीचे तुकडे तुकडे करितो. **संभाजी** आश्चर्यानें स्तब्ध उभा राहतो. ]

**कृ०**—( तरवार खालीं ठेवून ) संभाजी, तूं माझे असे अपराध केले आहेस कीं, या वेळीं मीं तुझा प्राण घेतला तरी मला कोणी दोष देईल असें नाहीं. ज्याच्या हातांत हत्यार नाहीं त्याच्यावर वार चालविणारा अधम पुरुष मी नाहीं ! याकरितां मी आपलें हत्यार ठेवून तुला बाहुयुद्धार्थ बोलवीत आहें. धैर्य असेल तर पुढें हो. नाहीं तर आमची वाट सोड म्हणजे आम्ही आपल्या रस्त्यानें निघून जातों.

**सं०**—( उत्साहानें दंड थोपटून ) कबूल आहे. माझ्या तरवारीनें मला आयत्या वेळीं दगा दिला, तरी हे माझे

विश्वासू बाहू अजून कायम आहेत. यांचें बळ कसें आहे तें तुझ्या दृष्टीस पडेलच.

शि०—( आपल्याशीं ) शाबास ! शाबास! कृष्णराव, केवळ भीष्माप्रमाणें धर्मयुद्ध करणार या काळांत तूं एकच होस. अशा नीतीनें जो लढाई करितो त्यास ईश्वर जय देईलच यांत काय संशय ? पण हें अजून आमच्या पोराला समजत नाहीं !

ग०—( पुढें होऊन ) थांबा; वीरहो, थांबा. अशानें तुमच्या भांडणाचा निकाल लवकर लागणार नाहीं. कृष्णराव, घ्या आपली तरवार उचलून. संभाजी महाराज, तुम्ही माझी तरवार घेऊन युद्ध करा. पण तुम्हां दोघांसही सांगतों कीं मारामारी करून आपले हातपाय तोडून घेण्यांत अर्थ नाहीं. याकरितां एकमेकांनीं मागच्या सर्व गोष्टी विसरून संधी करावा हें उत्तम.

सं०—कृष्णराव मला शरण येईल तर मी त्याला जिवानिशीं सोडीन.

कृ०—( तिरस्कारानें ) शरण ? मी तुला शरण येणार ? तूंच माझ्या पत्नीच्या पायांवर मस्तक ठेवून जीवदान मागशील तर आज माझ्या हातून जिवंत सुटशील. मी तर तुझ्या छातीवर पाय देऊन उभा आहें !

सं०—झालें. गणपतराव, आतां तूं रदबदली करूं नको. आतां मी कृष्णरावाशीं लढून एक जय तरी मिळवीन, किंवा मरून तरी जाईन.

शि०—( हळूच ) बाहिर्जी, हे दोघेही पुरते हट्टास पेटले आहेत असें दिसतें. या कलहाचा काय परिणाम होईल न कळे. काय करूं ? माझ्यानें स्वस्थ बसवत नाहीं.

पुत्राच्या जिवास अपाय होईल या चिंतेंत माझा जीव तळमळत आहे !

कृ०—( किल्लेदाराचा हात धरून एकीकडे ) गणपतराव, तूं आणि मीं लहानपणापासून बंधूप्रमाणें वागत आलों आहों. याकरितां मजबद्दल तुला अभिमान असला पाहिजे. मी तर माझ्या स्त्रियेची अब्रू बचाविण्याकरितां लढत आहें. जर मी यांतून जिवंत बाहेर आलों तर सर्व ठीकच आहे. मी पडलों तर मात्र माझ्या प्राणवल्लभेस या दुष्टाच्या हातीं लागूं देऊं नको. ही माझी तरवार घेऊन आधीं तिचे दोन तुकडे कर. नंतर या गर्वानें अंध झालेल्या राजपुत्राशीं लढून त्याचा प्राण घे. म्हणजे तूं आमच्या मरणाबद्दलचा चांगला सूड घेतलास असें होईल. ( दुःखानें उसासा टाकून ) माझा वृद्ध पिता तर येथून दूर राहिला. आमचा शेवट अपरात्रीं या घोर अरण्यांत होणार. असो, ईश्वरी इच्छा ! आतां बाबांस माझे ठिकाणीं तूंच आहेस. त्यांचें मन अगदीं दुखवूं नको. त्यांची अशी शुश्रूषा कर कीं जेणेंकरून त्यांस आमचा विसर पडेल. आमची काय वतनवाडी आहे ही आतां तुझीच आहे. मी सांगतों याप्रमाणें तूं करशील ना ?

ग०—हो हो ! त्यांत काय संशय ?

कृ०—तर घे शपथ. मार माझ्या गळ्यावर हात.

ग०—( कृष्णरावाच्या गळ्यावर हात ठेवून ) तुझ्याच गळ्याची शपथ !

कृ०—गणपतराव, तुमची आमची हीच आतां शेवटची भेट. एकदां मला शेवटचें कडकडून आलिंगन दे म्हणजे मी सुखी होईन. मग प्रत्यक्ष कालिकालाशींही झगड-

ण्यास मी मागेंपुढें पहाणार नाहीं! ( दोघे एकमेकांस आलिंगन देतात व किल्लेदार मागें सरतो. )

सं०—कृष्णराव, आतां विलंब कां ?

कृ०—विलंब इतक्याकरितां कीं, अजूनही विचार करून तूं आपले प्राण वांचवावेस. परंतु तुझा तर मरण्याचा हट्ट दिसतो, तर तसेंच कां होईना ?

[ दोघे पुनः लढतात. कृष्णरावास वार लागून तो मूर्च्छित पडतो. संभाजीही श्रमानें धापा देत एका शिळेवर बसतो. ]

रा०—(त्वरेनें कृष्णरावाजवळ जाऊन व मोठ्यानें ओरडून) हारे दुर्दैवा ! काय हा मजवर प्रसंग आणिलास ! आतां मी काय करूं ! कोणास हांक मारूं ! कोणाचा धांवा करूं ! ( मूर्च्छित पडते. )

शि०—( आपल्याशीं ) हरहर !! काय भयंकर प्रसंग हा ! या स्त्रीपुरुषांच्या नाशास मी कारण झालों ! मी जर पुढें येऊन माझ्या पुत्राचा हात धरला असता तर, या गोष्टी घडून न येत्या.

ग०—( हर्षानें संभाजीस ) कायहो, तो पुरता मेला का ?

सं०—( कृष्णरावाजवळ जाऊन व त्याची जखम पाहून ) छे ! तो सुदैवानें मरण्याची भीति नाहीं. पायाला जखम लागली आहे ती इतकी भयंकर नाहीं. जखमेंतून रक्त वाहूं न दिलें म्हणजे तो आतां सावध होईल. ( कमरेचा शेला सोडून व त्याचा पदर फाडून कृष्णरावाची जखम बांधतो. )

शि०—असो. कृष्णरावाच्या जिवाला धोका नाहीं हें

ऐकून मला समाधान वाटतें. त्याच्या बायकोची स्थिति मात्र काय झाली आहे, हें कळत नाहीं.

ग०—त्या देशपांड्याच्या पोराचें शिर धडापासून वेगळें करून एकदां पुरता निकाल लावाना ?

सं०—(क्रोधानें ) दुष्टा ! ज्या वीराचें मन एवढें उदार कीं ज्यानें मी निःशस्त्र झालों असतां मजवर हत्यार धरण्याचें न कारलें, तो मूर्च्छित पडला असतां त्याचा खून करण हें मांगाचें काम! तं तूंच करशील! माझ्या हातून ती गोष्ट कदापि घडणें नाहीं!

शि०—शाबास ! शंभु ! हें मात्र तूं माझ्या मुलाप्रमाणें भाषण केलेंस !

कृ०—पण राधा जर तुम्हांला पाहिजे असेल तर याचा नाश आधीं तुम्हीं केला पाहिजे. तो जिवंत राहून कसें चालेल?

सं०—( विचार करीत स्तब्ध बसतो. )

रा०—( सावध होऊन ) काय ? अजून येथेंच पडणें झालें आहे ? ( कृष्णरावाच्या गळ्यास मिठी मारून व त्याच्या हनुवटीस हात लावून ) अहो ! आतां किती अंत पहाल ! उठा, उटा, चला आपल्या गांवीं जाऊं. मामंजी आपली वाट पहात बसले असतील. येथें थंडी कोण पडली आहे, आणि अशा ठिकाणीं आपण निद्रा घेत पडलां यास काय म्हणावें ? या अरण्यांत व्याघ्रादि हिंस्र पशु हिंडत असतात त्यांचें तुम्हांस भय नाहीं वाटत ? आपण मजजवळ अबोला कां धरिला ? आपणच जर मजवर राग धरिला तर मीं आतां कोणाच्या तोंडाकडे पहावें ? आपण एका घटकेपूर्वीं काय काय बेत करीत होतों तें सर्व निर्फळ झालें काय ?

कृ०—( सावध होऊन राधाबाईकडे पाहून ) काय ! तूं अजून येथेंच बसली आहेस ? तूं घाबरूं नको. मी चांगला सावध आहें. पण मला बोलण्याला देखील शक्ति उरली नाहीं. संभाजी आणि गणपतराव कोठें गेले ?

रा०—( हर्षानें ) ते दोघे पलीकडे कांहीं बोलत आहेत. पण वाऱ्यानें त्यांचें बोलणें ऐकूं येत नाहीं. आपणही बोलूं नये; स्वस्थ असावें. बोलण्याचे श्रम आपणाला सोसणार नाहींत.

ग०—( संभाजीस ) कां महाराज, आपण स्तब्ध बसलां ! उत्तर कां करीत नाहीं ?

शि०—शंभु आतां काय उत्तर देतो हें ऐकण्याची मला उत्कंठा लागली आहे !

सं०—गणपतराव, झाली ती गोष्ट झाली. ती आतां परत येते असें नाहीं. कृष्णरावाचें उदार वर्तन व अपार शौर्य पाहून माझें मन अगदीं विरघळून गेलें आहे, व मी परम नम्र झालों आहें. अशा पुरुषाशीं मीं कलह केला, आणि तोही त्याच्या धर्मपत्नीच्या अभिलाषनें ! तिचें पातिव्रत्य तरी केवढें, कीं जिला अहल्याद्रौपदी इत्यादि साध्वींनीं वंदन करावें ! लक्षावधि स्त्रीपुरुषांमध्यें असा जोडा एखादा जमून यावयाचा. त्यांचाही मीं अधमानें सुखभंग केला ही गोष्ट मनांत आली म्हणजे माझें मन मला खाऊं लागतें. किल्लेदार, राधाबाईस या क्षणापासून मी आपली पाठची बहीण म्हणून समजतों. यांत काय तें समज.

शि०—( आपल्याशीं ) पुत्रा, तुझ्या तोंडचे हे शब्द ऐकून मी कृतार्थ झालों.

ग०—( मनांत ) झालें ! आजपर्यंत मीं केलेल्या सर्व

खटपटी व्यर्थ झाल्या ! असो. आतां एक गोष्ट विचारणें राहिली आहे. ( उघडपणें ) महाराज, आपण येथें बोलत बसून उपयोगीं नाहीं. आपण कोणीकडे निघालों आहों हें आपल्या ध्यानांत आहे ना ?

**सं०**—मला आतां मोंगलांकडे येण्याची जरूरी नाहीं. राधाबाईस पळवून नेऊन मोंगलांच्या मुलखांत जाऊन राहावें असें माझ्या मनांत होतें, पण आतां ती दुष्ट बुद्धि मीं सोडून दिली आहे. आतां मी बाबांकडे जाऊन त्यांचे पाय धरीन आणि म्हणेन कीं, " बाबा, मीं महदन्याय केले आहेत. मी आपल्या पायांशीं आलों आहे. माझ्या अपराधाबद्दल शिक्षा करणें किंवा क्षमा करणें आपणांकडे आहे. " तुला वाटेल तिकडे तूं जा. तुझी माझी आजपासून संगत सुटली.

**ग०** – ( मनात ) लागलें वाघाचें पिलूं नखें बाहेर काढायाला ! आतां याला मोकळें सोडून उपयोगीं नाहीं. हा खचित राधाबाईला मी नेऊं लागलों तर अडथळा करील. ( मोठ्यानें ) छे छे ! असें कसें होईल ? आपण आणाशपथा घेऊन आमरणांत मैत्री राखण्याचें ठरविलें आहे ; त्याचा हाच का अर्थ ? जेथें आपण तेथें मी. मीही महाराजांजवळ जाऊन आपले अन्याय कबूल करीन. मग मला काय शिक्षा होईल ती होवो !

**सं०**—( गणपतरावाची पाठ थोपटून ) शाबास ! खरा मित्र म्हणावें तर तुलाच ! तुला क्षमा होण्याबद्दल मी यथाशक्ति खटपट करीन.

**ग०**—( घाबरल्यासारखें करून ) संभाजी महाराज, आपले दंडाला जखम लागली आहे, तिकडे आपलें लक्ष गेलें नाहीं ?

सं०—( किंचित् हंसून ) अं:, उगीच कुठे चाट-लागली आहे झालें; त्यांत काय आहे ?

ग०—भलतेंच नाहीं तें ! असल्या गोष्टीची उपेक्षा करून उपयोग नाहीं. माझ्या शरीरास शंभर जखमा लागल्या तरी त्यांचें मला इतकें दुःख होणार नाहीं. पण आपलेवर माझें इतकें अवर्णनीय प्रेम आहे कीं, आपल्यास तिळमात्र दुःख झालें असतां माझा जीव कसा कासावीस होतो! आपण खालीं बसून आपले हात अंमळ लांब करा म्हणजे मी डोकीचा पटका काढून त्यानें ती जखम बांधून टाकितों.

सं०—बरें, जशी तुझी मर्जी असेल तसें कर.

[ **संभाजी** खालीं बसतो व **गणपतराव** त्याची जखम बांधतां बांधतां शिताफीनें हातपाय बांधूं लागतो. ]

शि०—( आपल्याशीं ) अरे घातक्या, हींच का तुझी मैत्री !

सं०—( विस्मयानें ) मूर्खा, हें रे काय ?

ग०—( संभाजीस पुरतें बांधून ) ही एक खुबी आहे.

सं०—म्हणजे !

ग०—आपले वडिलांस लोक सांबाचा अवतार म्हणत असतात. आपण त्यांचे पुत्र. म्हणून आपणांस चतुर्भुज करून मीं विष्णूचा अवतार बनविलें आहे!

सं०—( संतापून ) कोण पाजी मनुष्य आहेसरे तूं ? थट्टा कोणच्या वेळीं कोणाजवळ करावी हें तुला कांहींच समजत नाहीं !

ग०—थट्टा ! अशी थट्टा थट्टा समजून किती लोक मरत असतील नकळे ! एखाद्यास तोफेच्या तोंडीं बांधून

उडविण्यांत किंवा हत्तीच्या पायीं बांधण्यांत तर तुम्ही थट्टा समजत असाल तर हीही थट्टाच समजा !

**सं०**—अरे, तुझें म्हणणें तरी काय आहे ?

**ग०**—( गर्वानें व क्रोधानें ) इतःपर जर तूं मला अरे तुरे म्हणून हांका मारशील तर चावकांनीं तुझ्या पाठीच्या चिंधड्या उडवीन ! मी आतां तुझ्या दरोडेखोर बापाचा नोकर नाहीं ! मी अलमगीर बादशाहाचा नोकर आहें ! मला ' गणपतराव मनसबदारसाहेब बहादूर ' अशी हांक मारून नम्रपणानें हात जोडून भाषण करीत चल. तूं म्हणशील मी शिवाजीचा मुलगा; पाहिजे त्याबरोबर पाहिजे तसा वागलों तरी चालणार आहे. पण तें आतां विसर. मागचे चाळे सोडून दे. तूं माझ्या ताब्यांत पुरता सांपडला आहेस. मी तुला असाच मोंगलांकडे नेणार. तेथून तुला उंटाच्या पाठीवर उलटा बांधून दिल्लीस पाठवून देऊं; समजलास आतां मी काय म्हणतों तें ?

**सं०**—काय गणपतराव, तू मला कैद करून मोंगलांकडे नेणार ? दुष्टा, आजपर्यंत मीं तुजवर बंधूप्रमाणें प्रेम करून अत्यंत विश्वास ठेविला; सुखदुःखाच्या गोष्टी मीं तुजजवळ बोलून प्रत्येक कामांत तुझी मसलत घेत होतों; तूंही प्रतारणा करणार नाहीं म्हणून शपथ घेतलीस; त्याचा शेवट हाच काय ? तूं माझ्या बापाच्या घरांतून मला काढून शेवटीं माझ्या गळ्यास फांस लाविलास ! अरे विश्वासघातक्या, असा तुझा अपराध तरी मीं काय केला होता !

**ग०**—तूं शिवाजीचा मुलगा कां झालास? एकाद्या गरीब कुणब्याच्या कुळांत कां उत्पन्न झाला नाहींस ? हाच तुझा मुख्य अपराध. शिवाय ज्या स्त्रियेवर लहानपणापासून मीं

दारी ठेवली होती, तिजवर तूं जुलूम करण्यास प्रवृत्त झालास. तिला पळवून परदेशांत नेण्याची खटपट तूं चालविलीस. हे काय लहानसान अपराध आहेत! (इकडे तिकडे फिरत) असो. रात्र सरत चालली. अजून मला पुष्कळ लांब जावयाचें आहें. आतां त्या देशपांडयाच्या मुलास कंठस्नान घालून राधेला व तुला येथून नेण्याची खटपट करितों.

रा०—( कृष्णरावास ) आपण सावध आहां ना? ( किंचित् थांबून ) हे तर अगदीं स्तब्ध पडले आहेत! ही काय निद्रा आली आहे किंवा मूर्च्छा आली आहे हें कळत नाहीं! ( मोठयानें ) अहो गणपतराव, तेथें तुम्ही बोलत काय उभे राहतां? आधीं इकडे या आणि यांची प्रकृति पहा!

ग०—आलों आलों बरें तिकडेच! माझे सोनकुले! थांब अंमळ.

सं०—अरे चांडाळा, घातक्या, नीचा, तुझीं कर्में इतकीं दुष्ट आहेत कीं त्यांची निंदा करण्यास माझी जिव्हा समर्थ होत नाहीं! जर तूं अंमळ माझे हात मोकळे सोडशील तर—

ग०( हंसून ) नको नको! तुझी जिव्हाच तुझ्या स्वाधीन आहे तेवढयानेंच काय चालेल तितकें चालूं दे! तुझे जर मीं हात मोकळे सोडिले तर गाढवें म्हणूं लागतील कीं आमच्यापेक्षां माणसांत देखील कित्येकांचे कान लांबा असतात!

सं०—( दुःखानें ) संभाजी! तूं एवढया प्रबळ छत्रपतीचा पुत्र असून आज तुझी अशी दुर्दशा व्हावी ना! अथवा दुर्जनाच्या संगतीपासून हाच परिणाम!

आज येथें माझा कोणीच कैवार घेणारा नाहीं ! बाबा बाबा ! तुमचे जरी मीं घोर अपराध केले आहेत, तरी माझी ही स्थिति पाहून तुम्हांला खचित दया आली असती !

**शि०**—( आपल्याशीं ) पुत्रा, अशा प्रसंगींही मी तुला विसरलों नाहीं बरें !

**रा०**—( गणपतराव तिजकडे येत असतां ) अहो गणपतराव, सांगा, सांगा, संभाजी महाराजही जखम लागून पडले आहेत ?

**सं०**—( मोठ्यानें ओरडून ) हे साध्वी, माझे हातपाय बांधले जाऊन पतिव्रतेचा छळ केल्यापासून होणाऱ्या पापांचें मी फळ भोगीत आहे ! आतां तूं मात्र या राक्षसापासून आपल्या अब्रूचें रक्षण कर, व आपल्या पतीचेही प्राण वांचीव. मी जर मोकळा असतों तर तुम्हां दोघांचें रक्षण करण्यांत मीं आपला प्राण दिला असता.

**रा०**—गणपतराव, महाराज हें काय बोलतात ? तुम्ही इकडे कोणच्या हेतूनें येत आहां ? तुमचे हातांत हत्यार कशाकरितां ?

**ग०**—जिवलगे, या तुझ्या अजागळ नवऱ्यापासून तुला एकदांची मोकळी करितों. याच्यामुळेंच तुला या यातना भोगाव्या लागल्या ! तूं या वेळीं मऊ बिछान्यावर झोंप घेत सुखानें पडलेली असावयाचीस; परंतु याच्याच संगतीनें तुला अरण्यांत यावें लागलें. याकरितां एकाच घावानें याला यमलोका पाठवितों.

**रा०**—नका नका ! असें बोलूं देखील नका !

**ग०**—मी एक चकार शब्द देखील अधिक बोलत नाहीं. जें मी आतां बोललों तें करून दाखवितों.

रा०—( काकुलतीनें ) अहो गणपतराव, असे कसे तुम्ही निष्ठुर होतां ? ज्याच्या अन्नावर तुम्ही वाढलां, ज्याबरोबर तुम्ही लहानपणापासून खेळ खेळलां, ज्याबरोबर तुम्ही विद्या शिकून एवढ्या योग्यतेस चढलां, जो अर्ध्या घटकेपूर्वी तुम्हांस जिवलग मित्राप्रमाणें लेखीत होता, तो निःशास्त्र व निद्रिस्त असतां त्यावर प्रहार करणें तुम्हांस कसें योग्य वाटतें ? त्यानें तुमचा काय अन्याय केला आहे ?

सं०—( दरडावून ) अरे अधमा, चांडाळा, मागें फीर, मागें फीर असलें घोर पातक करण्यास तूं प्रवृत्त झाला आहेस, पण याचीं फळें तूं लवकरच भोगशील बरें ! अरे, ह्या तुझ्या दगलबाजीबद्दल सूड घेणारा जेव्हां तुला भेटेल, तेव्हां तूं कोठें जाशील ? तुजवर दया कोण करील ?

ग०—ओरड ! ओरड ! कंठास शोष पडे तोंपर्यंत ओरड ! तुला मी भीत नाहीं ! येथें आतां तुझा बाप आला तरी त्यासही मी भिणार नाहीं !

शि०—तें आतां पहाणें आहे !

ग०—( राधाबाईस ) राधे, तूं कशाला श्रमी होतेस ? तुला एकदां सांगितलें कीं, कृष्णरावास ठार मारल्याशिवाय मी उगीच बसणार नाहीं. तुझी इच्छा असो अगर नसो; तें मी पहात नाहीं. मीं तुला बलात्कारानें नेण्याचा जो संकल्प केला आहे त्याच्या सिद्ध्यर्थ तुझ्या नवऱ्यास ठार मारल्याशिवाय मला गत्यंतर नाहीं ! (कृष्णराव तरवार उगारतो.)

रा०—(कृष्णरावाच्या अंगावर पडून अतिदीन स्वरानें) अरे अरे ! एक माझें म्हणणें तरी ऐक ! मी तुजपुढें पदर पसरून एवढें चुडेदान मागतें हें मला दे ! अरे, लोकांचे नित्य प्राण घेणें हा ज्याचा धंदा त्या मांगास सुद्धां माझी

दीन दशा पाहून करुणा येईल ! मग तूं तर ब्राम्हणच आहेस ! तूं आमचा आप्त असून तुजवर आम्हीं कांहीं उपकारही केले आहेत ते आतां स्मर.

[ किल्ल्यावरील शिंगे वाजतात. ]

ग०— ( भीतीनें किल्ल्याकडे पाहून ) घात झाला ! मला पकडण्याकरितां गडकरी आतां येथें येतील. या पोरीला व संभाजीला येथून अजून घेऊन जावयाचें आहे. आतां मी क्षणभर येथें थांबलों असतां प्राणासच मुकेन ! ( राधाबाईस ) राधे, त्याच्या आंगावरून उठून बाजूस होतेस कीं नाहीं ? का टाकूं एका घावानें दोघांचेही तुकडे करून ? ( तरवार उगारतो. )

रा०—खुशाल! खुशाल ! एक तर माझ्या पतीस सोड, किंवा आम्हां दोघांसही एकदम मारून टाक ! या प्रसंगीं दोहोंतून कोणचीही गोष्ट केलीस तरी तुझे आम्हांवर उपकारच होतील !

शि०—( मनांत ) आतां जर मीं उपेक्षा केली तर ब्रम्हहत्या व स्त्रीहत्या केल्याचें पातक मला लागेल. ( वेगानें पुढें सरून गणपतरावास दरडावून ) किल्लेदार, ठेव हत्यार खालीं. .

सं०—( मनांत ) बाबा येथें आले ? आतां मी त्यांस कसें तोंड दाखवूं ? या वेळीं पृथ्वी दुभंग होऊन जर मला आंत घेईल तर बरें होईल !

ग०—( शिवाजीस पाहून घाबरतो व तरवार खालीं ठेवून कांपत कांपत हात जोडून ) म–म–महा–रराज, म–म–मी–( बोवडी वळून बोलतां येईना म्हणून शिवाजीच्या पायांकडे बोट दाखवितो. )

रा०—( अनुमानानें शिवाजीस ओळखून अति हर्षानें ) आला! आला! आतां दुर्जनांचा काळ आला! जो अनाथांचा कैवारी त्यानें माझ्या रक्षणार्थ धावणें केलें! ( गणपतरावास ) दुष्टा! आतां मी तुला भीत नाहीं! ( शिवाजीकडे वळून ) महाराज, आपणांस मी राधा प्रणाम करित्यें. ( शिवाजीच्या पायां पडत्ये. )

शि०—हे साध्वी, तूं मला प्रणाम करावास हें योग्य नाहीं. तूं अशी पवित्र व पुण्यवान् आहेस कीं, मींच दररोज सकाळीं उठून तुला शतप्रणाम करावे. उठ, तूं भर्त्यासह चिरकाल नांदून संसारसुख भोगशील. केवढें तुझें प्रखर पातिव्रत्य! केवढें तुझें थोर मन! काय तुझी राजभक्ति! बाळे! या तुझ्या सद्गुणांनीं तूं आपल्या माहेरच्या व सासरच्या कुळासच भूषणीभूत झालीस असें नाहीं, तर तूं माझ्या सर्व राष्ट्रास शोभविलें आहेस! अशा पतिव्रता माझ्या राज्यांत नांदतात म्हणूनच बलिष्ठ शत्रूंस पराजित करण्याचें माझ्या बाहूंत सामर्थ्य येतें! आजपर्यंत तूं पुष्कळ कष्ट भोगलेस, परंतु इतःपर मी तुला असुखाचें वारें हीं लागूं देणार नाहीं! कृष्णरावाबद्दल तूं आतां काळजी करूं नको. ( कृष्णरावास निरखून पाहून ) त्याला मूर्च्छा आली आहे. ( पागोटयांतून एक मुळी काढून ) ही मुळी घे, आणि दगडावर ठेंचून त्याच्या नाकाशीं धर; म्हणजे तो लागलाच सावध होईल. तें पलीकडे देवीचें देऊळ आहे, ती वरी निवाऱ्याची जागा आहे. माझा सेवक बहिर्जी कृष्णरावास उचलून त्या देवळांत नेईल. तेथें तूंही जा. आम्ही मागून आलोंच. बहिर्जी, जा. शंभूचे हातपाय मोकळे

कर; आणि त्याच पटक्यानें या लुच्चाचे हात बांध. नंतर कृष्णरावास उचलून देवळांत ने. आणि तेथेंच बैस.

**ब०**—जी, सरकार.

**शि०**—( गणपतरावास पाहून ) अरे अधमा, तुझीं अन्यायकर्मे आजपर्यंत मी ऐकतच होतों. परंतु आज मीं प्रत्यक्ष तुझें जें वर्तन पाहिलें, त्यावरून असें वाटतें कीं, तुझें दर्शन झालें असतां स्नानच करावें ! तूं जिवंत राहण्यास योग्य नाहींस. पण तुला शतशः देहान्त शासन दिलें असतां तुझ्या पातकांस प्रायश्चित्त पुरें होणार नाहीं !

[ बहीर्जी **संभाजीस** मुक्त करून **गणपतरावाचे** हात बांधतो व कृष्णरावास उचलून **राधाबाई**सह निघून जातो. ]

**सं०**—( धांवतधांवत येऊन शिवाजीच्या पायांवर लोळण घेत व स्फुंदत स्फुंदत रडून )बाबा ! बाबा ! मी किती तरी घोर अपराधी ! मला या संकटांतून सोडविण्याकरितां आलां काय ? मी आपल्या दयेस केवळ अपात्र आहें ! मला कृतकर्माचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे ! याकरितां माझे अन्याय पोटांत घालून मला क्षमा करा.

**शि०**—( सद्गदित होऊन व संभाजीस उठवून पोटाशीं आवळून )ये, ये. लाडक्या ! आतां तुजवर माझा राग नाहीं. आज तुझ्या जिवावर केवढें अरिष्ट आलें होतें! माझें दैव सबल म्हणून तूं आज माझ्या दृष्टीस पडलास ! लेकरा, आतां तरी मला सोडून जाऊं नको ! म्हातारपणीं मला दुःख देऊं नको. पहा, आतां दिवसेंदिवस मी क्षीण होत चाललों. माझे हातून आतां पहिल्याप्रमाणें उपद्व्याप होत नाहीं. मीं वडिलांच्या पुण्याईनें जें एवढें प्रचंड राज्य मिळविलें आहे, त्याच्या कारभाराचा आटोप जर तुम्हीं न

केला तर कोण करील ? आतां राजारामही वयांत येईल. तुला येथें राहणें रुचत नसेल तर मीं कर्नाटकांत नवीन प्रांत जिंकले आहेत तेथें तूं राज्य कर. तुंगभद्रेपली-कडील सर्व देश तुला देतों. तसें नसेल तर तूं मजजव-ळ रहा. सारांश तुम्हीं दोघांनीं एकमतानें राहून हिंदुधर्मा-चा उत्कर्ष करावा व म्लेंछांचा क्षय करावा. माझी इच्छा अशी आहे कीं, माझ्यामागें माझ्या पुत्रांनीं आपल्या जन्म-भूमीचें रक्षण करून मराठे लोकांची कीर्ति दिगंत पसरावी.

**सं०**—( डोळ्यांत अश्रु आणून )बाबा, मला राज्य नको. राज्य करण्याची माझी योग्यता नाहीं. माझ्या बुद्धींत स्थिरता नाहीं. अंगांत कर्तृत्व नाहीं. शहाणपण नाहीं. माझा कनिष्ट बंधुच राज्यास योग्य आहे. त्याच्याच आश्रया-नें राहून इतःपर मी राज्यकारभाराविषयीं उदासीन रहाणार.

**शि०**—बाळा, तूं असें बोलूं नको. आजपर्यंत तुला दुर्जनांच्या संगतीचा रोग जडला होता त्याला आज चांग-ली खरमरीत मात्रा मिळाली आहे. आतां तो रोग तुला पुन्हा जडणार नाहीं. इतःपर तुझे डोळे उघडतील. तूं या व्यवहारांत सावधपणानें राहून चांगल्या लोकांशींच संगत करशील अशी मला आशा लागली आहे. तूं सन्मार्गानें वागूं लागलास म्हणजे प्रजाजन तुझे मागचे अन्याय विस-रतील. ते तुझ्या आज्ञा शिरसा वंद्य मानून तुला सन्मान देत जातील, असो, आतां या कृष्णरावाची काय स्थिति आहे तें पाहू या. बहिर्जी, इकडे ये.

**ब०**—( प्रवेश करून )जी, सरकार.

**शि०**—कृष्णरावाच्या प्रकृतीचें मान कसें आहे ?

**ब०**—त्यांना ती गुळी हुंगण्यास दिली, तेणें-

करून ते आतां चांगले सावध झाले आहेत. परंतु रक्तस्राव झाल्यामुळें त्यांस बोलण्याची देखील शक्ति उरली नाहीं. ते आगदीं पडून आहेत.

शि०—हरकत नाहीं. श्रीजगदंबेच्या कृपेनें सर्व कांहीं यथास्थित होईल. मी येथें आलों आहें असें त्यास कळवूं नको; कारण कीं, माझें नांव ऐकल्याबरोबर तो हालचाल करूं लागेल व बोलण्याचा यत्न करील. तें त्यास हितावह नाहीं. त्यास गडावर घेऊन गेलें पाहिजे. त्याबद्दल काय तजवीज करावी ? ( किल्ल्याच्या दरवाजाकडे पाहून ) वाहवा ! आतां कृष्णरावास नेण्याची पंचाईत मुळींच उरली नाहीं ! ते पहा गडावरून कित्येक लोक भराभर खालीं उतरून इकडेसच येत आहेत. ते आल्यावर कृष्णरावास सुखानें वर नेतां येईल. ते टेंकडीवर आल्यानें इतके जवळ दिसतात तरी त्यांस येथें येण्यास दोन घटिका अवकाश पाहिजे. ( संभाजीस ) चला, तेथपर्यंत आपण देवीच्या देवळांत जाऊन बसूं.

शि०—बहिर्जी,

ब०—महाराज—

शि०—( किल्लेदाराकडे बोट करून ) गडकरी येतील तोंपर्यंत या मनुष्यास तुझ्या हवालीं केलें आहे. याला नीट संभाळ. ( शिवाजी व संभाजी जातात. )

ब०—( किल्लेदारास ) चलरे हारामखोरा, चल, देवळांत जाउन बैस. ( धक्के मारीत त्यास घेऊन जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळः—पन्हाळगडावरील राजवाडा.

[ शिवाजी, मोरोपंत व कांहीं चाकर लोक दृष्टीस पडतात. ]

शि०—मोरोपंत, मी कोण आहें याबद्दल अजूनही जिवाजीपंतास तर्क झाला नाहीं ?

मो०—नाहीं. मी काल वडगांवांत मुक्कामास होतों. जिवाजीपंतास आपण येथें आलां आहां हें ऐकून अतिशय हर्ष झाला आहे. आपणांस एक मोठी मेजवानी करण्यानें त्याच्या मनांत आहे. मीं त्यास म्हटलें, "जिवाजीपंत, महाराज वेषांतर करून प्रजेचें मन पाहण्याकरितां हिंडत असतात. तुमचेकडे येऊन तुम्हांस नकळत ते कित्येकदां येऊन गेले असतील." तो रागावून म्हणाला, "महाराज कोणच्या वेषानें मजकडे आले तरी त्यांस मी ओळखीनच ओळखीन!"

शि०—धर्म्याचें त्यास कधीं स्मरण होतें काय ?

मो०—घटके घटकेस. ते मला म्हणाले, "मोरोपंत, आमच्या धर्माजीची व तुमची मीं गांठ पडूं दिली, परंतु त्यास तुम्ही फितवून पळवून नेलेंत हें चांगलें नाहीं. त्यानें परवां मोठा पराक्रम केला त्याबद्दल त्यास पोषाख व एक सोन्याचें कडें देऊन लावून देण्याचा माझा विचार होता. त्या गरिबाचें तुम्हीं व्यर्थ नुकसान केलेंत. असो, आतां जर आमचा धर्म्या तुम्हांस कोठें भेटला तर त्यास वडगांवांत अवश्य पाठवून द्या."

शि०—( हंसून ) वाहवा ! आज मला भेटण्याकरितां जिवाजीपंत येणार आहे तेव्हां मोठी गंमत होईल. तो सकाळीं निघाला असेल तर हीच त्याची येण्याची वेळ आहे.

[ **जिवाजीपंत** प्रवेश करितो. ]

जि०—( आपल्याशीं ) काय हा आजचा दिवस ! आजच्या आनंदानें मला हर्षवायु होईल अशी भीति

पडली आहे. मी किल्ल्यावर आल्याबरोबर प्रथम जाऊन कृष्णाची प्रकृति पाहिली. तो आतां बरा आहे. त्यास नीट जपण्याबद्दल मुलीस सांगून आलों आहें. तेव्हां आतां त्याबद्दल काळजी करावयास नको. आतां मी महाराजांचें दर्शन घेण्याकरितां निघालों आहें. ( रामराम घेतल्यासारखें करून ) काय ? हे गडकरी जातां येतां मला लवून नम्रपणानें मुजरा करितात ? पण आठ दिवसांपूर्वी मी थंडींत कुडकुडत रात्रभर या किल्ल्याबाहेर पडलों होतों तरी या लुच्चांनीं मला आंत घेतलें नाहीं! आतां मी राजवाड्याच्या देवडीवर येऊन पोहोंचलों. कोण आहे रे तिकडे पहाऱ्यावर ? मी वडगांवचा जिवाजीपंत देशपांड्या महाराजांच्या दर्शनाकरितां आलों आहे अशी आंत वर्दी पोंचवा. ( ऐकल्यासारखें करून ) काय म्हणतां ? " जा, दादा, तुम्हांला वर्दी नको. सरकार थोरल्या दिवाणखान्यांत बसले आहेत तेथें जा! " अरे म्हणतां काय ? बरें, हा मी आंत निघालों. राजदर्शनाचा मला कधीं अनुभव नसल्यानें माझें ऊर भीतीनें धसधस उडत आहे ! ( दिवाणखान्यांत प्रवेश करून शिवाजी राजास पाहतो आणि आश्चर्यानें व भयानें स्तब्ध उभा राहून ) अरे, हें आहे काय ? मी झोंपेंत तर नाहीं ! ( अंगास चिमटे काढून ) छे! मी झोंपेंत नाहीं. मी जागा आहें. आणि मी पहातों हें सर्व खरें आहे. तर मग आतां येथून पळ काढावा हें उत्तम! पुढें जाण्याची आपली तर बोवा छाती होत नाहीं!

( मागें मागें सरूं लागतो. )

**शि०**—( जिवाजीपंतास पाहून व हंसून ) हे आले आमचे यजमान—या!

मे०—जिवाजीपंत, असे पुढें येऊन महाराजांस मुजरा कराल कीं नाहीं ? तेथेंच काय उभे राहिलां ?

जि०—( त्वरेनें जाऊन व शिवाजीच्या पायांवर डोकें ठेवून ) महाराज, मी आपणांस आतां कोणच्या गुणानें तोंड दाखवूं ? आपण आश्रिताचे कल्पवृक्ष राजाधिराज माझ्या घरीं स्वतः आगमन केलें असतां म्यां अभाग्यानें आपणांस ओळखलें नाहीं! कारण नसतां मीं आपला बहुत वेळ मानभंग केला. माझी योग्यता नसतां मी आपणांशीं विनोद केला. मीं आपले अनंत अपकार केले आहेत त्यांची क्षमा झाल्याशिवाय मी येथून उठणार नाहीं!

मो०—जिवाजीपंत, महाराजांच्या व तुमच्या म्हणण्यांत फारच फरक आहे! तुम्ही म्हणतां कीं मीं महाराजांचे अनंत अपकार केले आहेत. महाराज म्हणतात कीं जिवाजीपंतानें मजवर अनंत उपकार केले आहेत!

शि०—( जिवाजीपंतास उठवून व प्रेमानें आलिंगन देऊन ) जिवाजीपंत, भलतेंच नाहीं तें! तुम्हीं माझे काय अपराध केले आहेत ? उलटें मी संकटांत असतां तुम्हीं माझें उत्तम रीतीनें रक्षण केलें. तुम्हांवर जर मीं क्रोध केला तर मला 'धर्मराज' हें नांव कसें शोभेल ?

जि०—( खालीं मान घालून ) महाराज, आपणावर प्रेम करणाऱ्या सेवकास असें लाजविणें उचित नाहीं. ज्या प्रभूचे गुण महाराष्ट्रांतील आबालवृद्ध गातात त्यास आज मी डोळे भरून पहात आहें हें माझें पूर्व सुकृत होय! माझ्या सर्व आयुष्यांत आजचा दिवस मला अत्यंत धन्य वाटतो!

शि०—मलाही तसेंच वाटतें.

**मो०**—जीवशिवांच्या गांठी पडल्यावर असेच उद्गार निघावयाचे !

**शि०**—( रघूजी हवालदारास ) हवालदार, गणपतरावास घेऊन या.

**र०**—जी, हुकूम. ( जातो व सहा मावळे शिपायांनीं वेष्टिलेल्या व हातापायांत बिड्या घातलेल्या गणपतरावासह प्रवेश करितो. )

**ग०**—( शिवाजीस साष्टांग नमस्कार घालून ) सरकार, मी आपले सर्व अन्याय कबूल करितों. आपण प्रभु, दयेचे सागर आहां. याकरितां माझे अपराध माफ करून मला सोडून द्यावें.

**शि०**—(संतापून) दुष्टा ! दयेस पात्रापात्र कोण आहे हें मला समजतें. तुजसारख्यावर जर मी दया करीन तर तो केवळ अन्याय होईल; आणि तेणेंकरून मी नरकास जाईन. तुला सोडून दिलें तर तूं सर्व मनुष्यजातीचा नाश करिशील! तुला देहान्त शासनच योग्य होय!

**ग०**—महाराज गोब्राम्हणप्रतिपालक आहेत अशी सर्व कीर्ति गातात. मी तर ब्राम्हण आहें.

**शि०**—पण तुझीं कर्मं मांगाहूनही नीच आहेत! तुला ब्राम्हण कोण म्हणेल ? ( जिवाजीपंतास ) या मनुष्यानें राजद्रोह व दुसरे घोर अपराध स्वमुखानेंच कबूल केले आहेत. कायद्याच्या आधारानें यास देहान्त शिक्षा ठरतच आहे; पण ती शिक्षा कोणच्या रीतीनें द्यावी हें मला सांगायानें तुमचेही अपराध केले आहेत.

**जि०**—( उभा राहून व हात जोडून ) अभय असेल तर महाराजांच्या पायांशीं एक विनंती आहे.

शि०—बोला.

जि०—आज्ञा होत आहे कीं यास कोणच्या रीतीनें शिक्षा द्यावी हें मीं सांगावें. पण महाराज, या गणपतरावाचा पूर्वींचा इतिहास मीं एका प्रसंगीं आपणांस ऐकविलाच आहे. हा तीन महिन्यांचा असतांच याचीं आईबापें वारलीं; तेव्हांपासून या दुर्दैवी अनाथ मुलास मीं आपल्या मुलाबरोबर वाढविलें. ज्याला मांडीवर घेऊन मीं अन्न भरविलें, कडेवर घेऊन मीं प्रेमानें खेळविलें, वाचा फुटल्याबरोबर जो बोबड्या शब्दांनीं प्रथम मला 'का-का-का-का,' अशी हांक मारूं लागला, त्याच्या मृत्यूस मी कसा कारण होऊं? बा गणपती, तूं लहानपणीं कितीरे चांगला होतास? तूं असा निमकहराम निपजशील हे त्या वेळीं कोणास माहित होतें? महाराज, आपली जर मजवर प्रसन्नता असेल तर आपण या गणपतराव किल्लेदारास जीवदान द्यावें.

ग०—( रडत रडत ) काका, काका, तुमचें किती तरी दयाळू मन! आणि मी पहा कसा कृतघ्न नराधम तो! खरेंच काका, ते माझे लहानपणचे दिवस मोठ्या सुखाचे व आनंदाचे गेले. अजूनही त्यांचें स्मरण झालें म्हणजे वाटतें कीं तेच दिवस पुन्हा यावे. घटकेनें माझें शिर धडापासून निराळें होईल, त्यापूर्वीं मी तुम्हांजवळ एवढेंच शेवटचें मागणें मागतों कीं, "मीं तुझे सर्व अपराध क्षमा केले आहेत. तुजवर आतां माझा राग नाहीं," असें एकदां मला बोलून दाखवा; म्हणजे मी शांतपणानें व सुखानें मरेन!

जि०—( गहिंवरून ) अरे हतभाग्या? तूं जें जें केलेंस त्याबद्दल माझी तुला माफीच आहे. परंतु तुझ्या दुष्कृत्यांबद्दल तूं ईश्वराजवळ व ( शिवाजीकडे बोट दाखवून )

या ईश्वराच्या अंशभूत भाग्यशाली प्रभूजवळ क्षमा माग. यांत तुझें कल्याण आहे.

शि०—जिवाजीपंत, भलतीच गोष्ट करण्यास तुम्ही मला कसें सांगतां ? याला मी जिवंत सोडलें तर फंदफितूर करणाऱ्या लोकांवर माझा वचक कसा राहील ?

जि०—कोप नसावा. विनंती केली आहे ती मनास आणली पाहिजे.

मो०—देशपांड्यांच्या वचनास महाराजांनीं मान दिला पाहिजे.

शि०—जिवाजीपंताची जर तशीच इच्छा असेल तर तसें करणें भाग आहे. या अपराध्यास मी जीवदान देतों, परंतु यानें आमरण प्रतिबंधांत राहिलें पाहिजे. हवालदार, त्याला घेऊन जा तुम्ही आतां. ( रघूजी हवालदार व शिपाई राजास मुजरा करून व गणपतरावास घेऊन निघून जातात. )मोरोपंत, या किल्लेदारास येथें ठेवून उपयोगी नाहीं.

मो०—मला वाटतें कीं त्याला कोंकणांतील एकाद्या किल्ल्यांत पाठवून द्यावें.

शि०—योग्य आहे. आज दोन प्रहरांनंतर बिरवाडी किल्ल्यावर त्याची रवानगी बंदोबस्तानें करून द्या. त्यास सक्तीनें व हुशारीनें वागविण्याबद्दल तेथील किल्लेदारास पत्र लिहा.

मो०—हुकमाप्रमाणें तजवीज करितों.

जि०—गणपतरावाचे प्राण रक्षण करण्यांत माझी विनंती महाराजांनीं मनास आणिली येणेंकरून मी कृतकृत्य झालों.

शि०—जिवाजीपंत, तुमचें मन फार दयाळू आहे. तुमची सरलता व निस्पृहता, तुमचें औदार्य व शौर्य, व तुमची अप्रतिम राजभक्ति पाहून मी प्रसन्न झालों आहें. इतःपर तुम्हीं व तुमच्या संततीनें स्वजनामध्यें राहून सुखानें कालक्षेप करून माझें व माझ्या संततीचें कल्याण चिंतीत जावें याकरितां या पन्हाळे प्रांताचा मोकासा तुम्हांस वंशपरंपरागत इनाम करून दिला आहे.

जि०—माझ्या हातून यत्किंचित् सेवा झाली आहे ती मीं केवळ निर्लोभ वुद्धीनें केली आहे. त्याकरितां मला इनाम नको.

शि०—( जिवाजीपंताचें बोलणें न ऐकिल्यासारखें करून ) तुमचा पुत्र कृष्णराव याची मर्दुमकी व हुशारी विशेष आहे. त्यास आम्हीं कर्नाटकांतील नवीन जिंकलेल्या प्रांतांत किल्ला नळदुर्ग तर्फ बल्लारी येथें किल्लेदा-र नेमिलें आहे.

जि०—महाराज, मीं पूर्वींच विनंती केली आहे कीं माझ्या चाकरीबद्दल मला दुसरें बक्षीस नको. आपली कृपा असली म्हणजे पुरे.

शि०—तुमची सून राधाबाई हिचें वय केवळ लहान असून तिचें अप्रतिम पातिव्रत्य, पर्वतासारखें स्थैर्य व राज-भक्ति हे गुण पाहून आमची तिजविषयीं अत्यंत पूज्य बुद्धि झाली आहे. आमचें राजवैभव एवढें प्रचंड असून-ही तिच्या सद्गुणांस अनुरूप असें बक्षीस देण्यास आम्हां-जवळ कांहीं नाहीं. तरी आमच्या हातून तिचा यत्किंचि-त् आदर घडावा म्हणून तिला लुगडेंचोळीबद्दल कसबे धामापूर व कसबे आरवली तर्फ संगमेश्वर प्रांत कोंकण हे गांव इनाम दिले आहेत.

मो०—( हंसून ) जिवाजीपंत, महाराज जसे रणशूर आहेत तसेच ते दानशूरही आहेत. रणामध्यें शत्रूवर प्रहारांचा वर्षाव करीत असतां तो " नको नको " म्हणूं लागला कीं महाराज दयावंत होऊन आपला हात लागलाच थांबवितात; परंतु तीच कृपा दानामध्यें याचकावर होत नाहीं. तो " नको नको " म्हणूं लागला कीं उलटा त्याजवर देणग्यांचा वर्षाव मात्र होतो.

जि०—(हंसून) असें काय ? तर मग मी उगीच बसतों.

शि०—जिवाजीपंत, मीं तुमचे शत्रु जे मोंगल त्यांचा पराभव करून तुमचें व तुमच्या ग्रामस्थांचें रक्षण केलें; व गणपतरावाचें निवारण करून तुमच्या पुत्रास व सुनेस संकटांतून मुक्त केलें. आतां तुमचे क्लेश व भयें शरत्कालांतील मेघांप्रमाणें वितळून जाऊन तुमचा भाग्यसूर्य पुनः देदीप्यमान झाला आहे. आतां तुमची आणखी काय इच्छा उरली आहे ?

जि०—महाराज, माझ्या इच्छा सर्व पूर्ण झाल्या. आतां एवढीच एक इच्छा आहे कीं—

जे जे सन्मार्गवर्ती सदयहृदय जे सर्व बंधु स्वभावें ॥
पाहोनी देशबंधु व्यथित व्यथितसें चित्त ज्यांचेंहि व्हावें ॥
उद्धारूं हिंदुधर्मा सतत झगडतां देह ज्यांचे झिजावे ॥
काळीं काळीं महात्मे पुरुष महिवरी धीर जन्मास यावे ॥१॥

सर्व—तथास्तु.

[ सर्व निघून जातात. ]

समाप्त.

PRINTED AT THE 'DNYAN PRAKASH' PRESS, POONA.